
# श्रीसाईलीला



ऑक्टोबर १९५९ पुण्यतिथि विशेषांक किं. ७५ न. पैसे.

# श्रीसाई बोधामृत

तरी जो सर्वदा हरीस शरण ।
त्या काय म्हणावें हिंदु वा यवन ।
असो शूद्र, अति शूद्र याति विहीन ।
जाती न प्रमाण अनुमात्र ॥
नाहीं जयास देहाभिमान ।
असो हिंदु वा मुसलमान ।
सकल वर्णां समसमान ।
तया न भिन्नपण जातीचें ॥
अखिल विश्वची माझें घर ।
मीच वासुदेव विश्वंभर ।
मीच परब्रह्म अक्षर ।
हा दृढबोध निर्धार जयाचा ॥
राम आणि रहिम एक ।
यत्किंचीतही नाहीं फरक ।
मग भक्तींच धरावी कां अटक ।
वर्तावें तुटक किमर्थ ॥
काय तुम्हीं लेकरें मूढ ।
बांधा हिंदु- अविंधाची सांगड ।
व्हा दृढ सुविचारारूढ ।
तरीच पैलथड पावाल ॥
केवळ जगाचिया उपकारा ।
चुकवाया जन्ममरणांचा फेरा ।
त्यागुन निर्गुण निराकारा ।
आले हे आकारा संतजगीं ॥
तुम्हीं कोणी कुठेंही असा ।
भावें मज पुढें पसरितां पसा ।
मी तुमचिया भावासरिसा ।
रात्रंदिसा उभाच ॥

—श्रीसाईसच्चरित



# श्री साई लीला


पुण्यतिथी विशेषांक

[शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक]

वर्ष ३६ वें : अंक ७ वा

आक्टोबर १९५९



संपादक—

नागेश आत्माराम सावंत



वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

कार्यालय—

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,
४९/५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १


## या अंकांत—


* गीतेंतील योगक्षेम
* श्रद्धा आणि सबुरी
* भक्तांचा पाठिराखा पांडुरंग
* योगी अरविंदांचें योगसामर्थ्य
* श्रीरामानुजांची शिकवण
* अमेरिकेंत भारतीय तत्त्वज्ञान
* संतांच्या सहवासांत
* देव आणि धर्म
* संत श्रीगुरुनाथ बाबा दंडवते
* समृद्ध जीवनाचा वाटाड्या
* श्रीसाईसच्चरित (गद्यानुवाद)


★



# प्रा. रा. द. रानडे यांचीं बोधवचनें

## [ भाषणें व संभाषणें यांतून टिपलेलीं ]

१. आपण देवाचें नाम घ्यावें; तो आपलें काम करतो.

२. नामस्मरण करणें हा खरा धर्म. इतर धार्मिक गोष्टी कांहीं कामाच्या नाहींत.

३. नाम हा स्वार असून नाद हा घोडा आहे.

४. महत्व नामस्मरणाला आहे, अनुभवांना नाहीं.

५. रोग नामस्मरणानें बरा करावा; मग उगीच लोकांसाठीं म्हणून औषध घ्यावें.

६. खऱ्या सुखाचा मार्ग एकच; नामस्मरण!

७. देवाच्या स्वरुपाहून त्याचें नाम श्रेष्ठ व नामाहूनहि भाव श्रेष्ठ.


८. दैव म्हणजे देवाची कृपा.

९. भक्ति हें एक भिंग आहे; त्यांतून देवाचें रूप स्पष्ट दिसतें.

१०. आत्मज्ञानाची गंगा कांहीं काळ प्रगट, तर कांहीं काळ गुप्त राहते.

११. मी द्रष्टा नाहीं. देवावर भार टाकून उत्कट इच्छा धरली असतां ती सफळ होते, इतकें मला ठाऊक आहे.

१२. माझा परमार्थ माझ्यापुरता आहे; त्याचा दुसऱ्यावर परिणाम होईल एवढें सामर्थ्य माझ्यांत नाहीं.



# प्रिय वाचक—

श्रीसाई लीलेचा हा पुण्यतिथि विशेषांक वाचकांच्या हातीं देतांना अनेक भावनांनीं आमच्या मनांत गर्दी करून सोडिली आहे. गेलीं पस्तीस वर्षें 'श्रीसाई लीला' श्रीसाई भक्त वाचकांची यथाशक्ति सेवा करीत आली आहे व भक्तिभावानें आणि बाबासंबंधींच्या प्रेमादर भावनेनें आमचे प्रिय वाचक ती गोड मानून घेत आले आहेत.

## बाबांचें वैशिष्ट्य

पुण्यतिथि अंक म्हणजे बाबांच्या पुण्यस्मरणाचा, ते विजयादशमीला समाधिस्थ झाले; त्याचें पुण्यस्मरण घडवून देणारा अंक. परंतु बाबांच्या भक्तांना त्यांचें स्मरण अहोरात्र होत असतें व तेंही आपल्या भक्तांचें कोडकौतुक निशिदिनीं पुरवीत आहेत. श्रीसाईबाबा समाधिस्थ होऊन चाळीस वर्षांपेक्षां अधिक काळ मागें पडला असला, तरी त्यांची स्मृति मागें पडलेली नाहीं. दिवसें दिवस, वर्षानुवर्ष तिला चैतन्य पालवी फुटत चालली आहे. ती अधिकाधिक तेजस्वी होत चालली आहे. बाबा देहधारी होते व आमच्यांत देहानें वावरत होते, त्याहिपेक्षां देहत्यागानंतर त्यांच्या अस्तित्वाची व त्यांच्या प्रभावीपणाची आपणांस अधिकाधिक जाणीव होऊं लागली आहे. बाबांचें हेंच तर वैशिष्ट्य आहे. बाबांनीं शिष्यगण निर्माण केला नाहीं किंवा स्वतःचा असा सांप्रदाय सुरू केला नाहीं, तरीही ते आजकाल सर्वांची अंतःकरणें व्यापून राहिले आहेत. भक्तिभावानें व श्रद्धेनें आळविणाऱ्यास आपल्या अस्तित्वाची जाणीव ते पदोपदीं घडवीत आहेत. प्रत्येक साईभक्ताचें अंतःकरण याची साक्ष देईल.

## सुवर्णमोलाचा संदेश

आणि बाबानीं सांगितलेंच आहे कीं,—' झालों जरी गतप्राण । वाक्य माझें माना प्रमाण । माझीं हाडें तुर्वतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥ मी काय, पण माझी तुर्वत । राहील तुम्हांसवें बोलत । जो तीस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवें ॥ डोळ्यांआड होईन ही चिंता । करूं नका तुम्हीं मजकरितां । माझीं हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हांसवें ॥ मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण । ठेवा, करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल ॥ '

अशा रीतीनें मनुष्य जन्म घेऊन कृतकार्य होण्याचा व आपलें सर्वांगीण कल्याण साधण्याचा सुवर्णमोलाचा

संदेश बाबांनीं सर्वांना देऊन ठेवलेला आहे व तो आचरणांत आणणाऱ्यांस त्याची अनुभूतिं घडत आहे. सर्वांच्या कल्याणासाठीं बाबा या भूतलावर अवतीर्ण झाले व देहरूपानें आमच्या दृष्टीआड झाले तरी त्यांचें तें लोककल्याणाचें अवतारकार्य उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत चालूच आहे व तसेंच तें अखंड चालू रहावयाचें आहे.

## बाबांच्या शिकवणीचा प्रचार

संसारांत वावरत असतां व आजुबाजूच्या परिस्थितीशीं दैनंदिन झगडत असतां त्या परिस्थितीवर विजय कसा मिळवावा व हा संसारसागर तरून कसें जावें, याची गुरुकिल्ली बाबांनीं आपल्या भक्तांच्या हातीं देऊन ठेविली आहे. ज्यांनीं ती चावी हस्तगत केली ते धन्य होत. बाबांची शिकवण म्हणजे गीताउपनिषदांची शिकवण. त्या शिकवणीचा प्रचार करणें, साधकांना साधनेसाठीं शक्य तर शक्तीप्रमाणें जरूर तें खाद्य पुरविणें, सद्विचार, सद्भावना यांचा प्रसार करणें हें श्रीसाईलीलेचें एक ध्येय आहे. त्या ध्येयानें प्रेरित होऊन गेलीं पस्तीस वर्षें या नियतकालिकाचें मार्गक्रमण चालू आहे; व बाबांच्या आणि साईभक्त वाचकांच्या कृपेनें व सहकार्यानें तें पुढेंही चालू राहीलच.

श्रीसाईभक्त व अध्यात्ममार्गाचें चिंतन करणारे चिंतक व साधक ठायीं ठायीं आहेत. हें मासिक म्हणजे सद्विचारांची व अध्यात्म भावाची देवाणघेवाण करणारें एक साधन आहे. त्या मार्गावर असलेल्या किंवा नसलेल्यांनाही प्रेरकविचारांची जरुरी असते अशी आमची समजूत आहे. या साधनाचा झाला तर त्यांना उपयोग व्हावा हीच आमची भावना. परंतु अशा या कार्यांत शक्य त्या सर्वांनीं भाग घेणें व एकमेकांना सहाय्य करणें जरूर आहे असें आम्हांला वाटतें. साधकांनीं व तत्त्वचिंतक विचारवंतांनीं या कार्यांत आमच्याशीं सहकार्य करावें असें या पुण्यतिथि विशेषांकाच्या निमित्तानें आम्हीं त्यांना प्रेमभावानें आवाहन करीत आहोंत.

प्रिय वाचक! ‘श्रीसाईलीला’ मासिक सुंदर व्हावें, अत्यंत वाचनीय व मार्गदर्शक आणि प्रेरक व्हावें असें आमच्याप्रमाणें आपणासही वाटत नाहीं काय? हें एकट्या दुकट्याचें कार्य नाहीं. बाबा एकट्या दुकट्यासाठीं नव्हते. ते सर्वांसाठीं होते व आहेत. तसेंच हें कार्यही सर्वांसाठीं आहे. त्याला शक्य त्या सर्वांचा हातभार लागावा व तें सर्वांगसुंदर व्हावें हीच आमची आकांक्षा आहे. या महत् कार्याकडे वळण्याची प्रेरणा सर्वांना होवो हीच आमची प्रार्थना आहे.

## एक नवीन उपक्रम

या अंकापासून एक नवीन उपक्रम सुरू करण्यांत येत आहे. ‘श्रीसाई सच्चरित’ या ओवीबद्ध ग्रंथाची मातब्बरी आम्हीं काय सांगावी? ती शब्दांनीं वर्णन करून सांगतां येण्यासारखी नाहीं. ती

साई भक्तांची गीता आहे. हेमाडपंतांनीं ती शक्य तेवढी सुलभ करून ठेविली आहे. आमच्या एका साईभक्त मित्रास तिला गद्य स्वरूप देण्याची इच्छा होऊन ती त्यांनीं अंमलांत आणिली. या अंकापासून श्रीसाई-सच्चरित गद्यस्वरूपांत क्रमशः प्रगट करण्याचा उपक्रम सुरू होत आहे. आमच्या वाचकांस हा उपक्रम कसा काय रुचतो हें पहावयाचें आहे.

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. द. पां. खांबेटे यांचें सहकार्य गेलीं ४।५ वर्षे आम्हांला लाभलें होतें. यापुढें कार्य-बाहुल्यामुळें पूर्ववत् तें त्यांना देतां आलें नाहीं तरी मधून मधून सवडीनुसार त्यांच्या लेखन सहकार्याचा लाभ घडत जाईल अशी अपेक्षा आहे. त्यांच्या आजवरच्या सहकार्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत.

## सर्वांना विनंती

श्रीसाईलीलेचा प्रत्येक अंक आमच्या वाचकांच्या दृष्टीनें वाचनीय, सुंदर व प्रेरक निघावा यासाठीं आमचे प्रयत्न अहर्निश चालू रहातील व यापुढील काळांत प्रत्येक अंकावरून वाचकांस त्याची कल्पना करतां येईलच; परंतु वर विनन्ती करण्यांत आल्याप्रमाणें वाचकांनीं केवळ तटस्थ-पणाची भूमिका स्वीकारून स्वस्थ न रहातां श्री साईलीलेच्या अभिवृद्धीसाठीं तिच्या सर्वांगसुंदरतेसाठीं व तिच्या वैभवांत उपयुक्त भर पडावी यासाठीं तिला ज्या ज्या परीनें हातभार लावतां येण्यासारखा असेल, त्या त्या परीनें हातभार लावण्यासाठीं पुढें यावें; काय हवें, नको तें कृपा करून कळविण्याची व आम्हांला जागविण्याची तसदी घ्यावी, अशी आमची सविनय विनंति आहे.

—संपादक



भगवंताच्या बंगल्याचे दरवाजे कोणाच्याहि बाबतींत केव्हांहि बंद नसतात. तो दरवाजा आत्यंतिक निष्ठेनें मात्र ठोठावला पाहिजे. मग तुमच्या हातून कितीहि चुका वा पापकर्में घडलेलीं असोत.

—योगी अरविंद




संकलक : **आमचे प्रतिनिधि**

**श्री. भिकाजी परशुराम बरवे** ( पेन्शनर, C/o भार्गव विष्णु काणे, वकील, पंढरपूर ) हे नुकतेच बाबांचे दर्शनास आले होते. सुमारें ४० वर्षांपूर्वी बाबा हयात असतांना, प्रथमच ज्यावेळेस ते शिर्डीस बाबांचे दर्शनास आले त्यावेळेस बाबांचे न ऐकल्यामुळें आपली कशी फजिती झाली याचा अनुभव त्यांनीं खालीं सांगितला आहे.

'सुमारें ४० वर्षांपूर्वी मॅट्रिकमध्यें असतांना पंढरपुराहून शिरडीस मावशी-सह बाबांचे दर्शनास आलों. दर्शन घेत-ल्यावर मी जाण्यास निघालों. तेव्हां बाबा म्हणाले. 'जाऊं नको.' पण मी ऐकलें नाहीं. टांग्यांत बसण्यासाठीं म्हणून निघालों. इतक्यांत सॉलिसिटर काका-साहेब दीक्षित आले व मला म्हणाले, 'बाबा नको म्हणताहेत तर कशाला जातो ? उद्या जा.' परंतु मी ऐकलें नाहीं. व मी आणि मावशी आम्हीं ठरविलेल्या टांग्यांत बसलोंच.

'टांगा गांवाच्या बाहेर कोपरगांवच्या रस्त्यानें जातो तोंच टांग्याच्या दोन्हीं चाकांच्या धांवा खळकन् आवाज होऊन निखळल्या. दुसरा टांगा नव्हता, त्यामुळें परत आलों. महाराज म्हणाले, 'क्यों बेटा, क्या जानेवाला था ना !' मग मी म्हटलें कीं, तुमच्या परवानगीशिवाय आतां मी जाणार नाहीं. तेव्हां ते मजकडे पाहून किंचित हंसले व म्हणाले, 'बरं आतां उद्यां जा.' नंतर त्यांनीं मला प्रसाद दिला.

× × ×

**भालचंद्र रघुनाथ वैद्य** ( चष्म्याचे व्यापारी, पिलाजी गंज, म्हैसाणा–उत्तर गुजरात ) यांनीं खालील अनुभव सांगितला—

'एप्रिल १९५३ मध्यें माझे बंधु प्रभाकरराव हे बाहेरगांवाहून अंबूच्या पहाडावरील अंबाजी मातेच्या दर्शनास जाण्याकरतां म्हणून आमचेकडे सहकुटुंब आले. तो वार शनिवार होता. संध्या-काळच्या गाडीनें जावयाचें होतें, म्हणून त्यांनीं बेडिंग बांधून भिंतीजवळ ठेवलें. त्या भिंतीवरच साईबाबांचा फोटो होता

व त्या फोटोखालींच बेडिंग ठेवलें होते. नंतर ते इकडे तिकडे गेले. थोड्या वेळानें येऊन पाहतात तों बेडिंगवर त्यांना एक सफेत चिठी आढळली. चिठी कसची, एक पांढरा कागद होता तो व त्यावर खालील मजकूर पेन्सिलीनें हिंदींत लिहिलेला होता.

'तुम्हीं अंबाजीला जाऊं नये. तुमच्यावर महान् संकट आहे. साईबाबा.'

'मी यावेळेस दुकानांत होतों. श्री. प्रभाकररावांना व घरच्या सर्व मंडळींना कागदावरील मजकूर वाचतांच त्यांना तो एक सर्व थट्टा वाटली. घरच्याच मुलाबाळांनीं कोणीतरी थट्टेनें हें लिहिलें असावें असें त्यांना वाटलें. त्या सर्वांना माझ्या मोठ्या मुलाचा ( चि. अशोक वय वर्षें १२ ) संशय आला. म्हणून त्यांनीं त्याला याबाबत विचारलें. पण आपण तो मजकूर लिहिला नसल्याचें व ती चिठ्ठीही आपण पाहिली नसल्याचें माझ्या मुलानें सांगितलें. परंतु कोणाचाच त्याच्याव विश्वास बसला नाहीं व आपणांसहि अंबाजीच्या दर्शनास न्यावें म्हणून त्यानें मुद्दामच हा मजकूर लिहिला असावा असें वाटून श्री. प्रभाकररावांनीं ती चिठ्ठी फाडून टाकली व तो सर्व विषय थट्टेवारी नेला. मी घरीं येण्याच्या अगोदरच ही चिठ्ठी फाडून टाकली गेल्यामुळें अक्षरांचा उलगडा झाला नाहीं व त्यांत नक्की हिंदीमध्यें कोणती भाषा वापरली होती तेंहि समजलें नाहीं.

'पुढें श्री. प्रभाकरराव व त्यांची मंडळी संध्याकाळच्याच गाडीनें अंबाजीस जाण्याकरितां म्हणून निघाली. ते विसानगर येथें पोंचले व त्यांचा मुलगा चि. रमेश हा एकाएकीं घटसर्पाच्या विकारानें (Diphtheria) आजारी झाला. तेव्हां पुढें अंबाजीस न जातां ते परत म्हैसाण्यास आले. डॉक्टरांचे उपचार तावडतोब सुरू झाले व सुमारें १५ दिवसांत त्याला चांगलाच आराम पडला. नंतर श्री. प्रभाकरराव व त्यांची मंडळी मुलासह आपल्या नोकरीच्या गांवीं निघून गेली.

'एवढ्या कालांत बाबांनीं आपणांस चिठ्ठीद्वारें महान् संकटाची सूचना आगाऊच दिली होती ही गोष्ट तशाप्रकारचें संकट येऊनही आम्ही साफ विसरून गलों. त्यामुळें अत्यंत अनन्यभावानें बाबांचें ध्यान, जप अथवा त्यांच्या चरित्राचें पारायण वगैरे जें करावयास पाहिजे होतें तें आम्हीं केलें नाहीं. आणि त्याचा परिणाम फार भयंकर झाला.

'कारण, श्री. प्रभाकररावांचा तोच मुलगा ( चि. रमेश ) थोड्याच दिवसांनंतर तब्येतीची उलट खावून पक्षघातासारख्या भयंकर रोगानें आजारी झाला. तेव्हां ते मुलासह म्हैसाण्यास आमच्याकडे आले. डॉक्टरांनीं सांगितलें कीं हा रोग घटसर्पामुळेंच झाला व त्यांनीं आम्हांस इतर मुलांना तेथून हलविण्यास सांगितलें. मी मुलांसह बडोद्यास गेलों. बाबांचे विशेष

ध्यान, जप अथवा त्यांच्या चरित्राचें पारायण वगैरे करण्यास मी माझ्या बंधूस सांगण्याचें अजिबात विसरून गेलों व त्यानेंही यापैकीं कांहींच केलें नाहीं. शेवटीं श्री. प्रभाकररावांचा मुलगा माझ्या गैरहजेरींत स्वर्गवासी झाला.

'ही भयंकर घटना' घडल्यानंतर आमचे डोळे लख्खन् उघडले. नंतर आम्हीं श्रद्धापूर्वक साई सच्चरित्राचें पारायण ३ दिवसांत केलें. मग आम्हांस वाटूं लागलें कीं ही चिठ्ठी खुद्द साईबाबांनींच लिहिली नसली व ती चि. अशोकनें ('म्हणजे माझ्या मुलानें) लिहिली असें जरी धरून चाललों तरी त्याला अशा तऱ्हेची चिठ्ठी लिहिण्याची प्रेरणा तरी कोणी केली ?

'सर्व साईभक्तांस माझी अशी नम्र विनंती आहे कीं, अशा तऱ्हेची सूचना जर बाबांकडून कोणास मिळाली तर त्यानें त्यांत थट्टा न समजतां अत्यंत अनन्य भावानें बाबांना शरण जाऊन त्यांची विशेष भक्ति म्हणजे त्यांचें ध्यान, जप, त्यांच्या चरित्राचें पारायण वगैरे करावें. त्यांतच त्यांचें कल्याण आहे.'

———


**लहान मुलाच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

***

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

↔

सोल प्रो. **जयकर ब्रदर्स**
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

↔

: स्टॉकिस्ट :
**कांचनलाल वाडीलाल क.,**
दवाबझार, मुंबई २

**अर्नाळकर ब्रदर्स**

**चष्म्यांचे व्यापारी**

आमच्या येथें **डोळ्यांची मोफत तपासणी** करून शास्त्रोक्त चष्मे **वेळेवर** तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :
**बाबूराव अनाळकर**
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, **मुंबई ४**

**वि. सू :**—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

# श्रद्धा आणि सबुरी

लेखक : पी. बी. के.

सबुरी सद्गुणांची खाणी । सद्विचार रायाची हे राणी ॥
निष्ठा आणि ही सख्या बहिणी । जीवप्राण दोघींसी ॥

—श्रीसाईसच्चरित

श्रीसाईबाबांच्या शिकवणींत श्रद्धा आणि सबुरी या दोन गोष्टींचें महत्व अपरंपार आहे. आणि मानवी जीवनांतही त्या गुणांचें महत्व अपरंपार नाहीं कां ? ज्यानें या दोन गुणांची कांस धरिली व त्यांचें कसोशीनें आचरण करण्याचें मनावर घेतले त्याला इह, परलोकीं शांती, समाधान व सौख्य यांचा लाभ झाल्याशिवाय रहाणार नाहीं. बाबांच्या शिकवणुकीचा हा गाभा आहे असें म्हटलें तर त्यांत फारशी अतिशयोक्ति आहे असें म्हणतां येणार नाहीं.

ज्यानें श्रद्धेचा सहकार संपादन केला त्याला या जगांत कशाची उणीव भासणार आहे ? श्रद्धेच्या बळावर असाध्य तें साध्य करतां येतें. इच्छित कार्य तडीस नेतां येतें, इकडचें जग तिकडे करतां येतें, आणि काय ? काय वाटेल तें करतां येतें !

## श्रद्धेनें काय साध्य होत नाहीं ?

श्रद्धा म्हटली म्हणजे देवावर श्रद्धा ..वी असें आपण समजतों; परंतु श्रद्धेचा वापर आपण व्यापक अर्थानें करण्याचें ठरविलें तर रोजच्या जीवनांत पदोपदीं नडणारीं आपलीं सारीं कोडीं यशस्वीरीतीनें सुटतील. तुम्हीं कोणत्याही कार्यास हात घाला. त्यावर तुमची संपूर्ण श्रद्धा असली व श्रद्धायुक्त अंतःकरणानें त्या कार्याचा तुम्हीं पिच्छा पुरविला तर यश तुमच्यामागून धांवत आलेंच म्हणून समजा.

आपण जें जें करण्याची योजना मनाशीं आखूं, त्याच्या पाठीशीं श्रद्धेचें पाठबळ असलें म्हणजे इतर साऱ्या अडचणींचा आपोआप निरास होत जातो. यासाठीं केवळ देवाधर्मावर श्रद्धा असावी म्हणजे सुख व समाधान मिळतें; एवढेंच नसून रोजच्या व्यवहारांत जों जों मनोभावें या सद्‌गुणांचें आचरण कराल तों तों तुमच्या जीवनांत सुख-समृद्धीचा वाढता विलास तुम्हांला दिसून येईल.

## श्रद्धेविणें सारें व्यर्थ आहे

परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे अशा या बहुमोल गुणाकडे आम्हीं पाठ फिरविली

आहे. आजकाल आमच्या दैनंदिन जीवनांत श्रद्धेला फारसें महत्वाचें स्थान नाहीं.आम्हीं जें कांहीं करतों, बोलतों व आचरतों त्याच्या पाठीशीं श्रद्धेचें अधिष्ठान नसतें; त्यामुळें आमचें करणें, बोलणें व आचरणें लंगडें पडतें. त्यांत जिवंतपणा व चैतन्य येऊं शकत नाहीं. तुम्हीं श्रद्धेची कांस धरा; मी हातीं घेतलेल्या कार्यांत यश मिळ-वीनच मिळवीन, अशा श्रद्धेच्या भावनेनें त्यांचा पिच्छा पुरवा आणि मग जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें काय चमत्कार घडून येतो पहा !

'प्रयत्नांतीं परमेश्वर' म्हणतात; परंतु प्रयत्नांच्या जोडीला श्रद्धा असल्याशिवाय तुमचा परमेश्वर जागा होणार नाहीं. प्रयत्न काय किंवा परमेश्वर काय, त्यांना श्रद्धेची भूक लागलेली असते. तुमच्या-ठायीं श्रद्धेनें ठाण मांडलें आहे हें पहातांच त्यांची भूक, तहान हरपते. सुख, संपत्ति, समाधान, कर्तबगारी व स्वर्ग या सर्वांचा समावेश श्रद्धेंत झालेला आहे; आणि म्हणूनच पूज्य बाबांनीं श्रद्धेला एवढें महत्त्व दिलें आहे.

## बाबांचा आदेश

श्रद्धा आणि सबुरी ह्या सख्या बहिणी आहेत, असें बाबांनीं सांगितलें आहे. साध्या बहिणी नाहींत तर सख्या बहिणी आाण दोघींचेंही एकमेकांवर जीव कीं प्राण प्रेम आहे, असेंही सांगितलें आहे. ज्यांना या दोघींनाही आपलेसें केलें त्याला या जगांत कसलीही उणीव भासणार नाहीं.

सबुरी ! कोणत्याही कामांत बोलण्यांत वागण्यांत, वा चालण्यांत सबुरीनें घ्यां; घाई करूं नका. उतावळेपणानें मुखावाटे शब्द उच्चारूं नका व उतावळेपणानें पाऊल टाकूं नका. असें अनुभवी माणसें सांगतात. सबूर ! किती बहुमोलाचा शब्द आहे हा ! आपल्या आयुष्यांत, आपल्या रोजच्या जीवनक्रमांत सदासर्वकाळ धिसाडघाई चाललेली असते. चालतांना घाई, बोलतांना घाई, कोणतेंही काम धाम करतांना घाई; सारी घाईच घाई ! सबुरीला, सावकाशपणाला, संयमाला, व शांतपणाला तेथें जागाच नाहीं ! आणि मग त्याचे नाना अनर्थ आपणांस घडो-घडीं भोगावे लागतात !

## घरांतील उदाहरण

आपल्या घरांतील उदाहरण आपण घेऊं या. घरांत बायकोकडून, मुलाकडून किंवा बंधूकडून कांहीं तरी आगळीक घडते. ती जाणूनबुजून घडतेच असें नाहीं; परंतु आपणांस तसें वाटतें; आणि मग क्रोध अनावर होतो व त्या भरांत आपण बोलूं नये तें चटकन् बोलून जातों. कांहीं वेळानंतर विचारांतीं चूक दुसऱ्याची नसून आपलीच होती असें आढळून येतें व मनाला पश्चात्ताप होतो. घरांतील एकंदर वातावरणांत त्यामुळें केवढा गढूळपणा येतो बरें ? आपण थोडा वेळ संयम पाळला असता तर काय बिघडलें असतें ?

जेथें सदा राहे शांति । तेथें देवाची वसती ॥ परंतु घरीं दारीं किंवा कुठेंही शांतता केव्हां नांदेल ? तुम्हीं सबुरीनें, शांतपणानें व संयमानें वागण्याचें मनावर घ्याल तेव्हां ! खरोखर, श्रद्धेप्रमाणें सबुरी हाही दैवी गुण आहे. आपल्या घरांत देवाचें वास्तव्य व्हावें, घरींदारीं दिव्यत्व नांदावें असें तुम्हांला वाटत नाहीं का ? मग बोलण्यांत व वागण्यांत सबुरीचा, धीर धरण्याचा व उतावीळ न होण्याचा निर्धार करा व तो इमानेंइतबारें आचरणांत आणण्यासाठीं झटा. म्हणजे मग घरीं-दारीं, बाहेर व जिकडे जाल तिकडे, नंदनवदन फुललेलें तुम्हांला दिसून येईल.

## तुम्हांला भाग्य हवें ?

श्रीसाईबाबांचा या दोन सद्‌गुणांच्या बाबतींत फार कटाक्ष आहे. याचें कारण मनुष्याला जरुर असलेलें ऐहिक व पारलौकिक सुख, समाधान, समृद्धि व शांति ह्या सर्वांची खैरात करण्याचें सामर्थ्य त्यांच्याठायीं आहे, हेंच होय. या जगांत ज्याला भाग्यवान् व्हायचें आहे, त्यानें ह्या दोन सद्‌गुणांची मनोभावें आराधना करावी; भाग्य त्याच्यामागून आपखुषीनें वाट चालत येईल.

यासाठीं आज बाबांचें पुण्यस्मरण करीत असतां त्यांनीं परोपरीनें महती गायिलेल्या **श्रद्धा** व **सबुरी** ह्या दोन्हीं सद्‌गुणांची कास आपण धरूं या, रोजच्या आचरणांत त्यांना आणण्यासाठीं झटूं या व आपलें जीवन उजाळून सोडूं या.

———

माननीय **श्री. चिंतामणराव देशमुख** यांच्या हस्तें नुकताच प्रसिद्ध झालेला व त्यांच्यासह सर्वांनीं वाखाणलेला चरित्र-ग्रंथ

# ना. नाना शंकरशेट

## काल व कामगिरी

लेखक : **पु. बा. कुळकर्णी** ❴ प्रस्तावना : **प्रो. अ. का. प्रियोळकर**

पृष्ठें सहाशेंच्यावर, डेमी साईज, पन्नासवर दुर्मिळ छायाचित्रें, नानांचें तीन रंगी चित्र, कापडी बाईंडिंग, तीन रंगी सुंदर वेष्टन.

**किंमत १२ रुपये.** राज. ट. ख. किंवा व्ही. पी. ट. ख. दोन रु. वेगळा; परंतु **श्रीसाईलीलेच्या** वर्गणीदारांस रजि. खर्च किंवा व्ही. पी. खर्च द्यावा लागणार नाहीं. बारा रुपयांत घरपोंच.

पत्ता : **पु. बा. कुळकर्णी,** १३ बरोज क्रॉस लेन, **मुंबई २**

# श्रीसाई वंदन

[ चाल : पतित पावन नाम ऐकूनी ]

साई दयाळा बाबा माझ्या । शरण मी आलों तुला
त्यागुनि जग हें जाणुनि माया । आळवितों तुजला
सांगती मजसी शिरडी जा तूं । पवित्र त्या क्षेत्रा
जाणतसें मी व्यापुनी बससी । तूं साऱ्या विश्वा
नांव तुझें बा दीनदयाळा । अगन्य तव लीला
श्रद्धा सबुरी शिकवुनी केला । उपदेश जनाला
तुझिया नामा सारची आहे । नवविध भक्तींचा
तरले कितीएक नामांतरी ते । सत्य-सत्य वाचा
कलीयुगांतील त्रैमूर्तींचा । अससि अवतार
तरुनी जाया शिकविसी आम्हां । भवसागर पार
अलख निरंजन-अलख निरंजन । नाथी उच्चार
अल्ला मालिक-अल्ला मालिक । हा तव व्यवहार
दीनदुबळयांचा खांब तूं अससी । लीला तव अपार
तारुनी त्यांसी संकटसमयीं । करिसी उपचार
अगाध शक्ती अघटीत लीला । तव सद्गुरुराया
सहस्त्र मुखांचा शेषही थकला । गातां तव माया

—चित्रलेखा कृ. नांदोडकर

# आचरणीय संतवाणी

[ लेखक : **रा. वि. कामत,** बी. ए. एस्. टी. ]

**दक्षिणेकडील महान् संत तिरुवल्लुवर यांचें साऱ्या जीवनाला व्यापून रहाणारें तत्वज्ञान अत्यंत उच्च कोटीचें व प्रत्येक साधकास मार्गदर्शक होऊन रहाणारें आहे. त्याचे घुटके घेऊन ते सोडून द्यावयाचे नसतात. ती संतवाणी म्हणजे सत्यवाणी आहे. तिच्या आचरणांत आपलें कोटकल्याण सामावलें आहे.**

सर्व वर्ण अक्षरांची सुरवात अ कारापासून होते. त्याच प्रमाणें जगाची निर्मिति ईश्वरापासूनच झाली आहे.

इच्छा दमन करणाऱ्या तपस्व्यांचें गुणवर्णन करणें म्हणजेच आजपर्यंतच्या मृतांची गणना करणें !

मनाची निर्मलता हाच खरा धर्म; बाकी सारें स्तोम आहे.

धर्मानुसार जें प्राप्त होतें तेंच खरें सुख ! अधर्मानें जें मिळेल त्यापासून सुख तर नाहींच, पण फलनिर्मितीही नाहीं.

गृहस्थी जर प्रेमी आणि धार्मिक असेल तर तीच खरी संस्कृति आणि जीवनाची सार्थकता !

जगांत धर्मानुसार आचरण करणारा मनुष्य हा स्वर्गातील देवांच्या योग्यतेचा आहे.

स्त्रियांचें शीलरक्षण इतरांच्या दक्षतेनें होणार नाहीं तर त्यांचें पावित्र्यच, त्यांचें शीलरक्षण करूं शकेल.

पंडित लोक म्हणतात, मुलें हीच खरी संपत्ति. आणि त्या मुलांचा भाग्योदय त्यांच्या कर्मानुसार ठरणार !

मुलांचें पितृकर्तव्य तेव्हांच पुरें होईल कीं ज्या वेळेस लोक त्याची वाखाणणी करून उद्गारतील, 'अशा पुत्रप्राप्तीसाठीं त्याच्या पित्यानें कसली घोर तपश्चर्या केली असेल !

स्वाभाविक प्रेम हेंच मानवाचें मुख्य अंग आहे. जो निष्प्रेम आहे तो निव्वळ हाडा मांसाचा निष्प्राण सांगाडा मात्र आहे.

नम्रता आणि मधुरवाणी हेच मानवाचे खरे अलंकार, बाकी सर्व नांवापुरतेच अलंकार !

कोणीहि आपलें भलें केलेलें विसरणें जितकें वाईट तितकेंच अहित तात्काळ विसरणें चांगलें !

नम्रपणा मानवाला अमर बनविते तर उद्दामपणा त्याला विनाशाच्या खाईत ढकलते.

कितीही कष्ट पडले तरी सदाचरण सोडूं नका ! कारण इतर कोणत्याहि आचारापेक्षां सदाचारच आमरण साथ देईल.

भूमि तिला खणणाऱ्याचा सुद्धा भार वहाते त्याचप्रमाणें निंदकाला क्षमा करणें हीच खरी संस्कृति.

दुसऱ्यानें केलेली निंदा सहणारा इतका श्रेष्ठ आहे कीं, त्याच्यापुढें सर्व त्यागी तपस्वी सुद्धां कनिष्ठ ठरेल.

मत्सरी माणसाचा महा रिपु त्याचाच मत्सर होय. दुसरे कोणी शत्रु त्याचा नाश करण्यापेक्षां त्याचा मत्सरच त्याच्या नाशास कारणीभूत होतो.

जगांत यश हीच सर्वश्रेष्ठ आणि अनुपम चीज आहे. सर्व वस्तु विनाशी आहेत, पण यश अमर आहे.

ज्याप्रमाणें या जगांत दरिद्री लोक सुखाला पारखे होतात, त्याप्रमाणें पाशवी लोक स्वर्गीय सुखाला पारखे होतात.

स्वतःच्या शक्ति संवर्धनासाठीं दुसऱ्याची हिंसा करणारा दयाळु कसा होऊं शकेल ?

आपलें दुःख सहन करणें व दुसऱ्याला दुःख न देणें हीच खरी तपश्चर्या !

दुराचारी व्यक्तीचा मानभावीपणा पाहून त्याच्या शरिरांत वास करणारीं पंचमहाभूतें त्याचा धिक्कार करतात.

दुसऱ्याचें कोणत्याहि प्रकारें वाईट न इच्छिणें हीच खरी सचोटी.

आपलें रक्षण करावयाचें असेल तर क्रोधावर विजय मिळवा. नाहींपेक्षां तोच नाशास कारण होईल.

दुसऱ्याला सदाचरणानें उत्तर देऊन लाजविणें हेंच योग्य होय.

संपत्तीचें आगमन म्हणजे नृत्यागृहांत लोक जमणें होय. आणि तिचें गमन हें त्या लोकांच्या परतण्यासारखें आहे.

मृत्यु म्हणजे निंदा आणि जन्म म्हणजे निद्रेंतून जाग !

विद्या ही अमर संपत्ति आहे. दुसऱ्या कोणत्याही संपत्तीमध्यें हें वैशिष्ठ्य नाहीं.

अशिक्षितानें शिक्षितांच्या सहवासांत राहून केलेलें विद्यार्जन आपत्तिकालांत वृद्धाच्या काठीच्या आधारासारखें आहे.

जो सद्विवेकी आहे, तो निर्धन असूनही धनवान आहे. परंतु धनवान सद्विवेकाशिवाय निर्धन आहे.

सत्पुरुषांचा आदरसत्कार करून त्यांना आपलेसें करणें यांतच खरें भाग्य आहे.

सत्पुरुषांची संगत सोडणें म्हणजे अनेकांचे शत्रुत्व पत्करण्याच्या दसपट हानिकारक आहे.

कोणत्याहि कार्याचा आरंभ करण्यापूर्वी त्यांत बरेंवाईट काय आहे व त्याचा परिणाम काय होईल, याचा प्रथम विचार करावी लागते.

राज्यकर्त्याला कोणत्याही कार्याच्या आरंभापूर्वी आपल्या शक्तीचा, शत्रूच्या शक्तीचा व शत्रूच्या साथीदारांच्या शक्तीचा अंदाज घेऊनच कार्याला सुरवात करावी लागते.

स्वतःचें कार्य हीच प्रत्येकाच्या योग्यायोग्यतेची कसोटी आहे.

राज्यकारभारी जोंपर्यंत भ्रष्ट होणार नाहींत, तोंपर्यंत राज्य सुरळीत चालेल, आणि म्हणूनच राजानें त्याच्यावर सदैव नजर ठेवली पाहिजे.

राजाचें यश त्याच्या शस्त्रसामर्थ्यावर अवलंबून नसून त्याच्या सु-यंत्रित राज्य कारभारावर अवलंबित आहे.

———

# -०: गीतेंतील योगक्षेम :०-

## ( एक शब्दार्थ कोडें )

[ लेखक—**विश्वनाथ गोपाळ शेटचे**, बी. ए., एल्‌एल्. बी.
माजी प्राध्यापक, **गोगटे कॉलेज**, रत्नागिरी ]

**सुप्रसिद्ध साहित्यिक व तत्वचिंतक कै. प्रा. वामन मल्हार जोशी एम्. ए. यानीं 'योगक्षेम म्हणजे काय?' या विषयावरील आपल्या लेखांत उपस्थित केलेल्या शंकांचें निराकरण प्रा. वि. गो. शेटचे यानीं या लेखांत सप्रमाण केलें असून, त्यांत शेवटीं वामन पंडितांनीं यथार्थ दीपिकेंत केलेल्या स्पष्टीकरणाचा उल्लेख करून लेखक म्हणतात, 'प्राचीन वामनानें केलेल्या योग्य स्पष्टीकरणानें अर्वाचीन वामनाची तथाकथीत वाङ्मयीन कोंडीची हांडी फुटेल, यांत शंका कसली?'**

'अनन्याश्चितयंतो मां...तेषां...योग-क्षेम वहाम्यहन्'

( गीता अ. ९ श्लो. २२ )

'गीता खरी, आणि माझे डोळे व कान शाबूत तर मग साधुसंतांचा योग-क्षेम ईश्वर चालवतो, या गीतेंतील वचनाचें काय करावयाचें? खोटें म्हणतां येत नाहीं, कारण, व्यासादिक आद्यमुनी, जाणून बुजून कांहींतरीच बोलायचे नाहींत. खरें म्हणतां येत नाहीं, कारण तें बुद्धीला पटत नाहीं. तेव्हां **वाङ्मयांतील** या **कोंडींतून** सुटायचें कसें?'

**—वा. म. जोशी**

सुप्रसिद्ध साहित्यिक कै. **वामन मल्हार जोशी** यांच्या **'योगक्षेम म्हणजे काय?'** या लेखांतील हा उतारा आहे. हा लेख मागें विविधाज्ञान-विस्तारांत सन १९२० च्या एप्रिलच्या अंकांत आणि पुढें **विचार विलास** या त्यांच्या स्फुटलेख संग्रहांत प्रसिद्ध झाला आहे.

वामनरावांनीं प्रस्तुत लेखांत गीतेंतील **योगक्षेम** या शब्दाचा अर्थ कोणता घ्यावा, ऐहिक कीं पारमार्थिक, या प्रश्नावर एक वाङ्मयीन कोंडी निर्माण होते, हें दाखवून देऊन, या कोंडींतून सुटायचें कसें? हाच सरळ प्रश्न त्यांनीं बुद्धिजीवी

मराठी वाचकांपुढें विचारासाठीं ठेविला आहे.

तेव्हां, आतां ही वाङ्मयीन कोंडी म्हणजे तरी काय, हें प्रथम पाहूं.

**गीतेंत, योगक्षेम शब्द, दोनच जागीं आला आहे,** आणि त्या शब्दांचा अर्थहि संदर्भानुसार दोनच प्रकारें संभवतो—ऐहिक निर्वाह ( उदरंभरण ) वा पारमार्थिक निर्वाह ( निःश्रेयस म्हणजेच मोक्ष वा जीवन्मुक्ति ) यांपैकीं त्या त्या जागीं **कोणता अर्थ घ्यावयाचा? भाष्यकारांनीं दिलेला वा स्वतःच्या बुद्धीला पटलेला?** तसा तो घेतांना, जर दोहोमध्यें विरोध आला, तर आप्तवाक्य प्रामाण्य बुद्धीनेंही एक प्रकारें वैचारिक कोंडी होते, अशीही वामनरावांच्या वाङ्मयीन कूट प्रश्नाची मूळ भूमिका आहे.

## ऐतिहासिक व पौराणिक कसोटा

आतां या प्रमेयाला त्यांनी लावलेली पहिली कसोटी ऐतिहासिक वा पौराणिक उदाहरणांतील अनुभवाची—

अनुभवाच्या कसोटीची म्हणून जर इतिहास पुराणांतून उदाहरणें द्यावयाचीं तर तीं समाधीच्या योगनिद्रेंत देहभान विसरलेल्या असामान्य अशा अनन्य अशा भक्तांची नकोत काय? उलट वामनरावानीं जीं उदाहरणें दिलीं आहेत, तीं कुणाचीं? गीतेच्या नवव्या अध्यायांतील अभिप्रेत अशा 'नित्याभियुक्त' अनन्य भक्तांचीं नव्हेत. हें त्यांच्याच लेखांतील खालील अवतरणावरून दिसून येईल. ते लिहितात—'इतिहास पुराणांत अनेक दुर्गतीचे दुःखद् प्रसंग ईश्वरभक्तावर आल्याचें वर्णन आहे. अर्जुनाचे नशिबीं वनवास आला आणि बृहन्नडेचें रूप घ्यावें लागलें. **भीमाच्या** हातीं पोळपाट—लाटणें आलें. राजा **हरिश्चंद्र** भणंग भिकारी बनून, त्याच्या नशिबी डोंबाघरीं सेवावृत्ती आली. **शिवछत्रपतींना** आग्र्यांत अटक झाली, आणि **लो. टिळक आणि म. गांधी** यांना कारागृहवास भोगावा लागला!......**सॉक्रेटिसाला** विष खाऊन जीव द्यावा लागला. **तानाजी मालुसऱ्याला** सिंहगडावर प्राणाहुति, आणि **बापूगोखल्यांना** धारातीर्थी मरण पत्करावें लागलें! भक्ताच्या दुर्गतीची हीं उदाहरणें नजरेसमोर असतां ईश्वर योगक्षेम चालवतो, हें म्हणणें चमत्कारिक नव्हे काय?'

असा वामनरावांचा सवाल आहे. पण मी म्हणतों, यांत चमत्कार कसला? दुर्गती कोणती आणि या घटनांचा गीतेच्या नवव्या अध्यायांतील योगक्षेम शब्दांच्या अर्थाशीं अर्थाअर्थी संबंध काय? जगांत, सुखदुःख, जन्म-मृत्यु अढळ आहे. **जीवन कलहांत जीवमात्राला नियतीनें कर्माचें बरेवाईट फळ भोगणें अटळ आहे!—जन्मजन्मांच्या** संचितान्वयें कर्मफलानुसार त्याला भोगावे लागणारे **भोग तो कसे टाळूं शकेल?** तो ते टाळूं शकेल असें मानणें म्हणजे गीतेंतील अनेक वचनांनाच हरताळ फासल्या-

सारखें होणार नाहीं काय? **शिवाय** अर्जुनादि भक्तांची **ही दुर्गती कशी?** भावाचें वचन खरें करण्यासाठीं वडील भीमार्जुनांनीं अगर,स्वतःचें स्वप्नांत दिलेलें वचन खरें करण्यासाठीं हरिश्चंद्रानें, तसेंच तत्त्वपालनासाठीं छत्रपति, लोकमान्य अगर महात्माजी यांनीं, स्वेच्छेनें जर आपत्तींत उडी घेतली, तर ती दुर्गती कशी? 'सुखदुःखे समेकृत्वा···युद्धाय युज्यस्व' (गीता—अ. २; श्लो. ३८) अशी गीतेचीच शिकवण आहे ना? ध्येयसिद्धीसाठीं भोग भोगून या कर्मयोगी कर्मवीरांनीं शेवटीं यशाचें आणि कीर्तीचें वैभव शिखर गांठलेंच ना? अज्ञातवास आणि वनवास संपून पांचहि पांडवांना हस्तिनापुराचें आणि आग्र्याच्या किल्ल्यांतून सुटका होऊन, छत्रपतींना रायगडचें सिंहासन लाभलेंच ना? लोकमान्य आणि महात्माजी यांनीं भारत स्वतंत्र केलाच ना? धर्माच्या व देशाच्या अभ्युदयासाठीं देहार्पण करणारे हुतात्मे सॉक्रेटीस, तानाजी, बापू गोखले, हे ध्येयसिद्धीसाठीं धारातीर्थीं पडून नष्ट झाले कीं—'न मे भक्तः प्रणश्यति' या न्यायानें अमर झाले? सारांश, मला इथें इतकेंच म्हणायचें आहे कीं, अनुभवाच्या कसोटीची म्हणून वामनरावांनीं घेतलेली हीं ऐतिहासिक व पौराणिक उदाहरणें हीं इथें मुद्याला धरून नाहींत. तीं गैरलागू आहेत, हें इतकें उघड आहे कीं त्यावर यापेक्षां अधिक लिहिण्याची जरुरी नाहीं.



प्रा. **विश्वनाथ गोपाळ शेट्ये**

## दुसरी कसोटी पहा

आतां **दुसरी कसोटी** शब्दार्थ सातत्य आणि संदर्भ संबंधींची—

गीतेंत योगक्षेम शब्द, अ. २ श्लो. ४५ मध्यें 'त्रैगुण्य विषया वेदाः...... निर्योगक्षेमो भवार्जुन' आणि अ. ९ श्लो. २२ मध्यें, 'अनन्याश्चितयन्तो मां—तेषां योगक्षेमो वहाम्यहम्' असा दोनच जागीं आला आहे.

यांतील दुसऱ्या अध्यायाचे आरंभीं कौरव पांडव युद्धाचे वेळीं रणांगणावर किंकर्तव्यमूढ झालेल्या अर्जुनाला भगवंतांनीं क्षुद्र मनोदौर्बल्य टाकून आणि व्यामोह सोडून 'उत्तिष्ठ युद्धाय कृतनिश्चयः'—

'ऊठ आणि युद्धाला सज्ज हो—ठार झालास तर स्वर्ग मिळेल, विजयी झालास तर पृथ्वीचें राज्य मिळेल,' याच मोक्षाच्या आड न येणाऱ्या पण ऐहिक कर्तव्यतत्पर करणाऱ्या शब्दांत उपदेश केला आहे. अर्थात्, या संदर्भात या दुसऱ्या अध्यायांतील योगक्षेम शब्दाचा अर्थ ऐहिक निर्वाह हाच असणार हें उघड आहे, आणि स्वतः वामनरावानांही हाच अर्थ संमत आहे.

आतां नवव्या अध्यायांतील योगक्षेम शब्दाचा संदर्भानुसार काय अर्थ जुळतो तें पाहूं.

नवव्या अध्यायांत 'अनन्य भक्तियोग' सांगितला असून, या संदर्भात श्लो. २२ मधील योगक्षेमं वहाम्यहम् यांतील **योगक्षेम शब्दाचा निश्चित नि निर्विवाद अर्थ कळायला छांदोग्योपनिषदांतील एक वेदांत सूत्र** आधीं कळायला हवें. एकदां मृत्यूनें देवाचा पाठलाग केला. तेव्हां ते भिऊन त्रयी विद्येच्या म्हणजे वेदांच्या आड दडले. छंदस् म्हणजे लपून बसण्याचें गुप्तस्थान म्हणूनच वेदांना छंदस ही संज्ञा आहे. पण तेथेंही मृत्यूनें देवांना गाठलें. तेव्हां ते तिथून पळून **ॐकाराच्या म्हणजेच ब्रह्मदेवाच्या निर्भय जागीं आसऱ्यासाठीं गेले.** या निर्भय जागीं मृत्यूची मात्रा चालत नव्हती म्हणूनच देव मृत्युच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन निर्भय झाले. **मुंडकोपनिषदांत विद्येचे परा** (श्रेष्ठ) **आणि अपरा** (कनिष्ठ) असे दोन भाग सांगितले आहेत. त्यांपैकीं परा विद्या हीच ब्रह्मविद्या आणि अपरा म्हणजे ऋग्वेदादि त्रिवेद आणि व्याकरणादि वेदांगें. (अ. ९; श्लो. २० आणि २१ मध्यें) ज्या 'त्रैविद्येचा' उल्लेख आहे ती अपरा विद्या आणि श्लो. २२ मध्यें ज्या अनन्य भक्तीचा नि उपासनेचा उल्लेख आहे ती परा विद्या. **संदर्भ** नीट समजण्यासाठीं **या दोन्हीं श्लोकांचा अर्थ** आपण **पाहूं.** 'त्रैविद्येचें अध्ययन करणारे भक्त यज्ञयोगांनीं माझें यजन करून स्वर्ग मिळवतात. (श्लो. २०) पण त्या विशाल स्वर्ग लोकींचे दिव्य सुखोपभोग भोगून (क्षीणे पुण्ये) पुण्याची पुंजी संपली कीं मृत्युलोकीं फिरून जन्मास येतात (श्लो. २१) आणि या पुढील **श्लो. २२** यांतच योगक्षेम शब्द आहे, त्यांत माझी अनन्य भक्ति करणाऱ्या आणि नित्य योगयुक्त समाधींत असणाऱ्या अनन्य **भक्तांचा योगक्षेम** मी चालवतों, हे शब्द आहेत. यांतील योगक्षेम शब्दाच्या अर्थांत मी—त्यांची **अध्यात्म प्रगती फुकट जाऊं देत नाहीं, उलट ती अधिक प्रगतीपर होईल,** अशी दक्षता घेतों, हाच अर्थ अभिप्रेत आहे. इतर सामान्य भक्तांप्रमाणें त्याना स्वर्गप्राप्ति तर होतेच पण यापेक्षांही अधिक उच्चतर लाभ म्हणजे (पोटाला अन्न आणि कमरेला वस्त्र एवढाच संकुचित नव्हे तर) जीवन्मुक्ती असाच निष्कर्ष कुणीही घेईल, आणि स्वतः वामनरावानीं तोच घेतला आहे, तो बरोबर आहे

## शांकरभाष्य काय म्हणतें ?

पण असा अर्थ घेतल्यानें त्यांच्यामतें जो एक अनवस्था प्रसंग उत्पन्न होतो त्यानेंच ही कोंडी होते. **अ. ९ मध्यें जर योगक्षेम शब्दाचा अर्थ ऐहिक निर्वाह आहे तर शब्दार्थ-सातत्याचे न्यायानें** ( म्हणजे एकाच ग्रंथांत अनेक जागीं लेखकानें वापरलेल्या एकाच शब्दाचा **एकच अर्थ** घेणें युक्त या दृष्टीनें ) अ. ९ मध्येंही **ऐहिक निर्वाह हाच घेणें इष्ट आणि तो तसा घेतला तर संदर्भाला जुळत नाहीं.** अतएव ही सुद्धां एक प्रकारें अशी वैचारिक कोंडीच निर्माण होते.

पण वामनरावांची ही कल्पना अतिरंजित आणि अतिशयोक्त अशीच मानावी लागेल. कारण, वाङ्मयांत दोन भिन्न ग्रंथांत वा एकच ग्रंथांत एकच शब्द अनेक जागीं संदर्भानुसार भिन्न अर्थीं वापरतां येणार नाहीं असें थोडेंच आहे. याला गीतेचेंच उदाहरण घेऊं. **गीतेंत 'योग' हा एकच शब्द अनेक जागीं अनेक अर्थांनीं वापरला आहे.** हें जर खरें तर योगक्षेम शब्दहि दोन ठिकाणीं संदर्भानुसार दोन शब्दहि दोन वेगळ्या अर्थानें घेणें, यांत अडचण कोणती ? आणि ही वैचारिक कोंडी कशी ? आतां ही वैचारिक कोंडी होते. याला वामनरावांच्या मतें आणखी एक कारण आहे. या शब्दाचा अर्थ त्यांच्या **मतें पारमार्थिक,निर्वाह असा आहे.** आणि **शांकर भाष्यांत** आद्य शंकराचार्यांनीं, आणि ज्ञानेश्वरींत **ज्ञानदेवांनीं ऐहिक निर्वाह असाच दिला आहे,** असें त्यांचें म्हणणें. वैचारिक कोंडी होते ती यामुळें. तेव्हां आपण आतां या दोन्ही ग्रंथांतील अर्थनिष्पत्तीकडे वळूं.

**शांकरभाष्यांत,** या श्लोकांतील 'योगक्षेमं वहाम्यहम्' यावर जी टीका आहे त्यांत एक सूत्र आहे आणि खालीं एक टीप आहे. मूळ सूत्रांत व्युत्पत्ती अशी आहे—

'योगः अप्राप्तस्य प्रापणम्। क्षेमस्तद रक्षणम्। तद उभयं वहामि। प्रापयामि अहम् इति।'

हा अर्थ अगदीं स्पष्ट आहे. यांत **अप्राप्य** शब्द असता, तर कदाचित् प्रश्न वेगळा होता. पण शब्द आहे **अप्राप्त.**

अप्राप्ताची प्राप्ती तो योग. आणि प्राप्तीचें रक्षण म्हणजेच क्षेम. आतां अनन्यभक्ताला अप्राप्त काय? तर ज्याच्या प्राप्तीसाठीं तो अनन्यभक्ति करतो तेंच—निःश्रेयस. यावरूनही शांकरभाष्यांत योगक्षेम याचा अर्थ पारमार्थिक कल्याण, असाच होत नाहीं काय ?

पण वामनरावांचा सारा भर आहे, या खालील टीपेवर. ती टीप अशी आहे—

'ननु अन्येषां अपि भक्तानां... योगक्षेमं वहाम्यहम् !'

माझ्या मतें, या टीपेचा हेतु—अनन्य भक्त आणि इतर भक्त—पैकीं इतर सामान्य भक्त स्वतःकरतां स्वतः योग-

क्षेमाची इच्छा करतात, तेव्हां, देवाला म्हणायचें आहे, कीं त्यांच्या इच्छेनुसार त्यांचा योगक्षेम मी चालवतोंच पण जे अनन्यभक्त समाधीच्या योग स्थितींत अप्राताच्या प्राप्तीसाठींच फक्त मला भजतात त्यांचाही योगक्षेम आपण चालवतों. हें सांगण्यासाठींच ही टीप आहे. आणि या टीपेंतही उदरंभरण, पोटापाण्याचा **ऐहिक निर्वाह** हे अगर या सारखे शब्द कुठेंच नाहींत. मुख्य सूत्रांत अगर टीपेंत योगक्षेम हा एकच शब्द आहे. आणि त्याचा स्पष्ट अर्थ मूळ दिला आहे, त्यावरूनहि टीपेंतील विवरणांचा व्यापक अर्थच निघतो. संकुचित निघत नाहीं, हें उघड आहे.

## ज्ञानेश्वरींतील स्पष्टीकरण

आतां **ज्ञानेश्वरींत**—

खालील ओंवी आढळते—

‘ऐसा मनीं जो जो धरिती भावो।  
तो तो पुढांपुढां लागे तया देवो॥  
आणि दिधलियांचा **निर्वाहो**।  
तोही मीच करी॥’

यांतहि **निर्वाह** शब्द आहे, पण **ऐहिक** कुठेंच आढळ होत नाहीं. नुसत्या निर्वाह या शब्दावरूनच तो **ऐहिक निर्वाह** असाच अर्थ वामनरावांनीं घेतला असावा. पण, प्रपंच वा संसार–(तसाच निर्वाह ही) गृहस्थाश्रमी माणसाचा तद्वत् संन्याशाचाहि असूं शकतो!

या ओंवीचा अर्थही साकल्येंकरून विचारांत घेतां, तो ऐहिक नसून पारमार्थिक आहे, हें सहज पटण्यासारखें आहे. पहिल्या चरणांतील भावो म्हणजे भक्तिभाव. जे भक्त अंतःकरणपूर्वक माझ्याठायीं भाव ठेवून माझें भजन करतात त्या अनन्य भक्तांचा तो भाव त्यांच्या तपस्येंत पुढेंपुढें जाईल, वर्धिष्णु होईल, प्रगतीपर राहील, अशीच प्रेरणा मी त्यांना देतों. म्हणजेच त्यांचा निर्वाहही मीच करतों.

मग ही प्रेरणा, हा निर्वाह ऐहिक कसा होईल? तो ऐहिक नाहीं, पारमार्थिक आहे, असेंच माझ्या अल्पमतीला वाटतें. **पण मलाही पेच पडला आहे तो यामुळेंच.** ‘व्यासादिक आद्य मुनींना अगर भाष्यकारांना मी खोटें कसें म्हणूं? कारण, जाणूनबुजून ते कांहींतरीच बोलायचे नाहींत असें **वामनराव म्हणतात,** त्याच **भाषेंत मीही म्हणतों कीं चिंतनशील मनोवगाहनानें वामनरावांनीं घेतलेला निर्णय जाणून-बुजून ते कांहींतरीच कसा घेतील?** आणि म्हणून तो खोटा, असें तरी म्हणायचें धाष्ट्र्य मी कसें करूं? या भावनेनेंच वादांकरतां कांहीं वेळ शांकरभाष्य आणि ज्ञानेश्वरी या दोहोंच्या विवरणांत वामनराव म्हणतात, तोच ऐहिक निर्वाह हा अर्थ खरा आहे, असें मानलें—

तरीहि, अर्थ समन्वयाच्या एका नव्या दृष्टीनें या प्रश्नाकडे पहातां मुळांतच मुळीं हा कूट प्रश्न आहे, असें म्हणतां येत नाहीं आणि कुणी तसं म्हटलें, तर तो सहज उलगडून दाखवतां येण्याइतका सोपा

आहे, असें माझें म्हणणें—तें कां व कसें ? हें आतां आपण पाहूं.

'**संकुचित अर्थ व्यापक अर्थात सामावला जातो,** असा एक सर्व सामान्य तार्किक सिद्धांत आहे. **तर्कशास्त्र राहोच, पण कायद्याच्या भाषेंतही** General Clauses Act मध्यें, 'The word **man** includes **woman**. तो मध्यें ती येते. **गीतेंतही या तत्वाला** आधार मिळूं शकतो. 'यावानर्थ उदपानें सर्वतः संप्लुतोदके' (अ. २ श्लो. ४६) 'चोहोंकडे सर्व जलमय झालें असतां त्यातील विहीर आंत सामावते यांतही वरील कल्पनाच अभिप्रेत आहे. या कल्पनेनुसार योगक्षेम शब्दाचा केवळ ऐहिक वा केवळ पारमार्थिक असा एकांगी न घेतां संकुचित ऐहिक अर्थाचा व्यापक पारमार्थिक अर्थानें अंतर्भाव होईल असाच अर्थ घेणें युक्त आणि इष्ट नाहीं काय ?

## समन्वयाचा दृष्टिकोन

नित्याभियुक्त अनन्य भक्त योग समाधींत ध्यानस्थ असतां, म्हणजेच ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी, अशा अगतिक स्थितींत तो असतानांच त्याला त्याची महान् सिद्धी याचि देहीं याचि डोळां त्याला पुरी करायची असते; या दृष्टीनें त्याच्या पारमार्थिक परिपूर्ततेची हमी घेणारा देव त्याच्या देह धारणेच्या ऐहिक निर्वाहाची आनुषंगिक जबाबदारीहि देव घेतो, असाच अर्थ अभिप्रेत नाहीं काय? आणि समन्वयाचा असा व्यापक अर्थ घेतला तर वामनरावांना पडलेली वैचारिक कोंडीहि आपोआप सुटणार नाहीं काय ?

**समन्वयाच्या याच दृष्टीकोनांतून पहातां शांकरभाष्याच्या टीपेंतील योगक्षेम शब्द** वा ज्ञानेश्वरींतील 'निर्वाहो' शब्द यांत संकुचित ऐहिक अर्थ व्यापक पारमार्थिक अर्थात सामावला आहे हें कुणाही सूज्ञ वाचकाला पटेल, यांत मला तरी शंका वाटत नाहीं.

शांकर भाष्याच्या टीपेंतून ऐहिक निर्वाह असा अर्थ ध्वनित होतो, हें वामनरावांचें म्हणणें मानलें तरीही फारतर असें म्हणतां येईल कीं मूळ **सूत्रांतील व्यापक अर्थातून देहधारणेचा संकुचित अर्थ कुणी गाळील, तर तो तसा गाळला जाऊं नये, असा इषारा देण्यासाठींच आचार्यांनीं ही टीप जोडली असावी,** असेंच दिसून येतें.

तसेंच, **ज्ञानेश्वरींतही 'दिधलियाचा निर्वाहो तोही मीच करी'** यांतील तोहीवर जोर देऊन लौकिकी निर्वाह असाच एकांगी अर्थ वामनराव लावीत असतील तर मी म्हणेन याच **तोही शब्दानें** पारलौकिक बरोबरील **लौकिकी निर्वाहाची सुद्धां जबाबदारी** माझ्यावर आहे असेंच देव ध्वनित करतो, असाच समन्वयाचा अर्थही जुळतो असें कां मानूं नये ?

## वारकरी सांप्रदायाचा दुजोरा

शिवाय भागवत वारकरी सांप्रदाया-

तील संत कवींचाही या निष्कर्षाला दुजोरा मिळतो.

संत तुकाराम महाराज एका अभंगांत म्हणतात, भक्तिभावाला भुकेला पंढरीचा पांडुरंग —

**'भक्तांचा भार वाहे माथा।**
**करी योगक्षेम चिंता ॥**
**भुलों नेदी वाट।**
**करीं धरूनी दावी नीट।**

यांत पांडुरंग भक्ताच्या योगक्षेमाची चिंता करतो म्हणजे काय करतो ? त्याचा लौकिक निर्वाह तर चालवतोच पण त्याला परमार्थाची वाट चुकूं देत नाहीं. हात धरून नीट त्याला त्या वाटेस लावतो. ज्ञानदेवी म्हणते त्याप्रमाणें 'तो तो पुढा पुढा लागे तया देवो.'

अखेर व्यापक अर्थात सामुदायिक अर्थ अशा या तत्वाला यापेक्षाही अधिक ठाम आणि निश्चित आधार **वामन पंडीतांचा.**

प्राचीन मराठी संत वाङ्मयांत गीतेचा अनुवाद करणारे तुल्यबल असे दोन ग्रंथ— एक ज्ञानेश्वरांची—**भावार्थ दीपिका** आणि दुसरी वामन पंडितांची **यथार्थ दीपिका.** ज्ञानेश्वरीचा उल्लेख वामनरावानीं आपल्या लेखांत केला आहे. पण त्यांनीं पंडितांचा अगर त्यांचे यथार्थ दीपिकेचा नामनिर्देशही त्यांत करू नये, बुद्धिवादी व स्वमताभिमानी आजच्या या वामनाला **मज नावडे थोरांचीही वाणी** असें म्हणून परंपरेला ठोकर देणाऱ्या त्या काळच्या वामनाची आठवणही होऊं नये, याचेंच मला मोठें आश्चर्य वाटतें. तशी त्यांना ती झाली असती आणि या श्लोकावरील वामनी टीका आणि योगक्षेमाचा यथार्थ अर्थ त्यांनीं विचारांत घेतला असता तर माझी खात्री आहे कीं, त्यांना या प्रश्नावर लख्ख प्रकाश पडून, ही वैचारिक कोंडीच पडली नसती.

ज्ञानेश्वरींत काव्य आहे, ओज आहे, तेज आहे, सारें कांहीं आहे. मराठींत पहिला श्रेष्ठ काव्यग्रंथ या दृष्टीनेंही ज्ञानदेवीची थोरवी मोठी आहे. तरीपण अर्थानुवादाच्या दृष्टीनें 'व्यासाचा मागोवा घेत—भाष्यकारातें वाट पूसत' असाच हा ग्रंथ लिहिला असल्यामुळें त्यांत परंपरा आहे, हें नाकारतां येत नाहीं.

## वामनांची निर्भय वृत्ति

आतां वामनी टीकेंत, पांडित्य असेल, तर्क कर्कशता असेल, गद्य व्याख्यान असेल, तरीपण तींत निर्भय स्वतंत्र वृत्ति आहे हें मान्य करावेंच लागेल. गीता—रहस्यकार लो. टिळकांच्या कितीतरी आधीं पारंपारिक अर्थाला पहिली ठोकर देणारा पहिला बंडखोर टीकाकार वामन पंडितच होय! वामनी टीकेंत भावार्थापेक्षां यथार्थता आहे, आणि म्हणूनच यथार्थदीपिका हें तिचें नांव सार्थ आहे ! हें पंडिताच्या खालील उक्तीवरूनच दिसून येणार आहे.

'कोण्या भिसे तरी कोणी।
गीतार्थ अन्यथा वाखाणी।
**मज नावडे ती थोरांचीही वाणी।**
**काय करूं मी श्रीकृष्णा?'**

याच हिरीरीनें आणि अंतःकरणाच्या तळमळीनें 'अनन्याश्चिंतयन्तो' या श्लोकाच्या टीकेंत अगदी पहिल्याच ओवींत ते असाच रोकडा आणि प्रांजल सवाल टाकतात कीं, 'अगा अर्जुना, अनन्य भक्त जर नश्वर पदार्थांची इच्छा करीत नाहीं तर मग योगक्षेमाची हमी देणारा देव तरी त्याला नश्वर पदार्थ देण्यापुरतेंच तेवढें दातृत्व दाखवील, असें म्हणणें, हें देवाच्या देवपणाला शोभेल काय! मग तो योगक्षेम चालवतो म्हणजे काय करतो?

'योगक्षेम वहातों म्हणोनी ।
बोल, काय भावें करूनी?
कीं,—नव्हे तें ज्ञान देउनीं
बिंबवितों, करतों जतन तें ।'

मग अशा भक्ताला देव देतो काय? तर –

'न प्रार्थितां शाश्वत सुख निधान ।
मोक्ष, देतों ।'


पंडितांच्या दृष्टीनें योगक्षेमाचा अर्थ पारमार्थिक निर्वाह हाच आहे पण तो एकांगी नाहीं—तर मोक्षतपस्येच्या सिद्धीला लागणारी देहधारणाही त्यांत अंतर्भूत आहे. हें खालील अगदीं निःसंदिग्ध शब्दांत त्यांनीं स्पष्ट मांडलें आहे.

'अन्नवस्त्रादि पदार्थ ।
याचा योगक्षेम वहातों ।
इतुकाचि अर्थ कोणी करिती ।
तो यथार्थ नोहे ॥
गजांत लक्ष्मी देतो समर्थ ।
तो पाद रक्षाची चिंता वहातो ।
म्हणणे हें काय? ।
न पटे मज ॥
जो करून देतो विवाह ।
तो हळदीचा न करील काय निर्वाह ।
ज्ञानें नाशी जो भक्ताचें अज्ञान ।
अन्नवस्त्रादि नेदील तो काय ।

प्राचीन वामनाच्या, पारंपारिक रूढ अर्थाला ठोकर देणाऱ्या या वरील एकाच यथार्थ उक्तीनें, अर्वाचिन वामनाची तथाकथित वाङ्मयीन कोंडीची हांडी फुटेल, यांत शंका कसली?


दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :–DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM.–DADAR)



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबीलदास रोड, दादर ( W. R.), मुंबई २८.

# कुठें ती

[ चाल : भक्ति

कुठें ती शांति ?

जी जिवा होय विश्रांति ॥ धृ० ॥

अशनीं शयनीं ना घरिंदारीं
कलत्र सुपुत्र भव परिवारीं
धनानंदही ना सुखकारी । मिळेना शांति जी० ॥ १ ॥

विषण्ण फिरतां शांतीसाठीं
भ्रमतों अखंड पृथ्वीपाठीं
त्रिखंड हिंडुनि पडे न गांठीं । इथें ना शांति जी० ॥ २ ॥

× × ×

प्रशांत उदधी असतां जातां
तिथें तयाला पुसतां वार्ता
लहरी पसरली गर्जत उठती । इथें ना शांति जी० ॥ ३ ॥

प्रातः संध्या सशास्त्र करितां
बालार्कातें अर्घ्य सिंचितां
पुसें तयातें, झाला वदता । इथें ना शांति जी० ॥ ४ ॥

तारांगणिं पूर्णेन्दु उदेला
अंजलि जोडुनि पुसे तयाला
दिसलि तुला का, परि तो वदला । इथें ना शांति जी० ॥ ५ ॥

नभीं विहरलों, जलांत डुबलों
जनांत भ्रमलों, वनांत शिरलों
वनवन फिरलों, परि नच धालों । कुठें ना शांति जी० ॥ ६ ॥

अंतीं, पावन शिरडी गांठुनि
सद्गुरु साईबाबा स्मरुनि
ध्यानमग्न हो, वाणी श्रवणीं । ॐ तत् शांति जी० ॥ ७ ॥

वेड्या मनुजा कां धडपडसी
व्यर्थ कशाला उगाच भ्रमसी ?
शांति नसे का तुझ्याचपाशीं । ॐ तत् शांतिः जी० ॥ ८ ॥

# शांती ?

ग वेणी ]

काशि कशाला शिर्डी मग ती
व्रतें कशाला वैकल्यें तीं
जनिं ना वनिं परि मनीं देख ती । ॐ तत् शांति जी० ॥ ९ ॥

× × ×

दिव्यप्रभा हृद्यांत फाकली
हृदिं सिंहासनिं उभी ठाकली
दिव्य देवता दृष्टीस पडली । मिळे ती शांति जी० ॥ १० ॥

शांत हृदय हो, शांत सदय जग
प्रशांत आत्मा शांतहि मन मग
शांतिच शांती जनिं वनिं मनिं मग । मिळे ती जी० ॥ ११ ॥

पिंडीं त ब्रह्मांडिं व्यापिलें
निसर्ग नियमा या अनुसरलें
शांतिब्रह्म विश्वांत कोंदलें । मनांत शांति जी ॥ १२ ॥

विश्वाकाशी वितान झुलतें
नक्षत्रांची माला हलते
शांति देवता नभिं ती डुलते । नभांत शांति जी० ॥ १३ ॥

रत्नाकर–रत्नांनी सजते
सागर साम्राज्ञी जी खुलते
शांति देवता जलिं ती डुलते । जलांत शांति जी० ॥ १४ ॥

× × ×

धन्य प्रगटली, धन्य गवसली
शांति देवता आत्मिं विटनली
संतत राहो हृदिं या भरली । ॐ तत् शांतिः
ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥ १५ ॥

आबा शेट्ये
माजी प्राध्यापक, गोगटे कॉलेज,
रत्नागिरी

# भक्तांचा पाठिराखा पांडुरंग

## संत सखूची कहाणी

लेखक : पु. बा. कुळकर्णी

**संत सखूबाईची पांडुरंगावर अढळ निष्ठा होती. देव भावाचा भुकेला. संत सखूच्या धांव्याला पांडुरंग धांऊन गेला आणि तिची पंढरीला जाण्याची महत्वाकांक्षा त्यानें कशी पुरविली ती पहा !**

'बेवकूब ! त्या उडाणटप्पू लोकांबरोबर तूं पंढरपूरला जाणार होय ! नाहीं मिळायचं जायला ! तूं लग्न झालेली बायको आहेस ! वाटेल त्या लोकांबरोबर भटकायला लाज नाहीं वाटत तुला ? खबरदार ! याद राखून ठेव ! या घराबाहेर पडलीस तर गळा दाबून प्राण घेईन तुझा ! एकादशी बिकादशी मी कांहीं जाणत नाहीं !'

एका हातानें त्या बाईचा बुचडा हातांत धरून दुसऱ्या हातानें कपाळावरील घाम पुसतां पुसतां त्या महा पराक्रमी पुरुषानें गर्जना केली.

'बेटा ! मी आरंभापासून तुला सांगत आहे कीं, ती विश्वास ठेवण्यालायक बाई नाहीं. कोणती घरंदाज बाई आपलें घरदार व नवरा सोडून साधूसन्याशांबरोबर भटकण्यासाठीं बाहेर पडण्याचा हट्ट धरून बसेल सांग बरें ?'

असें बोलून त्या बाईनें आपल्या मुलास एका बाजूस खेचलें व तिच्या कानांत ती कांहीं तरी मंत्र पुटपुटली. तिनें सांगितलेला बेत त्यालाही मानवला. नंतर दोघांनीं त्या तरुण बाईला फरफटत घरांतील एका काळोख्या खोलींत नेलें व तेथें एका खांबाला तिला दोरखंडांनीं गच्च बांधून ठेविलें. ती ओरडत होती; कोकलत होती. पण ऐकतो कोण ? खोलीचें दार बंद करण्यांत येऊन तिला कुलूप ठोकण्यांत आलें.

ईश्वरभक्त संत सखूबाईचें नाव कोणी ऐकिलें नाहीं ? तिला देवभक्तीपासून परावृत्त करण्यासाठीं तिच्या नवऱ्यानें व सासूबाईनें तिचा वरीलप्रमाणें छळ चालविला होता.

सखूच्या जीवनांत रोजच्या रोज असले प्रकार घडत होते. 'रोजरोज मरे

त्यास कोण रडे' अशी तिची अवस्था झालेली होती. नवऱ्यासह घरांतील साऱ्या माणसांनीं तिचा छळ आरंभिला होता. जणूं काय त्यासाठींच ती या घरांत आली होती.

देव तिचा पाठीराखा. सारें आकाश कोसळलें तरी पांडुरंग मला अंतर देणार नाहीं ही तिची श्रद्धा. ध्यानीं-मनीं सदासर्व काळ पांडुरंग! त्याच्या दर्शनासाठीं ती भुकेलेली होती. त्याच्या चिंतनांत तिची तहानभूक हरपली होती! पांडुरंगाला आठवून ती म्हणत असे, 'देवा! तूं इतका कां कठोर झालास माझ्यावर? एकादशी सारख्या पवित्र दिवशीं तुझं दर्शन व्हावें म्हणून मी धडपडतें आहें सारखी. तुला कशी रे दया येत नाहीं माझी! माझ्या पतीला आणि घरांतील माणसांना तुझ्या भेटीची कधीं रे इच्छा होणार? त्यांच्या ठिकाणीं तुझ्या भेटीची प्रेरणा तूं कां रे करीत नाहींस? त्यांच्यांत माणुसकी येणार तरी कधीं? त्यांना तुझ्या भेटीची इच्छा झाली म्हणजे मलाही तुझ्या दर्शनाचा लाभ त्यांच्याबरोबर घडणार नाहीं का?'

सखूमधील देव जागा झालेला होता. तिचें देवाधर्माकडे सतत लक्ष होतें. भक्ताची इच्छा परिपूर्ण करणें ही देवाची जबाबदारी. माणसें आपली जबाबदारी विसरतात. परंतु देवाला विसर कसा पडेल! भक्ताची पांडुरंगाला चिंता. तोच इच्छा उत्पन्न करणारा व तोच ती पूर्ण करणारा.

सखूला खोलींत कोंडून ठेवण्यांत आल्यानंतर एक तरुण बाई त्या घरांत आली व तिनें त्या खोलीचा दरवाजा हळूच उघडला. सखूजवळ जाऊन तिच्या पाठीवरून हात फिरवीत ती बाई म्हणाली, 'सखू! पांडुरंगाच्या भेटीसाठीं तुझा जीव तळमळत आहे. त्याची व तुझी ताटातूट घडवून आणण्यांत या लोकांना काय मौज वाटत वाटते समजत नाहीं. मी चांगली ओळखतें तुला; पण तूं मला ओळखत नाहींस; म्हणून काय झालें? तुझी तळमळ मला समजते ग! म्हणून तर मी धांवत आलें तुझ्यासाठीं! मला तुझी दया येते. तुझे हे हाल पहावत नाहींत माझ्यानें! चल; ऊठ; मी तुझी सुटका करत्यें. तुझ्या जागीं मी रहातें इथें; तूं येथून जा; आणि उद्यां सकाळपर्यंत तुझ्या पांडुरंगाचें दर्शन घेऊन परत इथेंच ये. तोंपर्यंत मी इथें रहातें!'

असें म्हणून त्या बाईनें सखूला त्या जखडलेल्या स्थितीतून मोकळे केलें व स्वतःस बांधवून घेतलें.

तिला बांधीत असतां सखूच्या मनाला किती कष्ट झाले; परंतु करणार काय? देवाच्या भेटीसाठी तिनें सारें दुःख गिळून टाकलें. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ती बाई सखूला म्हणाली, 'हें बघ सखू! तूं कांहीं काळजी करूं नकोस. ज्या भक्तांच्या मेळ्याबरोबर तूं जाणार होतीस तो मेळा फारसा दूर गेलेला नाहीं. तो जवळच

आहे. सरळ उजव्या दिशेनें जा. माझी चिंता करूं नकोस. निर्धास्त रहा. दर्शन घे आणि ताबडतोब नीघ.'

सखूचे डोळे पाणावले. इकडे आड तिकडे विहीर अशी द्विधा स्थिती झाली होती तिच्या मनाची! मोठ्या कष्टानें त्या बाईचा निरोप घेऊन ती पंढरपूरच्या वाटेला लागली. ज्या मेळाव्याबरोबर जाण्याचें तिनें ठरविलें होतें त्या भक्तांच्या मेळाव्यांत ती लौकरच दाखल झाली.

त्या भक्तांच्या मेळ्याचें नेतृत्व कबीरदास नांवाच्या एका संताकडे होतें. तो जातिवंत भगवद्भक्त होता. त्याला सखूच्या भक्तीची पूर्ण कल्पना होती. सखूबद्दल त्याला आत्यंतिक सहानुभूती वाटत असे. तो पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठीं निघाला. परंतु सखूला मागें रहावें लागल्यामुळें त्याचें पाऊल आस्ते आस्ते पडत होतें; त्याचे पाय जड झाले होते. सखूसाठी त्याचा जीव तीळ तीळ तुटत होता. इतक्यांत सखूला आलेली पाहून त्याच्या नेत्रांतून सानंदाश्रू वाहूं लागले. दिव्य दृष्टीनें ही न घडणारी घटना कशी घडून आली हें त्यानें ओळखलें. 'भक्तीबळानें पांडुरंगाला जिनें बांधून टाकलें आहे तिला बांधूनठेवायला कोण समर्थ आहे? पांडुरंगाची लीला अगाध आहे!'

सखू पंढरीला आली आणि पांडुरंगाच्या दर्शनानें देहभान, घरदार नवरा, सासूबाई सारें सारें विसरली! खरोखर तिचें देहभान हरपलें. पांडुरंग भजनांत ती तल्लीन होऊन गेली. आपण कोणत्या स्थितींत होतों, आपली सुटका कोणी केली, आपण पंढरपूरला कोणामुळें आल्यें व परत लौकर घरीं जायचें आहे, या साऱ्या गोष्टींचा तिला विसर पडला. ती भक्तांबरोबर भजनानंदांत गुंग झाली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सखूच्या नवऱ्यानें खोलीचा दरवाजा उघडला व चेष्टेनें तो सखूला म्हणाला, 'कसं काय? घडलें ना पांडुरंगाचें दर्शन! पंढरपूरला जायचं होतं नाहीं का तुला?'

'पुरे झाली हो चेष्टा! सोडा पाहूं मला अगोदर! ठणकतें आहे सारं अंग माझं! हात जोडतें. यापुढें तुमच्या आज्ञेबाहेर मी जाणार नाहीं. माझं पंढरपूर इथंच या पायांपाशीं आहे! मला उमजलें हो आतां!'

सखूच्या पतीराजास आनंद झाला. आणि कां होणार नाहीं आनंद. आपण जी शिक्षेची योजना केली ती चांगली सोळा आणे फळास आली हें पाहून त्याला मनस्वी समाधान वाटलें. स्वतःच्या दूरदर्शीपणाचें कौतुक करीत त्यानें सखूच्या देहासभोंवारचे दोरखंडाचे वळसे कसले तरी गाणें गुणगुणत सोडविले व तिला बंधमुक्त केलें.

अशा रीतीनें व एवढ्या भव्य प्रमाणांत सखूची सुधारणा होईल असें कोणालाही वाटलें नव्हतें. तिच्या घरांतील माणसेंच काय, परंतु सारा गांव आश्चर्यचकित झाला! हा थरेपालट

एकाएकीं व एकदम झाला तरी कसा याचेंच प्रत्येकजण आश्चर्य करूं लागला. कोणी तरी जादूची कांडी फिरविली असावी, असें सर्वांना वाटूं लागलें.

कारण सखूचा नूर साफ पालटला होता. घरांतील माणसांच्या मनाविरुद्ध व जनरूढीविरुद्ध वागणारी ती पूर्वीची सखू आतां राहिली नव्हती. नवऱ्याच्या व सासुबाईच्या अर्ध्या वचनांत वागणारी ही नवी सखू अवतीर्ण झालेली होती. कां नाहीं ती सर्वांना आवडणार व हवी हवीशी वाटणार !

इकडे पंढरपूरला काय घडलें पहा ! सखू पांडुरंगाच्या पूजेसाठीं एका बागेंत फुलें तोडीत होती. तिला पांडुरंगाच्या सेवेशिवाय दुसरें कांहीं सुचत नसे. एक सुगंधी फूल तोडतां तोडतां तिच्या हाताला नागोबानें दंश केला. ती तेथल्या तेथेंच विव्हळत पडली. मंदिराजवळच्या बागेंतच हा प्रकार घडला. आजूबाजूच्या लोकांनीं तें दृश्य पाहिलें. लोक हळहळले व तिचें प्राणोत्क्रमण झालें या समजुतीनें तिला तेथून उचलून बाहेर नेऊन ठेवण्यांत आलें.

सखू सर्पदंशानें मरण पावल्याची बातमी तिच्या गावीं तिच्या नवऱ्याच्या कानापर्यंत जाऊन पोहोंचली, तेव्हां तो म्हणाला, वेडे आहेत बेटे ! वाटेल त्या बातम्या उठवितात. त्यांना माझें गृहसौख्य पहावत नाहीं आणि दुसरें काय ? माझी सखू इथें सुखरूप आहे !

पंढरपूरच्या लोकांना सखू सर्पदंशानें मरण पावली असें वाटलें खरें; परंतु पांडुरंगाच्या मनांतून तिला तारायचें होतें. कोणी एक वैद्य तिच्याजवळ गेला व मंत्रतंत्राच्या सहाय्यानें त्यानें सखूला जिवंत केलें !

सखू झोंपेतून जागी झाल्याप्रमाणें खडबडून उठली ती पांडुरंगाचें नांव घेत. वैद्य तिच्याजवळच बसलेला होता. त्यानें पोक्त सल्ला दिला कीं, ‘ आतां यापुढें तूं येथें क्षणभरहि राहूं नकोस. मी तुझ्या सांगाती येतों; आणि तुला तुझ्या गांवीं पोहोंचवितों. तूं आपल्या पतीची व घरांतील माणसांची सेवा कर. तीच पांडुरंगाची सेवा असें समज. प्रत्येक गोष्ट त्याच्या नांवानें कर. जें जें करशील तें त्याला अर्पण कर. त्यांतच तुझा उद्धार आहे. त्यासाठीं घरदार सोडून पंढरपूरला जाण्याची कांहीं जरूरी नाहीं. पतिसेवा, गृहसेवा हीच तुला पांडुरंगाच्या पायाशीं नेऊन ठेवील. कशाचीहि चिंता करूं नकोस. ’

सखूला त्या वैद्यराजाचें म्हणणें पटलें. ती पंढरपूर सोडून आपल्या घरीं जायला तयार झाली, एवढेंच नव्हेतर त्या वैद्याबरोबर ती निघाली.

गांवांतील तलावाजवळ सखूला सोडून तो वैद्य मागें फिरला आणि सखू समोर पहाते तों काय ? ज्या बाईनें तिची सुटका केली होती ती बाई कडेवर भरली घागर घेऊन उभी !

सखू धांवतच तिच्याजवळ गेली हात जोडून क्षमा मागत म्हणाली, माझी पूर्वजन्मींची जिवाची मैत्रीण

किती उपकार झाले तुझे माझ्यावर! क्षमा कर मला! तुला दिलेला शब्द मला पाळतां आला नाहीं. पंढरपूरला गेल्या-नंतर मला सार्‍या गोष्टींचा विसर पडला गडे! मी तरी काय करूं बाई! तुला माझ्यापायीं त्रास झाला असेल फार! मार बीर नाहीं ना खावा लागला?'

'नाहीं ग कांहीं नाहीं! सुटलें मी एकदांची! आतां ही घागर घे आणि लाग आपल्या कामाला. ही मी चालल्यें!

'नको ग नको! मला सोडून जाण्याची इतकी घाई करू नकोस! मी अपराधी आहें! मला क्षमा कर. करशील ना मला क्षमा? त्याशिवाय मी नाहीं जाऊं देणार तुला!' असें म्हणतां म्हणतां सखूनें त्या बाईचे दोन्हीं हात आपल्या हातांत घट्ट धरून प्रेमानें आवळले.

आणि त्याच क्षणीं एकाएकी वीज चमकावी तसा लख्ख व झगझगीत प्रकाश पडला आणि त्या डोळे दिप विणार्‍या प्रकाशांत सखू पहाते तों तिला समोर काय दिसलें?

तेथें ती बाई नव्हती. मग कोण होतें? हातीं शंख, चक्र, गदा व कमलपुष्पधारी सावळी गोजिरी भगवंताची हंसतमुख मूर्ती तिच्याकडे दयार्द्र दृष्टीनें पहात होती! ती मूर्ती पहातां पहातां सखूचे डोळे दिपून गेले!

"भगवंता! माझ्यासाठीं किती रे यातायाती केल्यास तूं!" असें म्हणतां म्हणतां सखू बेभान होऊन निश्चेष्ट जमिनीवर पडली!

— — —


# MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तर्‍हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

**माटुंगा क्लीनिंग वर्क्स**

स्थापना १९३४) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस्. व्ही. प्रधान

# योगी अरविंदांचें योग-सामर्थ्य

लेखक : आप्पाराव

**आपला भारत दीर्घ प्रयत्नांनीं १९४७ (१५ ऑगस्ट १९४७) मध्यें स्वतंत्र झाला; परंतु त्याच्यामागें योगी अरविंद यांच्यासारख्या योगेश्वराचें योगसामर्थ्य होतें. पाँडिचरी येथील आश्रमांत गेलीं चाळीस वर्षे योगाभ्यास करणारे व श्री अरविंदांचे एकनिष्ठ अनुयायी श्री. अंबूभाई पुराणी यांनीं सुमारें चाळीस वर्षांपूर्वी श्री अरविंदांची भेट घेतली, त्यावेळीं उभयतांत झालेल्या मुलाखतीची हकीगत, त्यांनीं लिहून नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'Life of Shri Arobindo' या चरित्रग्रंथांत आलेली आहे.**

१९४७ साल कोण विसरेल? भारताचें विभाजन होऊन तो स्वतंत्र होण्याची घडी जवळ येत चालली होती. त्या वर्षाच्या आरंभीं मी पांडिचरी आश्रमांतून बाहेर पडलों व त्या वर्षाच्या जुलैमध्यें परत आलों. त्यावेळीं ज्या ठिकाणीं मी पंचवीस वर्षें घालविलीं, त्या काळांतील अनेक आठवणींनी माझ्या मनांत गर्दी करून सोडली. प्रथम पांडिचरींत मी १९१८ सालीं गेलों; त्या काळापासून घडत गेलेल्या अनेक घटना माझ्या मनश्चक्षूंसमोर येऊं लागल्या. श्री अरविंद यांस त्यावेळीं मी पाहिलें तेव्हांही त्यांच्या ठिकाणीं दैवी तेजाचा आविष्कार झालेला मला आढळून आला. प्रथम अरविंदांस मी कधीं पाहिलें याचा मनांतल्या मनांत मी शोध करूं लागलों. फार मागच्या काळांत मला जावें लागलें. श्री अरविंद यांनीं पांडिचरी येथें 'आर्य' या नांवाचें मासिक सुरू करण्याचें १९१४ सालीं ठरविलें. त्यासंबंधीं 'बॉंबे क्रॉनिकल' पत्रांत जाहिरात आलेली होती. मी तेव्हां बडोदा कॉलेजमध्यें होतों. राजकीय वादळाचा तो काळ होता. विद्यार्थ्यांबद्दल संशय घेतला जात असे. अरविंदांचें मासिक! आणि मला तर वर्गणीदार व्हायचें होतें. कोणी माझा संशय घेऊं नये म्हणून कॉलेज बाहेर रहाणाऱ्या एका मित्राच्या पत्त्यावर मी नांव नोंदलें. 'आर्य' मासिकाच्याद्वारें अरविंदांचे जे लेख प्रसिद्ध होत असत त्यावरून उच्च कोटीला पोहोंचलेल्या

दैवी जीवनाचा हा एक महान् आदर्श आहे असें मला वाटूं लागलें.

## मी वर्गणीदार कां झालों ?

परंतु सगळें सोडून मी 'आर्य' मासिकाचा वर्गणीदार त्याकाळीं कां झालों ? या प्रश्नाचें उत्तर काय ?

त्याचें उत्तर 'आर्य' मासिक सुरू होण्यापूर्वीपासून त्याच्या संपादकांस मी ओळखत होतों.

१९०७ सालीं सुरत येथें राष्ट्रीय सभा मोडली. त्या ऐतिहासिक महत्त्वाच्या बैठकींत श्री अरविंद यांनीं फार महत्वाचा भाग घेतला होता. सुरतेहून ते बडोद्यास आले. आणि दांडिया बाजरमधील प्रो. माणिकराव यांच्या व्यायामशाळेंत त्यांचीं कांहीं व्याख्यानें झालीं, तीं अत्यंत परिणामकारक झालीं; एवढेंच नव्हे तर अनेकांच्या जीवनांत त्यांनीं क्रांति घडवून आणिली. मीही त्यांच्या त्या भाषणास हजर रहात असें. तेथें त्यांनीं सांगितलेल्या साऱ्या गोष्टींचें मला आकलन होत असे, असें मात्र नाहीं. परंतु त्यांची व माझी पूर्वीची ओळख आहे—केव्हांपासूनची, हें मात्र निश्चित सांगतां येणार नाहीं. १९०३ ते १९१० हा काळ भारताच्या दृष्टीनें अभूतपूर्व जागृतीचा व क्रांतिकारक घडामोडींचा होता. त्यानंतर या देशावर चळवळींच्या २।३ प्रचंड लाटा येऊन गेल्या; परंतु ती पहिली लाट अननुभूत व अनन्यसाधारण होती. त्याच काळांत भारताचें ध्येय निश्चित झालें व १९४७ सालीं साकार होऊं शकलें. तेथपर्यंत या देशाला अनेक स्थित्यंतरांतून व हालअपेष्टांतून पार पडावें लागलें.

## अखिल जगाच्या उद्धाराची दृष्टि

सर्व पुढाऱ्यांचें लक्ष स्वातंत्र्य प्राप्तीकडे लागून राहिलें होतें. त्याच्या पलिकडचें पहाणारे—स्वातंत्र्यप्राप्तीमुळें मानवाला पूर्णत्व प्राप्त करून घेण्याची शक्यता आहे हें पहाणारे फारच थोडे होते. कारण राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेणें हेंच केवळ एकमेव ध्येय नव्हतें. भारताचें सांस्कृतिक, आध्यात्मिक ऐक्य घडून आलें पाहिजे या भावनेनें प्रेरित झालेले कांहीं फार थोडे पुढारी त्याकाळीं प्रकाशांत आलेले होते. पं. मदन मोहन मालवीय रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी स्वामी: श्रद्धानंद यांच्यासारखे पुढारी राजकीय स्वातंत्र्याच्या पलिकडचें पहात होते. आणि त्यांतही श्री अरविंद यांची दृष्टि त्या दिव्यत्वाकडे प्रामुख्यानें लागून राहिलेली होती. एका व्यक्तीच्या नव्हे, एका देशाच्या नव्हे तर अखिल जगाच्या सामुदायिक उद्धाराची त्यांची दृष्टि होती.

आणि आपल्या 'आर्य' मासिकांतून श्री अरविंद हे आपल्या त्या विशाल ध्येयाचें विवरण करीत होते. माझें लक्ष त्यांच्या लेखांकडे वळूं लागलें; मी त्यांचें मनन करूं लागलों. जीवनांतील महत्त्वाचे प्रश्न साकल्यानें सोडविण्याचें सामर्थ्य त्या लेखणींत आहे असें मला वाटूं लागलें; आणि १९१६ सालीं मी त्यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला व त्यांच्या परवानगीनें 'आर्य' मासिकांतील लेखांना मी गुजराती पेहराव चढवून ते प्रसिद्ध करूं लागलों.

वर्षांमागून वर्षें जात होतीं. मी अरविंदांस दुरून पाहिलें होतें; आणि तरीहि त्यांचा व माझा निकट संबंध आहे असें मला वाटत असे. परंतु त्यांची व माझी प्रत्यक्ष भेट झाली नव्हती.

माझे बंधु सी. बी. पुराणी यांच्याजवळ बडोदा येथें १९०७ सालीं त्यांनीं स्वातंत्र्यप्राप्तीची एक क्रांतिकारक योजना सुपूर्द केली होती. त्याबाबतींत श्री अरविंद यांची भेट घेऊन त्यांची संमति मिळवावी असें मला तीव्रतेनें वाटूं लागलें. त्यांचे बंधु बारिंद्रकुमार यांनीं बॉंब तयार करण्याची माहिती माझ्या बंधूंना सांगितली होती. त्या मार्गानें कार्य घडवून आणावें असें माझ्या मनानें घेतलें. ती जी योजना होती, तिच्याशीं अनेक तरुणांच्या जीवन-मरणाचा प्रश्न निगडित झालेला होता. तेव्हां एकवार त्याबाबतींत त्यांची सल्ला-मसलत घेऊन मग पुढें पाऊल टाकावें असें वाटूं लागलें.

## त्यांची माझी पहिली भेट

त्याकाळीं (१९१८) श्री. व्ही. व्ही. एस. आय्यर हे पांडिचरींत रहात असत. त्यांच्या ओळखीच्या गृहस्थाचें पत्र घेऊन मी डिसेंबर १९१८ मध्यें पांडिचरीस गेलों. श्री. आय्यर यांच्याकडे उतरून नंतर 'आर्य' मासिकाच्या अंकांसह मी त्या मासिकाच्या कचेरींत श्री अरविंद यांची भेट घेण्यासाठीं बाहेर पडलों. त्यांच्या व माझ्या भेटीची वेळ दुपारीं ३ वाजतांची ठरली होती. परंतु त्या घरीं मी सकाळीं ८ वा. गेलों व भेटीची वेळ येईपर्यंत तेथील दोन रहिवाशांशीं गप्पा गोष्टी करीत तेथेंच राहिलों.



**योगी अरविंद**

भेटीची वेळ आली तसा मी वरच्या मजल्यावर श्री अरविंद बसत असत त्या खोलींत प्रवेश केला. एका लाकडी खुर्चीवर ते बसले होते. समोर एक टेबल व त्याच्यावर निळ्या रंगाचा कपडा पसरलेला होता. मी त्यांना पाहिलें तेव्हां त्यांच्या चेहऱ्या सभोंवार दिव्य प्रकाश पसरलेला मला आढळून आला. त्यांच्या डोळ्यांत दिव्य तेज चमकत होतें. त्यांची नजर माझ्यावर खिळून राहिली होती. पत्रव्यवहारामुळें त्यांचा माझा परिचय करून देण्याच्या हेतूनें मी त्यांना पूर्वीं बडोद्यांत त्यांची व माझ्या बंधूची भेट झाली होती, त्याची आठवण करून दिली. ती घटना ते विसरले नव्हते. नंतर मी म्हणालों, 'मी व माझे सहकारी क्रांतिकारक चळवळींत उडी घ्यायला तयार आहोंत. गेलीं अकरा वर्षें आम्ही

आमची संघटना त्या दृष्टीनें चालविली आहे.'

## योगसाधनेनें स्वातंत्र्य

श्री अरविंद कांहीं वेळ स्तब्ध राहिले. नंतर माझ्या साधनेसंबंधीं त्यांनीं मला प्रश्न विचारले. मी त्या दृष्टीनें चाललेल्या माझ्या प्रयत्नांचा थोडासा परिचय करून दिला व म्हणालों, 'साधना करावी हें सर्व ठीक आहे; परंतु भारत स्वतंत्र होत नाहीं, तोंपर्यंत चित्ताची एकाग्रता साधणें महाकठीण आहे.'

'परंतु भारत स्वतंत्र करण्यासाठीं क्रांतिकारक मार्गाचा अवलंबच करावा लागणार नाहीं!' श्री अरविंद म्हणाले.

'होय; पण त्याशिवाय ब्रिटिश सरकारची या देशांतून हकालपट्टी कशी बरं होणार?' मी विचारलें.

'हा एक वेगळा प्रश्न आहे; परंतु क्रांतिकारक व हिंसक कार्यक्रमांचें आचरण केल्याशिवाय भारत स्वतंत्र होण्याची शक्यता असतां त्या कार्यक्रमाकडे वळण्यांत कोणता बरें फायदा? त्याऐवजीं योगावर--आध्यात्मिक उन्नतीवर लक्ष केंद्रिभूत करणें योग्य होणार नाहीं का?'

'परंतु साधना, अध्यात्मभाव, भारताच्या रोमरोमीं भिनलेला आहे, रक्तांतच आहे. एकदां का भारत स्वतंत्र झाला म्हणजे मग हजारों भारतवासी आपोआप योगसाधनेकडे वळतील; परंतु आजच्या या जगांत गुलामांच्या अध्यात्मवादाकडे कोण वळणार आहे!'

'भारत स्वातंत्र्य प्राप्त करून घेणार हें निश्चित आहे, तें ब्रह्मलिखीत आहे. त्या ध्येयासिद्धीसाठीं जीवन समर्पण करणारे पुढारीही पुढें येत रहातील. परंतु साऱ्यांच्या दैवांत योग साधनेकडे वळण्याचें नाहीं. तुम्हांला योग आमंत्रित आहे. मग त्यावर सारें लक्ष केंद्रित करणें योग्य नाहीं का? इतकेंही करून तुम्हांला क्रांतिकारक चळवळीकडे वळायचेंच असेल तर माझी कांहीं हरकत नाहीं; परंतु त्या बाबतींत मी मात्र संमति देऊं शकत नाहीं.' श्री अरविंद म्हणाले.

'परंतु क्रांतिकारक चळवळीकडे वळण्याची प्रेरणा आपणच आम्हांला दिली आणि आपणच त्याकडे आमचें लक्ष वळविलें; आणि आतां त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचें आमच्या मनांतून आलें तेव्हां तुम्हीं संमति कां देत नाहीं!'

'कारण तें कार्य मी करून चुकलों आहें व त्यांत किती अडचणी आहेत हें मला समजून आलें आहे. उत्साहाच्या व ध्येयवादाच्या भरांत तरुण मंडळी चळवळींत सामील होतात; परंतु त्यांचा तो उत्साह फार काळ टिकत नाहीं. शिस्तीचें पालन करणें व त्यांच्याकडून शिस्तीची अपेक्षा करणें कठीण होऊन बसतें. त्या संघटनेंतून लहान लहान पक्ष निर्माण होतात; आपसांत मतभेद व भांडणें सुरू होतात आणि व्यक्ति-व्यक्तींतही मत्सर दिसून येऊं लागतो. प्रत्येकाला आपण पुढारी व्हावें असें वाटूं लागतें. सरकारी माणसें त्या संघटनेंत प्रवेश मिळवितात व अपेक्षित कार्य पार पडण्याऐवजीं

कार्यनाश होऊं लागतो. पुढारीपणासाठीं तर कधीं कधीं पैशांवरूनही भांडणें सुरू होतात.'

'आपण म्हणतां त्याप्रमाणें आम्हीं साधनेच्या किंवा योगाच्यामार्गें लागलों तरी त्यामुळें भारताचें स्वातंत्र्य कसें आटोक्यांत येणार समजत नाहीं. प्रथम आपण स्वातंत्र्यप्राप्तीकडे लक्ष देणें जरूर आहे असें मला मनापासून वाटतें. या विचारानें मला इतकें ग्रासून टाकलें आहे कीं, गेलीं दोन अडीच वर्षें मी स्वस्थपणें केव्हांही झोपूं शकलों नाहीं. स्वातंत्र्यासाठीं कांहीं तरी बलवत्तर करणें जरूर आहे असें मला वाटतें. त्याशिवाय मनाला स्वास्थ्य मिळणें शक्य नाहीं.'

## स्वातंत्र्याचें आश्वासन दिलें तर?

श्री अरविंद यावर २।३ मिनिटें कांहीं बोलले नाहींत. ते स्तब्ध होते. नंतर म्हणाले, 'समजा कीं, भारत स्वतंत्र होणार आहे असें आश्वासन मी दिलें तर?'

'तसें आश्वासन कोण देऊं शकणार आहे! मी तरी शंकित होऊन माझी शंका स्पष्टपणें प्रगट केल्याशिवाय रहाणार नाहीं.'

पुन्हां श्री अरविंद ३।४ मिनिटें कांहीं न बोलतां स्वस्थ राहिले व नंतर माझ्याकडे पाहून निर्धारपूर्वक म्हणाले, 'मी पुन्हां म्हणतों कीं, तशा प्रकारचें निश्चयात्मक आश्वासन मी दिलें तर?'

मी कांहीं वेळ निरुत्तर झालों. माझ्या प्रश्नाचा किंचित्काळ विचार केला व उत्तरलों, 'आपण तसें आश्वासन देत असाल तर तें स्वीकारण्याची माझी तयारी आहे.'

गंभीर आवाजांत ते म्हणाले, 'तर मग मी निश्चित स्वरूपांत आश्वासन देतों कीं, भारत स्वतंत्र होणार आहे.'

माझा हेतु साध्य झाला होता. ज्या इच्छेनें मी पांडिचरीस आलों ती इच्छा सफल झाली होती. माझ्या व माझ्या सहकाऱ्यांच्या मनांतील शंकांचें निराकरण झालें होतें. नंतर बडोद्याचे श्री. केशवराव देशपांडे यांचा निरोप त्यांना सांगितला. जरूरी वाटत असल्यास बडोद्याहून आर्थिक सहाय्य पाठवितां येईल अशा स्वरूपाचा तो निरोप होता. त्याला उद्देशून श्री अरविंद म्हणाले, 'सध्या बंगालमधून आमची जरूरी भागविली जात आहे. त्यांतल्या त्यांत चंद्रनगरकडून जरूर तो पुरवठा होत आहे. तेव्हां सध्यां तरी मदतीची जरूरी नाहीं.'

## निरोप घेतांना—

आणखी कांहीं बोलणें झाल्यानंतर निरोप घेण्याची वेळ आली तेव्हां भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नानें माझ्या मनांत पुन्हां डोकें वर केलें. तो माझ्या जीवन मरणाचा प्रश्न होता. त्या बाबतींत निरोप घेतां घेतां पुन्हां बोलल्याशिवाय माझ्यानें रहावेना. मी म्हटलें, 'भारत स्वतंत्र होणार याबद्दल आपली पूर्ण खात्री आहे ना?'

मला त्यांच्याकडून अजूनही हमी मिळवायची होती. त्यांनीं पुन्हां पुन्हां

आश्वासन दिलें असतांही माझ्या मनाचें संशयानिरसन झालें नव्हतें.

श्री अरविंद त्याक्षणीं अत्यंत गंभीर झालेले मी पाहिले. उघड्या खिडकीवाटे दिसणाऱ्या निळ्या नभाकडे त्यांची दृष्टि वळली होती. नंतर आपली दृष्टि माझ्याकडे वळवून व समोरच्या टेबलावर हाताची मूठ जोरानें आदळत ते उद्गारले, ‘ उद्यां सकाळीं सूर्योदय होणार आहे हें जितकें निश्चित आहे, तितकेंच भारत स्वतंत्र होणार हें निश्चित आहे आणि हें मी निर्धारपूर्वक सांगत आहें. भगवंताचा हा निर्णय अंमलांत यायला यापुढें फारसा कालावधि लागणार नाहीं ! ”

मी त्यांना वांकून नमस्कार केला आणि तेथून निघालों. त्या दिवशीं गाडीच्या प्रवासांतही मला निवांत झोप लागली; कारण मी निश्चित झालों होतों. मी श्री अरविंदांस भेटलों व त्यांच्याशीं माझें जें संभाषण झालें तें दृश्य माझ्या नजरेसमोर सतत येत असे. एका मेजाजवळ आम्हीं दोघेही कसे उभे राहून बोलत होतों, मी मोठ्या उत्कंठेनें प्रश्नांवर प्रश्न कसे विचारीत होतों, आणि ज्या वाणींत जगाला हालवून सोडण्याचें सामर्थ्य होतें ती वाणी, ती भेदक व निश्चल दृष्टि, तो मेजावर मूठ वळवून आपटण्यांत आलेला हात, ती दैवीशक्तीवरील अढळ श्रद्धा व तो आत्मविश्वास हें सारें सारें माझ्या दृष्टीसमोर येत असे. जगांत सर्वत्र कलियुगाचा संचार झालेला असला तरी ज्यांना सत्याचा, दैवीशक्तीचा आविष्कार झालेला आहे व ज्यांची त्या शक्तीवर अढळ श्रद्धा आहे व त्या सत्यासाठीं प्राणार्पण करण्याची ज्यांची तयारी आहे, असे सुपुत्र भारतांत वावरत आहेत. आणि भारताचेंच नव्हे तर जगाचें भवितव्य त्यांच्या हातीं आहे, या साऱ्या गोष्टींची मनोमय साक्ष मला पटली.

श्री अरविंदास भेटल्यानतर माझ्या मनावरील केवढें तरी ओझें हलकें झालें. भारत स्वतंत्र होणार हें निश्चित आहे याबद्दल मला खात्री वाटूं लागली. आणि त्यानंतर समयज्ञतेनें व ईश्वरी शक्तीवरील श्रद्धेनें मी चळवळींत भाग घेऊं लागलों. यानंतरच्या काळांत श्री अरविंदांच्या मार्गावर व वचनावर श्रद्धा दृढ व्हावी अशा कांहीं घटना लागोपाठ घडून आल्या. या जगांत दैवीशक्ति वावरत आहे, ती आपलें कार्य करात आहे, या गोष्टीवरील माझा विश्वास दृढावत गेला. आपल्या ध्येयावर व दैवीशक्तीवर ज्याची अढळ श्रद्धा आहे त्याला त्या महाशक्तीची जोड प्राप्त होऊन तिच्या बळावर तो सारें जग हालवून सोडील या गोष्टीची मला जाणीव झाली.

———

● ● सर्वत्र हरि—भावना चित्तांत ठसली म्हणजे परस्परांशीं कसें वागावें तें सारें नीतिशास्त्र अंतःकरणांत सहज स्फुरेल. त्याची गरजच रहाणार नाहीं. मग दोष दुरावतील. पापें पळतील. दुरितांचें तिमिर जाईल.


—संत विनोबा

# भारतीय तत्त्वज्ञानाचा अमेरिकेंत प्रचार

आमच्या प्रतिनिधीकडून

**अमेरिकेंतील स्त्री–पुरुषांचें लक्ष भारतीय तत्त्वज्ञानाकडे व गीता उपनिषदांतील उच्च शिकवणीकडे उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत लागूं लागलें आहे. श्री. परमानंद मेहरा हे नुकतेच अमेरिकेचा दौरा करून आले; त्यांची मुलाखत आमच्या वाचकांस उद्बोधक वाटेल अशी आशा आहे.**

अत्यंत प्रभावीपणें भारतीय तत्त्वज्ञानाच्या श्रेष्ठत्वाकडे अमेरिकन लोकांचें लक्ष जर कोणी प्रथमतः वळविलें असेल तर तें म्हणजे स्वामी विवेकानंद यांनींच होय. त्यानंतर श्री रामकृष्ण परमहंस यांच्या नांवें ठिकठिकाणीं आश्रम स्थापन करून व सुयोग्य प्रचारकांची योजना करून त्यांच्याद्वारें अमेरिकेंत भारतीय तत्त्वज्ञानाचा अर्थात् वेदान्ताचा प्रचार गेलीं ५०।६० वर्षे अव्याहत चालू आहे. तसेंच बंगालमधून स्वामी योगानंद यांनीं अमेरिकेंत दौरा काढून त्यांनीही भारतीय तत्त्वज्ञानाकडे व अध्यात्मवादाकडे अमेरिकनांचें लक्ष वळविण्याचे यशस्वी प्रयत्न केले. त्यांच्या प्रेरणेनें 'सेल्फ रियलायझेशन फेलोशिप' या नांवाची संघटना अमेरिकेंत निर्माण झालेली असुन तिच्या शाखा कांहीं प्रमुख शहरांतून प्रचारकार्य करीत आहेत. आणखीही अनेकांनीं गेल्या कांहीं वर्षांत या दृष्टीनें उपयुक्त कार्य केलेलें आहे.



**श्री परमानंद मेहरा**

अगदीं अलिकडचें उदाहरण घ्यायचें झाल्यास, श्रीमद्भगवद्गीतेचे एकनिष्ठ उपासक श्री. परमानंद मेहरा यांचें घेतां येईल; अमेरिकेंत गीता तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्याच्या हेतूनें ते सप्टेंबर १९५८ मध्यें गेले व त्या देशाच्या निरनिराळ्या शहरांत वास्तव्य करून व व्याख्यानें, प्रश्नोत्तरें, तसेंच वाङ्मय

प्रचार, या मार्गांनीं गीतेचा संदेश अमेरिकन लोकांस कथन करून नऊ महिन्यांनीं नुकतेच स्वदेशीं परत आले आहेत.

## बालपणापासून गीतेवर श्रद्धा

विद्यार्थीदशेंत असतां वयाच्या चौदाव्या किंवा पंधराव्या वर्षीच श्री. परमानंद मेहरा यांची गीतेवर श्रद्धा बसली. गीतावाचन, मनन व आचरण या तिन्ही गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून त्यांनीं सुरू केल्या. ते सिंध प्रांतांतील सक्कर येथें रहाणारे. १९२८ सालीं मुंबईंत आल्यानंतर त्यांनीं रोजगार धंद्याकडे लक्ष वळविलें. स्वातंत्र्याच्या चळवळींत यथाशक्ति भाग घेतला. चित्रकलेकडे त्यांचें बालवयापासून लक्ष होतें. त्या कलेचें शिक्षणही त्यांनीं संपादन केलें. मुंबईंत एका लिथो प्रेसमध्यें त्यांनीं भागिदारी मिळविली व नंतर त्यांनीं वरळी येथें मेहरा प्रिंटर्स या नांवानें स्वतःच्या मालकीचा लिथोप्रेस सुरू केला व तो गेलीं ५।६ वर्षें अत्यंत यशस्वी रीतीनें चालविला आहे.

भा र ती य त त्व ज्ञा ना चें वेद, उपनिषदांचें, रामायण, महाभारत यासारख्या ग्रंथांचें व विशेषतः भगवान् श्रीकृष्णांनीं रणांगणावर अर्जुनाला गीतेच्या रूपानें कर्मयोग आचरण्याचें जें तत्त्वज्ञान सांगितलें, त्याचा जगभर प्रसार होणें जरूर आहे, ही श्री. मेहरा यांची एक मोठ्यांत मोठी आकांक्षा होती व आहे.

अनादि कालापासून भारतीय तत्त्वज्ञान आपला प्रभावीपणा टिकवून राहिलें आहे. तें अमर आहे. त्यांत अमृततत्त्व ओतप्रोत भरलेलें आहे. जगभर त्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानाचा प्रसार व्हावा, या दृष्टीनें आमच्याकडून म्हणण्यासारखी हालचाल होत नाहीं. सरकार निधर्मी असल्यामुळें या गोष्टीकडे लक्ष पुरवूं शकत नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें मधून-मधून व्यक्तिगत प्रयत्न केले जातात; परंतु त्या प्रयत्नांमागें पुरेसें पाठबळ नसल्यामुळें ते जसे व्हावे तसे प्रभावी व चिरस्थायी होऊं शकत नाहींत.

## चित्रमय बायबलच्या आवृत्त्या

हेंच पहा ना, बायबल हा खिस्ती लोकांचा धार्मिक व आध्यात्मिक दृष्ट्या रोजच्या पाठांत येणारा त्यांचा पवित्र ग्रंथ आहे. आपल्या धर्माचा व त्या ग्रंथाचा जगभर प्रसार व्हावा यासाठीं त्यांचे प्रयत्न गेल्या दीडशें वर्षांपासून या व इतर देशांतून कसकसे चालले आहेत व त्यासाठीं प्रतिवर्षी ते लोक कोट्यावधि रुपये कसे खर्च करीत आहेत हें आपण पहात आहोंत. या प्रचारामागें अमेरिकन व युरोपीयन धनिकांची प्रचंड संघटना व प्रेरणा आहे.

बायबलच्या चित्रमय आवृत्त्या त्यांनीं किती काढल्या आहेत? आणि अजूनही किती निघताहेत! श्री. परमानंद मेहरा यांच्याशीं बोलत असतां अमेरिकेंत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या चित्रमय बायबलचे आठ भाग त्यांनीं आम्हांला दाखविले. त्या भागांतील एकाहून

एक सुंदर चित्रें व तीं नयनरम्य छपाई व एकंदर उठावदारपणा पाहून आम्हीं मुग्ध झालों. आणि कोणीही मुग्ध होईल.

आमचें आध्यात्मिक ग्रंथांचें भांडार अपरंपार व अपूर्व आहे. त्यांना सुयोग्य असें चित्रमय स्वरूप देण्यांत आलें तर काय बहार होईल! चित्रकला ही लेखन कलेपेक्षां मानवी मनाचें तात्काळ आकर्षण करूं शकते व मनावर परिणामही करूं शकते.

## अनेक भाषांतून गीतेचा प्रचार

श्री. परमानंद मेहरा यांनीं हें अचुक टेहळलें व प्रथमतः सर्वश्रेष्ठ अशा श्रीमद्‍भगवद्गीकडे ते वळले. गीतेंतील निवडक व उद्बोधक श्लोकांची निवड करून त्यांनीं त्या त्या प्रसंगाचें स्पष्टीकरण करणारीं साठ रंगीत चित्रें तयार केलीं व निरनिराळ्या अध्यायांतील सारसर्वस्व व ठळक प्रसंग एका पानावर व समोरासमोर त्यांचें दिग्दर्शन करणारें रंगीत चित्र अशा स्वरूपांत सुमारें फुलस्केप आकाराचा, मनोहारी चित्रमय भगवद्गीता हा ग्रंथ त्यांनीं तयार केला.

अशा या चित्रमय गीतेचा व त्यांतील सर्वश्रेष्ठ तत्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठीं श्री. परमानंद मेहरा हे अमेरिकेंत गेले. त्याचप्रमाणें जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतही ते फिरून आले. अमेरिकन लोकांप्रमाणें यूरोपमधील निरनिराळ्या देशांतून गीता व उपनिषदांचा प्रचार व्हावा व भारतीय तत्त्वज्ञानाचें श्रेष्ठत्व युरोपमधील लोकांच्या निदर्शनास यावें या हेतूनें इंग्रजीप्रमाणें जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश या भाषांत चित्रमय गीता, प्रकाशित करण्याचें श्री. मेहरा यांनीं ठरविलें असून, त्या दृष्टीनें त्यांचें मार्गक्रमण चालू आहे. तसेंच हिंदिप्रमाणें मराठी, गुजराती व सिंधी या भाषांतही चित्रमय गीतेचें प्रकाशन करण्याची कामगिरी त्यांनीं हातीं घेतली आहे.

उपनिषदांपैकीं कठोपनिषदाला सुंदर चित्रमय स्वरूप देऊन त्याचें प्रकाशनही यापूर्वींच झालेलें आहे. त्याशिवाय 'चित्रमय रामायण' व 'चित्रमय महाभारत' या दोन महान् राष्ट्रीय ग्रंथांस चित्रमय स्वरूप देण्याची योजना हातीं घेऊन ती या दोन वर्षांत, अमलांत यावयाची आहे. प्रत्येकीं चार चार भागांत हे चित्रमय ग्रंथ प्रसिद्ध होणार असून प्रत्येक भागांत प्रसंगानुरूप पन्नास


**एक महिन्यांत प्रॅक्टिकलसह वायरमन कोर्स**

शिवाय रविवारच्या सहा महिन्याच्या बॅचिस्. पाळी बदलणाऱ्या गिरणी कामगारांस सोयीस्कर अशा सकाळ—संध्याकाळच्या मराठी, हिंदी व इंग्रजींतून वेगवेगळ्या बॅचिस्. भेटा किंवा लिहा:—

**दादर इलेक्ट्रिक इन्स्टिटयूट,** पोर्तुगीज चर्च शेजारीं
'जे' रूट बस स्टॉपसमोर, दादर (वी. बी.)

रंगीत चित्रांचा समावेश व्हावयाचा आहे.

## भारतीय तत्त्वज्ञानाकडे वाढतें लक्ष

आपल्या अमेरिकन दौऱ्यासंबंधीं बोलत असतां श्री. मेहरा म्हणाले, "मनाला स्वास्थ्य, शांतता व समाधान देणाऱ्या भारतीय तत्त्वज्ञानासंबंधीं अधिकाधिक माहिती करून घ्यावी व आपल्या शाश्वत कल्याणाचा मार्ग चोखाळावा असें अमेरिकन स्त्रीपुरुषांस अत्यंत तीव्रतेनें वाटूं लागलें आहे. ते लोक उद्योगधंदा करून अपरंपार संपदा मिळवितात. परंतु त्यांच्या मनाला समाधान नाहीं. भारतीय तत्त्वज्ञानाची कास धरल्यास जरूर तें समाधान व दैवी आनंद यांचा लाभ होईल असें त्यांना वाटूं लागलें आहे. रोजचा धांगडधिंगा, रोजची धडपड व रोजची धांवपळ यांच्या पलिकडे गेल्याशिवाय व अध्यात्माची कास धरल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं असें दीर्घ विचारांतीं त्या लोकांस वाटूं लागलें आहे व त्याचा परिणाम म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे तसेंच योगासनें, ध्यान धारणा, प्राणायाम यासारख्या साधनांकडे त्यांचें कुतूहलपूर्ण लक्ष अधिकाधिक वळूं लागलें आहे.'

श्री. मेहरा हे प्रथम कोलंबो, हाँगकाँग व टोकिओ या ठिकाणीं गेले व तेथेंही त्यांनीं गीतेचा प्रचार केला. त्यानंतर त्यांनीं प्रथम होनोलुलूंत प्रवेश करून तेथून अमेरिकेंतील प्रचारकार्यास सुरवात केली. अमेरिकेंतील निरनिराळ्या लहान मोठ्या शहरांस भेट देऊन त्या भागांत त्यांनीं सुमारें दोनशें व्याख्यानें दिलीं. व्याख्यान झाल्यानंतर प्रश्नोत्तरें होत. प्रत्येक व्याख्यानांस स्त्री पुरुषांची गर्दी भरपूर असे व व्याख्यानांतील विचार आवडल्याचें दर्शक चिन्ह म्हणूनच कीं काय बहुतेक श्रोते पेटींत यथाशक्ति पैसे टाकीत असत. त्यामुळें या व्याख्यान दौऱ्याचा बराचसा खर्चाचा भाग परस्पर भागविला गेला.

## अमेरिकेंत प्रचाराची जरुरी

या दौऱ्यांत चित्रमय गीतेच्या हजारों प्रति खपल्या गेल्या व श्री. मेहरा हे सुमारें एक लाख दीड लाख प्रतींची मागणी बरोबर घेऊन आले असून त्यांची छपाई चालू आहे. अशा रीतीनें १९५४ सालीं सुरू केलेल्या या प्रचंड उद्योगाचें फळ ५।६ वर्षांच्या चिकाटीच्या प्रयत्नांन्तीं त्यांना आतां मिळूं लागलें आहे. हें कार्य एकट्या दुकट्याचें नाहीं. त्याच्यामागें प्रभावी संघटना असणें जरूर आहे, असें श्री. मेहरा यांस वाटतें.

अमेरिकन लोकांच्या मनोवृत्ती संबंधीं बोलत असतां श्री. मेहरा म्हणाले, "अमेरिकन लोकांस भारतीय जनता व भारतीय तत्वज्ञान याबद्दल अधिकाधिक आस्था व कुतूहल वाटूं लागलें आहे. त्यांची ती तळमळ व कुतूहल भागविण्यासाठीं भारतीय तत्त्वज्ञांनीं तिकडे जाणें जरूर आहे. त्याच्यामागें एखादी संघटना असावी. एकाकी प्रयत्न प्रभावशाली व व्यापक होऊं शकत नाहींत. देशकल्याणेच्छु धनिकांनीं या गोष्टीकडे लक्ष पुरविणें जरूर आहे."

---

# श्रीरामानुजांची शिकवण

## प्रयाणसमयीं शिष्यांस उपदेश

**भारतांत जे थोर आचार्य पूर्वकालीं होऊन गेले, त्यांत श्रीरामानुजांची गणना होते. या जगाचा निरोप घेण्यापूर्वी त्यांनीं आपल्या शिष्यांस केलेला सदुपदेश सर्वांना सर्वकाळीं मार्गदर्शक होणार आहे.**

या जगांत एकशें वीस वर्षें वास्तव्य करून व श्रीरंगम् या पवित्र क्षेत्रांत साठ वर्षांचा काळ घालविल्यानंतर श्रीरामानुजाचार्य यांस देह विसर्जन करण्याची बलवत्तर इच्छा झाली. मनुष्य साधारणपणें जास्तींत जास्त शंभर वर्षें जगतो; त्याच्याही पलिकडे आपली वयोमर्यादा जाऊन पोहोंचली. तरीही देवाघरचें बोलावणें येत नाहीं; आणखी किती वर्षें वाट पहायची असें वाटून श्रीरामानुज आपल्या उपास्य देवतेच्या, श्रीरंगनाथाच्या दारीं धरणें धरून बसले व त्याची करुणा भाकूं लागले; देवानें त्यांच्या विनंतीकडे प्रथम लक्ष पुरविलें नाहीं. टाळाटाळ केली; परंतु श्रीरामानुज बसल्या जागेवरून हालेनात. देवानें आपली कळकळीची विनंती मान्य करावी म्हणून त्यांनीं परोपरीनीं विनवणी केली. शेवटीं देवाचा निरुपाय झाला. त्यानें अत्याग्रहपूर्वक केलेली विनंती मान्य केली.

### शिष्यगणांचा निरोप

त्यानंतर श्रीरामानुज हे आपल्या मठांत गेले व आपल्या सर्व शिष्यांस एकत्र जमवून त्यांनीं आपला मनोदय त्यांना सांगितला. त्याचबरोबर सत्याची, सन्मार्गाची नेहमीं कास धरा. मोक्षाच्या मार्गापासून तीळभरही ढळूं नका असेंही त्यांना सांगितलें.

ज्यांच्या सहवासांत व सेवेंत वर्षांच्या वर्षें घालविलीं व आपला वाटाड्या व मार्गदर्शक म्हणून ज्यांच्याकडे पाहिलें त्यांचा वियोग कोणाच्यानें सहन करवेल? साऱ्या शिष्यांना ती बातमी ऐकून पराकाष्ठेचें दुःख झालें, व तें त्यांनीं परोपरीनें प्रगटही केलें. गुरुजींनींही त्यांचे समाधान करण्यांत कसूर केली नाहीं. या नाशवंत देहाचा कधींना कधीं निरोप घ्यायचाच असतो. आज नाहीं तर उद्यां जगाला रामराम ठोकून जायचेंच असतें. मग त्याबद्दल शोक कसला करायचा? देहाची माया कां म्हणून धरायची—वगैरे

नाना प्रकारें चार सुविचाराच्या गोष्टी सांगून त्या महामना गुरुजीनें आपल्या सत् शिष्यांचें समाधान केलें व रात्रौ भोजनोत्तर सर्वांनीं पुन्हां एकत्र जमावें असें आज्ञापिलें. त्याप्रमाणें शिष्यगण एकत्र जमला असतां श्री-रामानुजानीं निरोपादाखल आपल्या शिकवणीचें सारसर्वस्व त्यांच्यापुढें ठेविलें.

## गुरुकृपेची छाया

'आपल्या अध्यात्मिक गुरुबद्दल तुम्हांला जो प्रेमादर वाटतो त्याच प्रेमादर भावनेनें तुम्ही विष्णुभक्तांकडे नेहमीं पहात जा. जे जे थोर आचार्य होऊन गेले त्यांच्या शिकवणीवर संपूर्ण श्रद्धा ठेवा. इंद्रियांचे दास केव्हांही बनूं नका. त्यांना आपल्या ताब्यांत ठेवा. या जगांतील पोटापाण्याच्या ज्ञानावर समाधान मानून राहूं नका. देवानें या जगाची निर्मिती कशी केली, कां केली, त्याची थोरवी किती आहे, त्याची लीला किती अगाध आहे, यासंबंधानें वाचनानें, मननानें व निदिध्यासानें जितकें म्हणून ज्ञान मिळवितां येण्यासारखें असेल तेवढें मिळविण्यासाठीं मनापासून झटा. तुमच्यावर तुमच्या निष्ठेमुळें गुरुकृपेची छाया पडली तर तुमच्यासारखा भाग्यवान कोणीही नाहीं; मग तुमचीं इंद्रियें तुमच्या ताब्यांत रहातील. इंद्रियांच्या मोहजाळांत केव्हांही सांपडूं नका. संतांचे बोल हृदयांत सांठवा व त्यांचें सतत चिंतन करा. देवाच्या दासांची जे सेवा करतात त्याच भक्तांच्या जवळ मोक्ष येतो. तुमचें शहाणपण, बुद्धिमत्ता कितीही पराकोटीला पोहोंचलेली असो. देवाची व त्यांच्या दासांची श्रद्धायुक्त अंतःकरणानें जोंपर्यंत तुमच्याकडून भक्ति घडत नाहीं, सेवा घडत नाहीं, तोंपर्यंत मोक्षाची पायरी तुमच्या आटोक्यांत येणार नाहीं.

## विष्णुभक्तांचा सहवास

दिवसांतून निदान एकादा तास तरी देवाच्या चिंतनांत, त्याचे गुणानुवाद


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें, लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी

**छबिलदास रोड, दादर, मुंबई २८ (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं ***

वाचण्यांत व त्यांचें मनोभावें मनन करण्यांत घालवा. जे जे कोणी आत्मसमर्पणासाठीं, देवदर्शनासाठीं व त्याच्या भेटीसाठीं अहर्निश धडपडत असतात, त्यांचा सहवास घडेल याकडे लक्ष असावें. ज्यांचीं मनें स्थीर नाहींत, ज्यांच्यापुढें देवाच्या भेटीगांठीचें ध्येय नाहीं व एक ना धड भाराभर चिंध्या अशी ज्यांच्या मनाची द्विधा स्थिति झालेली असते, त्यांच्या वाऱ्यासही कधीं उभे राहूं नका.'

श्री. रामानुजानीं आपला उपदेश संपविला तेव्हां शिष्यवरांनीं विनंती केली कीं, या देहांतून प्राणज्योति निघून जाईपर्यंत जगांत कसें वागावें, कसें रहावें हें कृपा करून सांगा.

## या जगांत कसें वागावें ?

श्री रामानुज म्हणाले, ' ज्यानें आत्मसमर्पण केलें त्यानें कशाचीहि चिंता करण्याचें कारण नाहीं. त्याचें सारें भवितव्य देवाच्याच हातीं असतें. तो मग सर्व प्रकारें त्याची काळजी वहातो; परंतु आत्मसमर्पण खरेंखुरें व्हावें. त्यांत दांभिकपणा किंवा अप्रामाणिकपणा बिलकुल असूं नये. मागील जन्मीं जें कांहीं पापपुण्य केले असेल त्याचीं बरींवाईट फळें या जन्मीं भोगावीं लागणार. त्यामुळें कोणतीही स्थिति वाट्यास आली तरी कुरकूर करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या जगांत आपणास कांहीं तरी संपादन करावयाचें आहे, या भावनेनें कोणतेंही कृत्य करूं नका; परंतु जें जें वाट्यास येईल व जें जें कांहीं करावें लागेल तें तें भगवंताच्या सेवेसाठीं, या भावनेनें वागत जा.

या जगांत वावरत असतां तुमचे मित्र कोण आणि शत्रू कोण हें शोधून काढण्याचा जरूर प्रयत्न करा. विष्णूचे भक्त तेच तुमचे मित्र व जे विष्णूकडे पाठ फिरवितात, त्याचें नांवही घेत नाहींत ते तुमचे शत्रू, असें समजा—सत्संगतींत नेहमीं रहा. त्यांतच तुमचें कल्याण आहे.'

———


# PINGE'S CLASSES

*FOR*

1) F. Y. Art & Science
2) Inter Arts & Science.
3) B. A. Economics.
4) S. N. D. T. – F. Y., S. Y., B. A., M. A.
5) P. S. C. Examination

**Bismillah Building, oppo. Dadar. Rly, Station (W. R.)**

# श्रीसाईसच्चरित—गद्यानुवाद

## अध्याय पहिला; मंगलाचरण

लेखक : **एक साईभक्त**

**श्रीसाईसच्चरित हा ओवीबद्ध ग्रंथ श्रीसाईभक्तांकडून मोठ्या भक्तिभावानें व प्रेमादरपूर्वक वाचला जातो. त्या ग्रंथराजाची थोरवी शब्दांनी वर्णन करतां येण्यासारखी नाहीं. त्या ग्रंथराजाचा गद्यमय सरळ अनुवाद आमच्या एका साईभक्त मित्रानें भक्तिभावपूर्वक व केवळ सेवाभावानें केला असून, त्यांचा हा प्रयत्न वाचकांस कसा काय रुचतो हें पहावयाचें आहे.**

## अध्याय पहिला

### 'मंगला चरण'

श्रीगणेशास, श्रीसरस्वतीस, श्रीगुरुदेवतेस, श्रीकुलदेवतेस, श्रीसीताराम चंद्रास, श्रीसद्गुरुसाईनाथास प्रथम नमन करितों. कार्यारंभ उत्तम होऊन कार्याचा निर्विघ्न शेवट व्हावा तसेंच सर्व इष्ट देवतांचा अनुग्रह प्राप्त होऊन सर्व मंगल व्हावें. मंगलाचरणाचें कारण इतकेंच कीं, सर्व संकटांचें हरण व्हावें. इच्छिलेल्या कार्याची पूर्तता व्हावी हेंच प्रयोजन. तेव्हां सर्वांना वंदन असो.

प्रथम श्रीगणेशास वंदन करूं या. हे गजानना, तूं वक्रतुंड हेरंबमूर्ती आहेस; चौदा विद्यांचा स्वामी आहेस, तुझें गजमुख मंगलकारक आहे. तुझ्या पोटांत चौदा भुवनांचा समावेश होतो; म्हणून तुला लंबोदर म्हणतात. भक्तांच्या कामना पूर्ततेसाठीं व त्यांचीं संकटें हरण करण्यासाठीं तू हातांत सतेज परशु धारण केला आहेस. तूं भक्तांचा विघ्ननाशक सहकारी तसेंच तूं त्यांच्याकडे पाहिलेंस कीं त्यांचें दारिद्र्य दूर पळालेंच. हा संसार तरून जाण्याची तूं नौका आहेस. तूं ज्ञानज्योत असून त्यामुळें अज्ञानरूपी अंधकार नाहींसा होतो. तूं आपल्या रिद्धी सिद्धीसहित मजकडे कृपादृष्टीनें पाहा. हे उंदरावर स्वार असणाऱ्या विघ्नहर्त्या पार्वतीसुता, तुझा जयजयकार असो. मी तुला अभिवादन करितों. इच्छिलेलें कार्य निर्विघ्नरीतीनें पूर्ण व्हावें व सर्व मंगल व्हावें म्हणून शिष्टाचाराला अनुसरून मी इष्टदेवतेस आदरयुक्त नमस्कार करीत आहें.

श्रीसाईनाथ हेच श्रीगणेश असून हातांत परशू धरून सर्व विघ्नांचा नाश करतील अशी व्युत्पत्ति करू या का ? श्री साई हेच भालचंद्र, गजानन, एकदंत, गजकर्ण, भग्न असलेल्या दांताचे संकटरूपी अरण्याचा विच्छेद करणारे आहेत. सर्व मंगल करणाऱ्या लंबोदरा, साईरूपानें नटलेल्या गणराया मला सुखसागराकडे ने.

आतां श्री सरस्वती देवीस वंदन करूं या. हे ब्रह्मदेवाच्या चतुर कुमारी, माझ्या जिव्हेचा हंस करून त्यावर आरूढ हो. जिच्या हातीं ब्रह्मवीणा आहे, जिच्या भालप्रदेशावर आरक्त कुंकुमचिरी शोभत आहे, जी शुभ्रवस्त्र परिधान करून हंसावर आरूढ झालेली आहे, ती देवी सरस्वती मजवर कृपा करो. हे देवी, तूं वाचेची देवता असून जगन्माता आहेस, तूं मजवर प्रसन्न झाली नाहींस तर या सारस्वताचे हातून ही गाथा कशी लिहवेल ? हे देवी तूं जगजननी असून वेदमाता आहेस. तूं विद्याविभूषित सर्व गुणांची जणूं काय एक सरिताच आहेस. माझ्या हातून सर्वांना साईचरितामृत पाज.

श्रीसाईनाथ हेच भगवति श्रीसरस्वती असून ॐकार वीणा हातीं घेऊन भक्तांच्या उद्धारासाठीं स्वतःचें चरित्र स्वतःच गात आहेत. उत्पत्ती, स्थिति, व संहार करणारे, सत्व, रज व तम या गुणांनीं युक्त असे ब्रह्मा, विष्णु, महेश यांना वंदन असो. श्रीसाईनाथ स्वयंप्रकाशित आहेत. आम्हांला गणेश, ब्रह्मा, विष्णु, महेश तुम्हींच आहांत. तुम्हीच आम्हांला सद्‌गुरु आहांत. तुम्हीच आम्हांला या संसाररूपी सरितेंत नौकेसमान असून आम्ही भक्त त्या नौकेंतील उतारू आहोंत. आम्हांस पैल तीर दाखविणारे आपणच आहांत. हे साईनाथा, पूर्वजन्मींचें सुकृत गांठीस असल्याशिवाय आपल्या चरणांचा लाभ आम्हांस कसा बरें घडेल ?

जो क्षीरसागरीं निवास करीत असून सर्वांचें दुःख हरण करणारा आहे, त्या माझ्या कुलदैवतास आदिनाथ नारायणास माझें नमन असो. श्रीपरशुरामानें पश्चिम तीरीं सागर हटवून जो नवीन प्रदेश कोंकण या नांवानें निर्माण केला तेथेंच नारायण प्रगट झाले. ज्यांनीं सर्व जीवांस नियमबद्ध केलें असून कृपाकटाक्षानें जे सर्वांचें संरक्षण करीत आहेत, त्या नारायणाच्या प्रेरणेनें मी या कार्याकडे वळत आहें.

तसेंच, श्री. भगवान परशुरामानीं यज्ञाची सांगता करण्यासाठीं गौडदेशास ज्या महामुनींना आणलें, त्या मूळपुरुषांस मी अत्यंत आदरानें नमन करीत आहें. आद्यगौड जातीचा पूर्वज 'शाकल' ऋग्वेद शाखी भारद्वाज गोत्रस्वामी ऋषीराजास आतां आपण वंदन करूं या. त्यानंतर या पृथ्वीवरील परब्रह्मावतार ब्राह्मणवर यास नमन करूं या. तसेंच याज्ञवल्क्यादि योगीश्वर, भृगु, नारद, वेदव्यास पाराशर, सनत, सनंदन सनत्कुमार, शुक, शौनक सूत्रकार, विश्वामित्र, वसिष्ठ, वाल्मीकि, नामदेव जैमिनी, वैशंपायन आदिकरून नवयोगी आदि मुनींच्या चरणीं मी लोटांगण घालतों.

आतां निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, जनार्दन स्वामी, तुकाराम महाराज, कान्हा, नरहरि आदि करून संतांना माझें नमन असो. जागेच्या अभावीं सर्व संतांचा केवळ ओझरता नामनिर्देश करून मी सर्वांना अत्यादरानें प्रणाम करितों, व त्यांनीं आशीर्वचन द्यावें, अशी त्यांच्या चरणांजवळ करुणा भाकतों. ज्यानें संसाराचा त्याग करून हिमालयांत केदारीं ठाणें मांडलें,जो सर्वांचा पुण्यपावन पितामह आहे, त्या सदाशिवास आतां वंदन करूं या.

जो नेहमीं शिवाचें ध्यान करीत आहे ज्यानें कंठीं रुद्राक्ष धारण केले आहेत, ज्याचें आराध्यदैवत श्रीशंकर आहे त्या माझ्या पित्यास मी वंदन करतों. जिनें अहोरात्र कष्ट करून माझें पालन पोषण केलें, जिचे उपकार केव्हांही विसरतां येणार नाहींत, अशा माझ्या मातोश्रीस माझें नमन असो. माता बाळपणीं सोडून गेली परंतु हरिस्मरणीं जी नित्य रत आहे अशी जी चुलती तिनें माझा कष्टानें सांभाळ केला, तिच्या चरणीं मी माझें मस्तक नमवीत आहें. तसेंच, माझ्यासाठीं जीव-प्राण वेंचणारा माझा जेष्ठ बंधु त्यालाही नमन असो.

श्रोते जनहो, आतां मी आपणास नमन करीत आहें. आपण एकचित्तानें लक्ष पुरविल्याशिवाय माझें समाधान कसें होईल ! जसजसा श्रोता गुणज्ञ, चतुर व कथा ऐकण्यासाठीं आतुर असेल, तसतसा वक्त्यालाही उत्तरोत्तर उल्हास चढत असतो. आपणच जर लक्ष दिलें नाहीं, तर कथेचें काय बरें प्रयोजन ? म्हणून आपण प्रसन्नचित्त करून ऐकावें अशी मी आपणांस प्रार्थना करून साष्टांग नमन करीत आहें.

मी ज्ञानी नाहीं, ग्रंथपारायण केलेलें नाहीं, सत्कथाश्रवणही माझ्याकडून घडलें नाहीं, हें आपण पूर्णपणें जाणतच आहांत. मीही माझे अवगुण, माझ्या उणीवा जाणून आहे. परंतु गुरुजीनीं सांगितल्या-वरून हा ग्रंथ लिहिण्याचा मी प्रयत्न करीत आहें. माझेंच मन मला सांगत आहे कीं, मी आपणापुढें यःकश्चित् पामर आहें; तरी आपण कृपा करून मला पदरांत घ्यावें.

आतां श्रीसद्‌गुरु स्मरण करूं या;प्रेमानें त्यांच्या चरणास वंदन करूं या व काया-वाचामनें करून त्यांस शरण जाऊं या; कारण, तेच बुद्धिदाते व स्फूर्तिदाते आहेत. ज्याप्रमाणें भोजन करणारा जेवावयास बसतांना शेवटीं गोड घांस राखून ठेवतो त्याचप्रमाणें गुरुवंदनाचा सुग्रास घेऊन आतां हें नमनाख्यान संपवूं या.

श्रीसद्‌गुरुराया,अखिल चराचर विश्वाचा तूं विसांवा आहेस; त्याचें तूंच अधिष्ठान आहेस. पृथ्वी, सप्तद्वीप, नवखंड, सप्तस्वर्ग, पाताळ यांना जें हिरण्यगर्भांड प्रसवतें, त्यालाच ब्रह्मांड म्हणतात. जी माया या ब्रह्मांडाला प्रसवते, त्या मायेच्याही पैलतीरावर सद्‌गुरुचें वसतिस्थान असतें. त्याचा महिमा वर्णन करावयास वेदशास्त्रज्ञ सुद्धां अडखळले, त्यांच्या युक्तिजुक्तीचें कौशल्य तेथें कांहींच चालेनासे झालें आहे.

सद्गुरुराया, ज्या ज्या उपमा तुला लावाव्या, त्या तूंच आहेस. जें जें दृष्टीस पडतें, त्या त्या स्वरूपीं तूंच आहेस. अशा श्रीसाईनाथा, करुणार्णवा, समर्थे, सद्गुरुनाथा, स्वसंवेद्या, सर्वातीता, अनादिअनंता, तुला नमस्कार असो. हे सर्वोत्तमा, नित्यानंदा, पूर्णकामा, स्वयंप्रकाशा, मंगलधामा, आत्मारामा, गुरुवर्या, तुला मी प्रणाम करितों. तुझें स्तवन करण्यास वेद श्रुतीनांही शक्य झालें नाहीं, त्या तुझें आकलन होण्यास माझें ज्ञान कितीसें पुरें पडणार !

सद्गुरु करुणसागरा, गोदातीरीं राहणाऱ्या ब्रह्मदेवा, रमावरा, दत्तावतारा, तुझा जयजयकार असो. तुला मी नमन करितों. सद्गुरुशिवाय ब्रम्ह्याला ब्रह्मपण आलें नाहीं. अशा त्या सद्गुरुवरून पंचप्राणांची कुरवंडी करून त्यांस अनन्य भावानें शरण जाऊं या, त्यांच्यासमोर मस्तक नत करावें, हातानें त्यांचे चरण चुरावे, डोळ्यांनीं त्यांचें वदन एकसारखें पाहात राहावें. नाकांनीं चरण तीर्थाचें अवघ्राण करावें. कानांनीं श्रीसाईगुण श्रवण करावे. ध्यानींमनीं श्रीसाईचें ध्यान व चित्तांत श्रीसाईचिंतन अखंड केलें तर हें संसारबंधन आपोआप तुटेल. एकदिलानें तनमनधन सद्गुरुच्या चरणीं अर्पावें व आयुष्य गुरुसेवेंत अखंड घालवावें. गुरु नाम, गुरुसहवास, गुरुकृपा, गुरुचरणतीर्थ गुरुमंत्र, व गुरूंच्या घरीं वास्तव्य या गोष्टी मोठ्या प्रयासांनीं प्राप्त होतात. श्रीगुरूंच्या ठायीं फार मोठी शक्ति वास करीत असून अनन्य भक्तांची कसोटी घेऊन श्री गुरु त्यास त्याच्या नकळत मोक्षाच्या दारीं लोटत असतात. गुरुसंगति ही गंगाजलाप्रमाणें पवित्र असून सर्व मळ नाहींसा करून मन निर्मळ करते. चंचल मनास बांध घालून त्याला हरिचरणीं निश्चल करिते.

श्री सद्गुरु चरणसेवन हींच आमचीं वेदशास्त्रपुराणें. श्री गुरुचरणीं लोटांगण हेंच आमचें योगसाधन; पवित्र असें जें श्री सद्गुरुनाम हेंच आमचें वेदशास्त्र 'साईसमर्थ' हाच आमचा मंत्र आम्हांस यंत्रतंत्रही तेंच. 'ब्रह्मसत्य' ही आत्मप्रतीति 'जगन्मिथ्या' ही नित्यजागृति, अशी परमप्राप्तीची स्थिति, श्री साईनाथ आपल्या भक्तांस अर्पण करतात. परमात्मसुख, परमात्मप्राप्ति व ब्रह्मस्वरूपस्थिति. ही फक्त शब्दांची गुंतावळ. प्रत्येकास आनंदवृत्ति पाहिजे. ज्याच्या आंगीं ही स्थिति बाणली असून चित्तांत सुख, शांति व समाधान आहे, ही त्याची परमप्राप्ति. श्रीसाई हे आनंदवृत्तीची एक खाणच आहेत. भाग्यवान् भक्त असल्यास परमानंदाची त्याला मुळींच उणीव पडत नाहीं. त्याला नेहमीं सागराची परिपूर्णता आढळत जाईल.

शिवशक्ति, पुरुष प्रकृति, प्राणगति व दीपदीप्ति ह्या सर्व शुद्धब्रह्म चैतन्याच्या विकृति आहेत. त्या एकीमध्यें आपण द्वैतभाव कल्पितों. 'एका की न रमते' व 'बहुस्याम्' या वचनाप्रमाणें दुसऱ्याची संगती आवडूं लागते. परंतु शेवटीं सर्व एकत्वांतच मिळतात. शुद्ध ब्रह्मरूप अशी जेथें स्थिति आहे, तेथें पुरुष आणि प्रकृति

हा भेद शिल्लक राहत नाहीं. ज्याप्रमाणें सूर्याचा जेथें निरंतर वास असतो, तेथें दिवस आणि रात्र कशी असणार ? त्याप्रमाणें निर्गुण हें मुळचेंच गुणातीत आहे. भक्त कल्याणासाठीं तें सगुण होतें. तसे श्रीसाई हे विमल गुण आहेत. त्यांना मी अनन्यभावानें शरण आहें. श्रीसाई समर्थांना जे शरण गेले, त्यांनीं पुष्कळ अनर्थ चुकविले. म्हणूनच या माझ्या स्वार्थापायीं मी, गुरुराया, आपल्या पायांवर मस्तक ठेवीत आहें. तात्त्विक दृष्ट्या जे निराळे आहेत, भक्तिसुखासाठीं ज वेगळे आहेत, लीला करीत आहेत, त्या माझ्या प्रेमळ साईंना माझा प्रणिपात असो. सर्व जिवांचें जें चैतन्य, सर्वांच्या स्फुरण शक्तीचें जो अधिष्ठान, भक्ताकरितां ज्यानीं शरीर धारण केलें आहे, त्या श्रीसाईंना माझा प्रणिपात असो. श्री साईनाथा, तुम्हींच माझी परमगति आहांत. माझ्यासारख्या आर्तांची सर्व इच्छा पुरविणारे सुखमूर्तीं गुरुराया, आपणच आहांत. आतां या नमनाचा शेवट करावयाचा म्हणजे सर्वांभूतीं भगवंत आहे म्हणून सर्व प्राणीमात्रांस मी वंदन करीत असून त्यानीं मला पदरांत घ्यावें, अशी त्यांच्याजवळ माझी प्रार्थना आहे. तसेंच, सकल भूतमात्राला नमन असो; त्यामुळें जो विश्वंभर अंतर्बाह्य अभेद्य अशा एकात्मतेनें नटलेला आहे, त्याला आनंद होईल.

जो परिसमाप्तीचा आरंभ आहे व या ग्रंथाचें जें मंगलाचरण तें नमन याप्रमाणें आतां पूर्ण झालें आहे. आतां या ग्रंथाचें प्रयोजन मी सांगत आहें.

श्रीसाईंनीं मजवर कृपा करून मला अनुग्रह दिला. त्याचेंच मला अहर्निश चिंतन, माझ्या भवभयाचें निवारण त्यामुळेंच होणार आहे. शुद्धस्वरूप साईचें सगुणरूप पाहण्याशिवाय मला दुसरें जपतप माहीत नाहीं. श्रीसाईंचें मुख अवलोकन करतां करतां तहानभुकेची भ्रांत मीं विसरून जातों. इतर सुखांची व संसारदुःखांची मला आठवणही रहात नाहीं. श्रीबाबांच्या डोळ्याकडे पहातां पहातां स्वतःचाच स्वतःला विसर पडतो. आंतून प्रेमाचे उमाळे येऊन अष्टभाव दाटून येऊन चित्तवृत्ति आनंदसागरीं बुडून जाते. श्रीसाईचरण हेंच माझें कर्मधर्मशास्त्रपुराण, तेंच माझें योग-अनुष्ठान, तीर्थयात्रा व तपाचरण. गुरुवाक्याप्रमाणें कांहीं चित्तवृत्ती दृढ धरितां व त्यावर अढळ श्रद्धा ठेविली असतां निश्चल मनस्थैर्य प्राप्त होतें, ह्या कर्मानुबंध स्थितीमुळें साईपदांवर आसक्ति वाढली, व अतर्क्य शक्ति प्रत्ययास आली आहे. हीच शक्ति साईभक्ति उपजाविते व समर्थ साईचरणांची आसक्ति वाढाविते; संसारांत राहूनही संसाराविषयीं वैराग्य उत्पन्न करिते व सदैव आनंदवृत्ति वांट्यास येते.

नाना–मतांप्रमाणें भक्तीचे अनेक प्रकार सांगितले आहेत. त्यांचीं लक्षणें थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न करीत आहें. वेदशास्त्रप्रवीण ज्ञानी आचार्यांनीं ‘स्वरूपसंधान’ म्हणून भक्तीचें मुख्य लक्षण सांगितलें आहे. पाराशर व्यासांनीं सांगितलेली पूजाद्वारें गुरुविषयीं प्रेम व्यक्त करणें ही ‘अर्चन’भक्ति; गुरुसाठीं

बाग-बगीचा तयार करून पारिजाता-सारखीं सुवासिक फुलझाडें लावणें; गुरु-घरचें अंगण झाडून त्यावर गोमय सडा घालणें. प्रथम संध्या–स्नान करणें, गुरुदेवतेसाठीं गंध उगाळणें, पंचामृत स्नान घालून धूपदीप दाखविणें. त्यानंतर नैवद्य दाखवून आरती धुपारती करणें, जें प्रेमानें भक्तिभावानें करणें त्यासच 'अर्चन' असें म्हणतात. आपल्या हृद-यींचे प्राण ओतून शुद्ध भावानें व निर्मळ मनानें मूर्तीला आमंत्रण करावें व अर्च-नास लागावें, मग ती चित्कला पूजनार्चन विसर्जनानंतर परत हृदयांत पूर्ववत् स्थापन करावी.

गर्गाचार्यांच्या मताप्रमाणें मन गुण-संकीर्तनांत तल्लीन करून हरिरंगीं विलीन करणें ही अवांतर भक्तीची लक्षणें जाणावीं. अखंड आत्मसंशोधन करणें, कथाकीर्तन करणें व योग्य आचरण करणें ही पुढील भक्तीची लक्षणें जाणावीं, असें शांडिल्य-वचन आहे. ज्यांना स्वतःचें हित साधावें असें वाटतें, त्यांनीं वेदाज्ञेप्रमाणें आचरण ठेवून निजहिताला बाधक होतील अशीं अयोग्य व निषिद्ध कर्मे टाळावीं. कोणत्याही कर्माचा मी कर्ता नाहीं वा फलाचा भोक्ता नाहीं हा भाव मनांत बाणला म्हणजे वृत्ति निरहंकार होते, हाच तो ब्रह्मार्पण योग होय. याप्रमाणें कर्म करीत असतां त्याविषयीं सहजासहजीं निष्क्रियता उत्पन्न होते. कर्मकर्तृत्वाचा त्याग केल्याशिवाय कर्मांचा त्याग करितां येत नाहीं. कांट्यानेंच कांटा काढावा लागतो. कर्मावांचून कर्म थांबवितां येत नाहीं. निजात्मखूण 'अहं ब्रह्मास्मि' एकदां पटली कीं कर्मे आपोआपच संपूर्णपणें राहतें. फलाशे-विषयीं पूर्ण निराश असणें हें कर्मत्यागाचें वर्म आहे. नित्यनैमित्तिक कर्माचरण करणें हाच 'शुद्धस्वधर्म' होय. सर्व कर्मे भगवंतास अर्पण करून, मन निर्विकार करणें हें नारदीय भक्तीचें लक्षण आहे; अशीं भक्तीची अनेक विलक्षण लक्षणें आहेत. परंतु आपण केवळ गुरुकथा स्मरणानें कोरड्या पायांनीं हा भवसागर तरून जाऊं या.

असा हा गुरुकथा श्रवणाचा मला छंद लागून त्यांतच मी रमून गेलों व अनुभवानें आपणही कथालेखन करावें असें वाटूं लागलें.

असो. पुढें एकदां शिरडीस असतांना श्रीबाबांच्या दर्शनासाठीं मशिदींत गेलों व बाबांस गहूं दळतांना पाहून मी अति-शय आश्चर्यचकित झालों. आधीं ही कथा सांगतों. ती श्रोतेजनहो, स्वस्थ चित्तानें आपण श्रवण करा. त्यांतूनच या साई चरित्राचा उगम कसा झाला तें आपण ऐकावें. उत्तम श्लोकगुणानुवाद कथासंवाद करितांना चित्त शुद्ध होऊन बुद्धिही सुस्पष्ट व विशाल होईल. त्या लीला श्रवण केल्यास भगवंतास आनंद होऊन त्रितापांचें हरण होईल. आधिभूतादि ताप नि.र्विण्ण, आत्महितेच्छु, आत्मप्रवण असे जे ते बाबांच्या चरणाशीं लागून अनुभवसंपन्न होतात. आतां ही गोड कथा सावधान चित्त देऊन ऐका. श्रीबाबांचें कृपालुत्व पाहून आपणास बहुत आश्चर्य वाटेल.

एके दिवशीं सकाळीं मुखमार्जनादि विधि झाल्यानंतर बाबांनीं दळण काढलें.

हातांत एक सूप घेऊन जवळच असलेल्या गव्हांच्या पोत्यांतून मापावर मापें भरून त्यांनीं गहूं सुपांत ओतले, नंतर दुसरा एक रिकामा गोण पसरून त्यावर त्यांनीं जातें मांडलें व दळतांना ढिला पडूं नये म्हणून जात्याचा खुंटा ठोकून ठोकून त्यांनी घट्ट बसविला. मग कफनीच्या अस्तन्या वर सारून कफनीचा घोळ त्यांनीं आवरून घेतला व जात्याजवळ पाय पसरून ते बसले. माझ्या मनांत ही दळणाची कल्पना काय असावी याबद्दल फारच कुतूहल उत्पन्न झालें. बाबा कसलाच परिग्रह करीत नाहींत, ते तर अकिंचन; मग त्यांना ही विवंचना कशाकरितां असावी, कांहीं समजेना. असो; हातांत जात्याचा खुंटा धरून मान खालीं घालून श्रीबाबा जातें ओढायला लागले व निःशंक मनानें जात्यांत दाणे रिचवूं लागले. मी संत अनेक पाहिले असतील; परंतु दळणारा हा असा एकच संत माझ्या दृष्टीस पडला. गहूं दळण्यामध्यें त्यांना काय सुख मिळत असेल तें तेच जाणोत.

सारे लोक आश्चर्यचकित होऊन बाबांकडे पाहूं लागले; परंतु बाबा, बाबा! तुम्ही हें काय करितां? असें त्यांना विचारण्याचा कोणालाच धीर झाला नाहीं. गांवांत ही बातमी पसरतांच स्त्री–पुरुषांच्या झुंडी मशिदीकडे धांव घेऊं लागल्या. धांवतां धांवतां बिचाऱ्या बायका थकल्या. त्यांपैकीं चौघीजणी मशिदींत चढून बाबांच्या हाताला झोंबल्या व त्यांच्या हातून त्यांनीं जात्याचा खुंटा हिसकावून घेतला. बाबा त्यांच्याबरोबर लटके भांडूं लागले. त्यांनीं त्याकडे लक्ष न देतां दळणास सुरुवात केली. दळतांना जात्यावरचीं गाणीं म्हणून त्या बाबांच्या लीला गाऊं लागल्या. बायांचें तें प्रेम पाहून बाबांचा राग पळाला. त्याची जागा अनुरागानें घेतली व ते गालांतल्या गालांत हसूं लागले.

पायलीचें दळण संपून सूप रिकामे झालें, तसें त्या बायांच्या मनांत निराळेच तरंग उठूं लागले. बाबा स्वतः तर भाकरी भाजीत नाहींत. त्यांची तर भिक्षावृत्ति! मग या पिठाचें ते काय करणार? या विषयीं बायांच्या मनांत तर्क सुरू झाले. यांना बायको नाहीं, पोर नाहीं, हे एकटेच. यांना संसार नाहीं, घरदार नाहीं, मग एवढी कणिक कशाला? याबद्दल त्या बायांच्या मनांत विचार सुरू झाले. एक म्हणत्ये, 'बाबा कसे तर परम कृपाळू. आमच्यासाठींच हे खेळ करतात. आम्हांलाच हें सारें पीठ देतील.' चार भाग करून एकेकीला एक भाग मिळेल. अशा रीतीनें मनांत मांडे भाजूं लागल्या. बाबांचे खेळ बाबाच जाणोत. त्याचा थांगपत्ता कुणालाही लागणें कठीण. बायांच्या मनांत लोभ उद्भवून बाबांना लुटावें असें त्यांना वाटूं लागलें. जातें साफ करून भिंतीस टेकलें व पीठ एकत्र करून त्या बायांनीं सुपांत भरलें व आतां घरीं जाऊं असें त्यांनीं ठरविलें. तोंपर्यंत बाबांनीं तोंडावाटे एक चकार शब्दसुद्धां काढला नाहीं. चौघींनीं कणकेचे व्यवस्थित भाग करतांच बाबा म्हणतात, "लबाड कुठल्या, फुकट खाऊ. आल्या धांवत मला लुटायला. माझे गहूं काय कर्जाऊ आहेत तर पीठ नेऊं पाहतां!

कुठे चाललांत ? बापाचा माल घेऊन जातां काय ? जा ! तें पीठ घ्या आणि गांवाच्या शिवेवर नेऊन टाका ! ” बाया बिचाऱ्या लोभापायीं फजिती पावल्या व मनांत चुरचुरल्या. आप आपसांत कुजबूज करूं लागल्या. त्या पीठ घेऊन तावडतोब बाबांनीं सांगितल्याप्रमाणें शिवेवर गेल्या.

प्रथमतः या करणीच्या मागें बाबांचा काय हेतु आहे हें कोणासच समजलें नाहीं. नंतर परिणाम कळल्यावर सर्वांना बाबांचें कौतुक वाटलें. बाबांनीं रोगराईस घालविलें असें लोक म्हणूं लागले. गहूं नव्हते ते. महामारी होती ती. तिला जात्यांत भरडून शिवेवर परस्पर टाकली. ओढ्याकाठीं पीठ टाकतांच रोगाला ओहटी लागली. हीच बाबांची हातोटी ! गांवांत कॉलऱ्याची सांथ आलेली होती. तीवर श्रीसाईनाथांनीं हा तोडगा काढून रोगास देशोधडीस लाविलें. गांवास शांति मिळवून दिली. असा हा दळणाचा अपूर्व देखावा पाहून मला मोठें कौतुक वाटलें. हा कार्यकारणभाव जुळवावा कसा हेंच समजेना मला. गव्हांचा व रोगाचा हा काय परस्पर संबंध व त्याचें अतर्क्य कारण पाहून मला वाटलें कीं आपण साईकथा लिहाव्यात; क्षीरसागराला लाटा उसळून याव्यात त्याचप्रमाणें मनांत प्रेमसागर उचंबळून येऊं लागला व वाटलें कीं, श्री बाबांच्या कथांची माधुरी पोटभर गात रहावी.

हेमाड, श्री साईनाथास शरण आहे. मंगल चरण संपलें. आप्तेष्ट, संतनमन, तसेंच, सद्गुरु वंदन संपलें. पुढल्या अध्यायांत ग्रंथाचें प्रयोजन काय, अधिकारी अनुबंधन याचें दर्शन यथामति कथन करीन. हे श्रोते हो, स्वस्थ मनानें ऐका. तसेंच श्रोत्या वक्त्याचें ज्यांत त्यांचें कल्याण आहे, असें हें साई चरित्र रचणारा हा हेमाडपंत कोण हेंही आपणांस पुढील अध्यायीं समजेल.

अशा रीतीनें श्री संतजनांनीं प्रेरित केलेला व हेमाडपंतानें रचलेल्या श्री साईसमर्थ सच्चरित्राचा पहिला “ मंगल चरण ” नामें अध्याय संपूर्ण झाला.

---

**जैसें डोळ्यां अंजन भेटे । त वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगटे । महानिधी ॥** ज्ञानेश्वर ॥

ही कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचूक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तरी दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे. याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४,** यांचा सल्ला घेऊन निर्धास्त राहा.
बाहेरगांवींही फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं

# कृपाछत्र तव सदा रहावें

( चाल : हीच राघवा हीच पैंजणें )

स्थान हेंच तें । सांई बिसावें ।
समाधिमंदिर या नांवाचें । पूजनीय ते पाय नमावे ।। ध्रु० ।।

नागपूरच्या बुट्टीकडुनी । सांई घे जें स्वयें बांधुनी ।
सांगुनि गेले राहूं येथें । नाचूं, गावूं, खेळूं भावें ।। १ ।।

ऐकुनि लीला थक्क होय मती । जमेल यात्रा मुंग्यासम ती ।
श्यामकर्ण तो वारू असुनी । आरती अंतीं आदर दावें ।। २ ।।

आणी गोदा निजचरणासी । वाहन सोयी करि भक्तांची ।
निवास भोजन सोय विजेची । सुवर्ण कळसा प्रति वंदावें ।।३।।

अनंतवाणी कीर्तन श्रवणा । पुण्यतिथीदिनिं झोळी घेण्या ।
विविध कलांचे सेवन करण्या । आतुर जाण्या शिरडी असावें ।।४।।

नलिनी श्रीपादांची विनती । होत राहूं दे निज सेवा ती ।
मीना भरत श्रीरामावर । कृपाछत्र तव सदा रहावें ।। ५ ।।

—बाबांच्या बाळाचें बाळ

# श्रीसाईबाबांचें विश्वशांतीचें कार्य

लेखक : दा. शं. टिपणीस

" बाबांचा आचार धर्म व गीतेंतील कर्मयोग एकच आहे. असेंही म्हणतां येईल कीं, जें गीतेंत आहे तेंच ज्ञानेश्वरींत आहे, जें ज्ञानेश्वरींत आहे तेंच एकनाथी भागवतांत आहे व जें एकनाथी भागवतांत आहे तेंच बाबांच्या आचारधर्मांत आहे. "

विश्वशांतिसाठीं आंखण्यांत येणाऱ्या आचारधर्मांत लोकांची परिस्थिति व अडीअडचणी यांची दखल घेण्यांत यावी. आम जनतेला झेपेल व पचेल अशाच गोष्टींचा त्यांत अंतर्भाव व्हावयास पाहिजे. केवळ मूठभर लोकांच्या उन्नतीनें समाजाची, देशाची वा जगाची खरी उन्नती होऊं शकत नाहीं. हे मूठभर लोक कदाचित् मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडतील. पण त्यांना जें ज्या प्रकारें साधलें, तसें तें आमजनतेला साध्य करतां येणार नाहीं. मोठमोठे योगी वा साधुसंत यांचा वैयक्तिक दर्जा अतिश्रेष्ठ असला तरी ते ज्या समाजांत राहतात तो समाज कांहीं त्या दर्जाचा असत नाहीं. हे श्रेष्ठजन समाजाला मार्गदर्शक म्हणून उपयोगी येतात. त्यांना मार्गदर्शक म्हणून या आचारधर्मांत अवश्य वरचें स्थान द्यावें. परंतु या आचारधर्मांतील साधना मात्र आमजनतेच्या दृष्टीनें अव्यवहार्य असूं नये. सर्वसाधारण जनतेची दृष्टि कोती असते. दूरवरच्या भविष्य काळावर नजर देण्याइतकी त्यांची दृष्टि पल्लेदार नसते. आजचा संसार एवढेंच ते पहात असतात. यामुळें ज्या गोष्टी आज उपयोगी आहेत त्याकडे त्यांचा ओढा जास्त असतो व अशा कामीं उपयुक्त होणारी व्यक्ति त्यांना जास्त प्रिय व जवळची वाटत असते, एवढेंच नव्हे तर जे आपले मार्गदर्शक आहेत त्यांच्यामुळें हा फायदा झाला असा अनुभव निदान तसा भास तरी त्यांना झाला पाहिजे; असें झालें तर या आचारधर्मावर व त्यांतील मार्गदर्शकांवर जनतेची निष्ठा जडेल.

## विश्वशांतीपेक्षां पोटशांति

साधुसंतांचा, चमत्कार करण्यांत हा एक उद्देश असतो. चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं ही सर्वसाधारण माण-

साची वृत्ति असते. या आचारधर्मा-बद्दल गाढ निष्ठा निर्माण झाली तरच कार्य होऊं शकेल, कारण निष्ठेशिवाय ध्येय गांठतां येत नाहीं. एकंदर जनता मानसिक व सांपत्तिक दृष्ट्या खालच्या पायरीवर असल्यामुळें विश्वशांतिपेक्षां पोटशांति त्यांना अधिक प्रिय असते. हें ज्याच्यामुळें साधेल तिकडे तो झुकत असतो, हें लक्षांत घेऊन या बाबतींत त्यांचें समाधान होईल अशा गोष्टी मार्गदर्शका-कडून घडून आल्या पाहिजेत. वेळ पडल्यास आपला मार्गदर्शक आपणास वाटेल त्या संकटांत तारूं शकेल अशी श्रद्धा चमत्कारामुळें साधुसंत हे जनतेंत निर्माण करीत असतात. यामुळें निष्ठा बलवत्तर होऊन जनता आपल्या ध्येय मार्गाला चिकटून राहते. यास्तव अशा आचारधर्माची गुंफण कोणातरी सर्व समर्थ सर्वश्रेष्ठ अशा विभूतीच्या म्हणजेच परमात्म्याच्याभोंवतीं झालेली असावी. सर्वसाधारण भोळ्याभाबड्या अज्ञानी संसारी जनांना मधाचें बोट लावण्या-खेरीज खरा पारमार्थिक मेवा त्यांच्या तोंडांत जाणार नाहीं हें विसरून उपयोगी नाहीं.

## आचारधर्माचें स्वरूप

विश्वशांतिसाठीं मानवतेची म्हणजेच परमात्म्याची म्हणजेच सर्व प्राणीमात्रांत असलेल्या एकत्वाची पूजा करणें या आध्यात्मिक तत्त्वावर आधारलेला आचार धर्म ( religion नव्हे ) अमलांत आला पाहिजे. हा आचारधर्म, जाति, पंथ धर्मनिरपेक्ष पाहिजे. त्यांतील आधार-भूत तत्त्वें त्रिकालाबाधित असावीं. गरीब श्रीमंत, सुशिक्षित, अशिक्षित, लहान थोर सर्वांना त्यांत भाग घेतां आला पाहिजे. आपल्या योग्यतेनुसार व भावनेनुसार साधना करून वैयक्तिक आध्यात्मिक उन्नति साधतां आली पाहिजे व त्याच-बरोबर माणुसकीची, मानवतेचीही वाढ झाली पाहिजे. ९५ टक्के समाज संसारी असल्यामुळें जीवनांतील रोजचे कष्ट करून ही साधना करतां आली पाहिजे. एवढेंच नव्हे, तर या साधनांमुळें आपणांस दैनंदिन व्यवहारांत मदत होत आहे व त्यामुळें आपला संसार सुखाचा होत आहे, स्वश्रमाचा मोबदला मिळत आहे, ही भावना, ही निष्ठा, साधकाच्या ठिकाणीं अनुभवानें दृढ झाली पाहिजे.

## श्री साईबाबांचा आचारधर्म

या सर्व गोष्टींचा येथपर्यंत विचार केला. वर नमूद केलेल्या गोष्टी साध्य झाल्या तर स्वामी विवेकानंदाचें विश्व-शांतिचें स्वप्न साकार होईल हें निश्चित होय. या बहुतेक सर्व गोष्टींची दखल घेऊन विश्वशांतीसाठीं, मानवतेच्या निर्मितीसाठीं, बोल थोडे, कृति जास्त असलेल्या रोजच्या व्यवहारांत उपयोगी आणावयाचा जो आचार धर्म शिर्डीच्या श्रीसाईबाबांनीं आपल्या भक्तांना वेळोवेळीं सांगितला आहे, त्याचा विचार थोडक्यांत करावयाचा आहे. त्यायोगें श्री स्वामी

विवेकानंदाच्या कार्याशीं श्री साईबाबांच्या कार्याचा दुवा कसा जोडला गेला आहे व मानवतेचें बीज शिर्डीला ५०–६० वर्षांपूर्वी कसें रोवलें गेलें, या गोष्टी स्पष्ट होतील. हा विचार कै. दाभोळकर यांनीं लिहिलेला श्री साईसच्चरित्र ग्रंथ व संत दास गणू यांनीं लिहिलेलें 'अर्वाचीन भक्त व संत लिलामृत' या पुस्तकांतील श्री बाबासंबंधीं असलेल्या अध्यायाच्या आधारें करावयाचें आहे. श्री साईबाबांच्या तत्त्वज्ञानाची सर्वच फोड या ठिकाणीं आहे. शब्दानें ती समजून सांगतां येत नाहीं. त्यासाठीं कष्ठ व तपश्चर्या यांची जरुरी आहे. हीं तत्त्वें म्हणजे ब्रह्मज्ञानाचा गाभा आहे. बाबांच्या आचार धर्माचा मूळ पाया म्हणजे ईशावास्योपनिषद होय. त्यांतील तत्त्वांवरच बाबांनीं आपला आचारधर्म, एवढेंच नव्हे तर आपल्या लीला व चमत्कार आधारलेले आहेत. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा मूळ पाया घेऊन त्याच्या अनुषंगानें मा गृधः पूर्णात् पूर्णं इदं वगैरे उपसिद्धांत घेऊन बाबांनीं आपल्या आचारधर्माची व अध्यात्माची इमारत उभी केली आहे.

ईशावास्यमिदं सर्वं
यत्किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा;
मागृधःकस्यचिद्धनम् ॥

**ईशेंच आच्छादिला जेथें सारा ।**
**हा अवघ्या ब्रह्मांडाचा पसारा ॥**
**तेथें तयावीण उघडा थारा**
**कोण विचारा मानी या ॥**

—श्रीसाईसच्चरित्र

यांत सर्व मानवांतच नव्हे, तर पशु-पक्षांदि सर्व सृष्टींत एकत्वानें वास करीत असलेल्या शक्तीचा उल्लेख आहे. या


HAVE YOU READ

A Pocket Book that will give you

LIGHT POWER & WISDOM

*By*

**Shri Swami Sivananda**



Which has Served thousands all over the world Here is one book which must be your constant Companion Price Re. 1/–(Postage extra) available with

**The Sivananda Publication League**

P. O. Sivanand Nagar, Rishikesh, Himalayas, U. P.

*Space donated by* : **T. A. S. Rao,** 1/49 Bhuta Niwas, Vincent Road, Matunga, Bombay 19,
The above Copy is Available here Contact by Post.

शक्तीची जाणीव होऊन निर्माण झालेला आपलेपणा, प्रेम हें विश्वप्रेम होय. या प्रेमांतूनच खरी मानवता जन्मास येते. बाबांच्या तत्त्वज्ञानाचा हा मध्यबिंदू आहे. या शक्तीची जाणीव व अनुभव येईल अशाच प्रकारची वागणूक बाबांनीं आपल्या भक्तांना सांगितली आहे.

## बाबांच्या आचारधर्माची जननी

**पाही भूत मात्रीं जो मज ।**
**तोचि माझिया प्रीतीचा समज ।**
**तरी तूं भेदबुद्धितें त्यज ।**
**ऐशीच भज मजलागीं ॥**
**ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी ।**
**तयासी नमा नित्य तुम्ही ।**
**भूतमात्राच्या अंतर्यामीं ।**
**तोच तो मी वर्ततों ॥**

अ. ९ ओ. १३०

ईशावास्योपनिषद् बाबांच्या आचार-धर्माची जननी आहे. गीतेचीही जननी तीच आहे. यामुळें बाबांचा आचारधर्म व गीतेंतील कर्मयोग एकच आहे. असेंही म्हणतां येईल कीं, **जें गीतेंत आहे तेंच ज्ञानेश्वरींत आहे, जें ज्ञाने-श्वरींत आहे तेंच एकनाथी भाग-वतांत आहे आणि तेंच बाबांच्या आचारधर्मांत आहे.** फरक असलाच तर तो भाषेचा. पण मूळ सर्वांचें एकच. ईशावास्योपनिषधांतील तत्त्वें कोणत्याही देशकाल परिस्थितींत खरीं असल्यामुळें त्यावर आधारलेला आचारधर्म कोणालाही कोणत्याही परिस्थितींत स्विकारतां येईल व तो सर्वधर्मपंथीयांकडून स्वीकारला जातो हें अनुभवसिद्ध आहे.

अशा रीतीनें स्वामी विवेकानंदानीं अमेरिकेंतील आवाहनांत दार्शित केलेलें ध्येय साकार करण्याचें कार्य बाबानीं केलें आहे. मानवतेचा, विश्वशांतीचा व वैयक्तिक अध्यात्मिक उन्नतीचा साधा व सरळ मार्ग सर्व संसारीं जनांना बाबानीं आखून दिला आहे. त्यावरून वाटचाल करणें हें प्रत्येक साईभक्ताचें, तसेंच विश्व-शांतीची तळमळ असणाऱ्या प्रत्येकाचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य निष्ठेनें व चिका-टीनें पार पाडणें या सारखी सर्वोत्कृष्ट दुसरी कोणतीही साईभक्ति नाहीं.

———


**आरंभापासून इंग्रजी शिका व एस्. एस्. सी. पास व्हा**

पाळी बदलणाऱ्या गिरणी-कामगारांना व सर्वांस सोयीस्कर अशा सकाळ-संध्या-काळच्या वेगवेगळया बॅचिस्. दुपारचे स्त्री-पुरुषांचे वर्ग त्वरित भेटा किंवा लिहा.

**विश्वभारती क्लासेस**

गणेश वाचनालय, रानडे रोड एक्स्टेन्शन, पोपटलाल बिल्डिंग,
नं. २ समोर, दादर ( बी. बी. ) मुंबई २८

# संत श्रीगुरुनाथ बाबा दंडवते यांचा अल्प परिचय

लेखक : श्रीपाद बाळकृष्ण देव, वकील, ठाणें

सध्यां ठाणें येथें आग्रारोडवरील श्रीविठ्ठल सायन्ना दत्तमंदीर हें भाविक लोकांचें आस्थेनें जमण्याचें स्थान बनलें आहे. कारण तेथें सध्यां श्रीगुरूनाथबाबा दंडवते ह्या संतांचें वास्तव्य आहे.

## जन्म व बालपण

हैद्राबादचे जहागिरदार रायराजे यांच्या राजवाड्यांत ख्यातनाम सेवक घराण्यांत महाराजांचे वडील रामराव परशुराम हे स्वकर्तबगारीनें प्रसिद्धीस आले. भटजी बापूंच्या सहवासांत व मार्गदर्शनानें ते परमार्थमार्गांतही बरेच प्रगत होऊन आपला उदरनिर्वाह शांततेनें चालवीत. रामरावांचा संसार म्हणजे परमार्थ नौकाच होता. पत्नी साध्वी सीताबाई प्रति अनसूयाच. संसारांत उणीव एकच होती व ती म्हणजे वृद्धकालापर्यंत या दांपत्यास अपत्य नव्हतें; वैराग्याचा तवा भयंकर तापतांच गाणगापुरीं संगमावर निजध्यासाच्या प्रज्वलित वैराग्याग्नींत तपश्चर्येस सुरवात केली. व त्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन १०–१२ वर्षांच्या बालसन्याशाच्या वेषांत श्री दत्तप्रभूंनीं त्यांना स्वप्नांत दर्शन दिलें व सांगितलें मीच आपल्या उदरीं येणार आहें; टोली, टोली, दमडी दमडी, किंचित् किंचित्' असें पुटपुटत सीतामाईच्या डोक्यावर हात ठेवीत असें तीनदां केले. पुढें सौ. सीतामाई गर्भवती झाल्या. व गाणगापुरला श्री. नरहर चौडापुरकर यांचेकडे बाळंतपणाकरितां आल्या. तेथेंच गुरुवार तारीख ३१ जानेवारी १९०७ ला श्री. गुरुनाथ महाराजांचा जन्म झाला. एकंदर दैवी वातावरणांत बालपण, जावळ, व बी. ए. पर्यंत शिक्षण झालें. अपटुडेट पोशाखाशिवाय त्यांना क्षणभरही चैन पडत नसे. रोज सकाळीं माता पिता व गुरू यांना साष्टांग वंदन करण्याचा नियम त्यांचा कधी टळला नाहीं. एकदां गुरूंना (योगीराज भट बापू–ब्रह्मीभूत बालकृष्णानंद सरस्वती १०८) वंदन करावयास जातांना इस्त्री बिघडेल म्हणून साष्टांग नमस्कार न करतांच साधा नमस्कार केला पण त्याच वेळीं मन खावयास लागलें व मनाच्या स्थितींत परिवर्तन घडलें. इस्तरीचे कपडे टाकून दिले व उपरणें व लुंगी असा वेष पत्करला. बारातेरा वर्षांची नोकरीही सोडून दिली.

## संसार थाटला

संसारांत गुरफटूं नये अशी दांडगी इच्छा असतांही लग्न कर असा दत्त महाराजांकडून येणारा आदेश व कुलवृद्धिकरितां माईची तळमळ व आज्ञा याचें उल्लंघन होऊं नये म्हणून वयाच्या १६ व्या वर्षी सौ. कां. पद्मावती —मामांची मुलगी — यांच्याशीं १९२४ साली महाराज विवाहबद्ध झाले. गाणगापुरास असतांना पहिलें अपत्य मुलगी झाली. पण ती ११ वर्षांची असतांना तिला कॉलरा झाला व ती ईशचिन्तनांत मग्न असतांना इहलोक सोडून गेली. महाराजांना १९३६ सालीं दुसरें अपत्य झालें. त्याचें नांव प्रभाकरपंत. हे महाराजांचे सेवेंत व भजनांत दक्ष असतात. पण यांच्या जन्मानंतर सौ. पद्मवतीबाई भरल्या कुंकवानें दत्तध्यानांत मग्न असतांनाच परलोकवासी झाल्या! महाराजानीं मातेच्या आज्ञेनें दुसरा विवाहहि सौ. लक्ष्मीबाई यांच्याशीं केला होता. या प्रेमळ, लीन आतिथ्य सत्कारप्रिय होत्या. संसार सुखमय झाला. दोन अपत्यें झालीं व गेलीं. ह्याही भरल्या कुंकवानेंच महाराजांचा परमार्थाचा मार्ग मोकळा करण्याकरितांच जणूं इहलोकांतून निघून गेल्या. चि. प्रभाकरपंतांचें लग्न सौ. कमळाबाई ह्यांच्याशीं करून दिलें. व या सुशील दांपत्यास कांहीं दिवसांपूर्वीच एक कन्या रत्न झालें आहे व नांव 'मुक्ताबाई' असें ठेवण्यांत आलें आहे.

महाराजांनीं मुलाचें लग्न करून दिल्यानंतर त्याच सालापासून म्हणजे वैशाख शु. ६ शके १८७१ पासून गायत्री पुरश्चरणास सुरवात केली. पहिलें पुरश्चरण फक्त कडुनिंबाचा पाला खाऊन केलें. महाराजांचे वडील सन १९३२ च्या सुमारास स्वर्गवासी झाले; आतांपर्यंत महाराजांचीं १३ गायत्री पुरश्चरणें झालीं आहेत व सध्यां ठाण्याला श्रीदत्त मंदिरात एक चालू आहे. त्यांना एकंदर २४ गायत्री पुरश्चरणें करावयाचीं आहेत; एका गायत्री पुरश्चरणाला रोज ७००० जप याप्रमाणें ११ महिने १३ दिवस लागतात.

## अलोट मातृप्रेम

श्रीगुरूनाथ महाराजांचें आपल्या मातुःश्रीवर अलोट प्रेम; मातेनें इच्छा प्रदर्शित केली कीं मुलानें त्यांना पंढरीला न्यावें. आईची आज्ञा प्रमाण. श्रीगुरुनाथांचें वैशिष्टय म्हणजे ते कधींही वाहन वापरीत नाहींत. सर्व प्रवास पायीं करतात व तीर्थक्षेत्राला जावयाचें म्हणजे दंडवत घालीत जातात. व यामुळेंच जरी त्यांचें मुळचें आडनांव परशराम तरी त्यांच्या कृतीमुळें त्यांना दंडवते या आडनावानें ओळखलें जातें; आईला कावडींत घालून, ती कावड खांद्यावर घेऊन हे आधुनिक श्रावण श्री गुरुनाथ महाराज निघाले (१९४३ सालीं) पंढरीला जावयाला. बरोबर ७–८ वर्षांचा मुलगा प्रभाकर. त्याला त्या वेळेला खरुज झाली होती. असा एक

चमत्कार घडला कीं एका मुक्कामावरून निघतांना एका मजुरानें येऊन आपणहून विचारलें कीं मी या बाळास कडेवर घेऊं कां! मजुरी काय घेशील असें विचारतां तुम्हीं द्याल ती असें उत्तर मिळालें. मुक्कामापर्यंत गडी आला. त्याला पैसे दिले गेले. एका मोठ्या खोलींत गड्यासह सर्वजण दारास कडी लावून निजले. एकच दार होतें. सकाळीं पहातात तों ती कडी जशीच्या तशीच. दिलेले पैसेही तेथेंच पडलेले, परंतु गड्याचा पत्ता नाहीं. व आश्चर्य असें कीं बाळ प्रभाकरची खरूज बरी झाली व तोही आनंदानें या सर्वांच्या बरोबर चालूं लागला. ५-६ दिवसांच्या प्रवासानंतर रूद्रारम या गांवीं मुक्काम झाला. आईला तहान लागली. तेव्हां गोड पाणी आणण्यास महाराज गोड पाण्याच्या विहिरीकडे चालले. लोक त्यांना जाऊं देईनात. तेथें एक नाग आहे व तो फणा काढून उभा आहे तो तुम्हाला जाऊं देणार नाहीं व चावेल, असें सांगण्यांत आलें. महाराजांचें वय ३२-३३ च असेल. महाराज नागाला साष्टांग नमस्कार घालीत म्हणाले, बापुराया आईला तहान लागली आहे. पाणी न्यावयाचें आहे.' हें ऐकतांच नागानें विरूद्ध दिशेला तोंड केलें. पाणी परत आणतांनाहीं त्या नागराजांना साष्टांग वंदन केलें. पुन्हां नागानें तोंड फिरविलें. आईला पाणी देलें व ही सर्व हकीकत सांगितली; यानंतर थोड्याच दिवसांनीं आईची प्रकृती शौचाच्या विकारानें बिघडली. आईनें मनःपूर्वक प्रार्थना केली. 'पांडुरंगा, तुझ्या दर्शनाकरितां निघालें आहें. तुझें दर्शन होईपर्यंत हा देह ठेव व मग खुशाल घेऊन जा.' माणिक नगरला कण्या व आमटीचा भंडाऱ्यांतील प्रसाद सर्वांनीं घेतला व आईचा विकार नाहींसा झाला; प्रकृतीला आराम वाटला; अशारीतीनें पदयात्रेनें सर्व मंडळी पंढरीला नामदेवाच्या पायरीपाशीं आली. कावड तेथें ठेविली. महाराजांच्या नयनांमध्यें आनंदाश्रू आले कीं आईच्या इच्छेप्रमाणें आईला पांडुरंगाच्या दर्शनाला आणली व मनांत विचार आला कीं आज बापूरायांना शिरापुरीचा नैवेद्य दाखवावा. बरोबर फक्त १-१॥ शेर तांदुळाच्या कण्या आहेत.

हा सर्व देखावा तेथेंच पाठीमागें एक सिंधी कुटुंब पहात होतें. त्यांना पांडुरंगानें प्रेरणा केली व ते पुढें येऊन महाराजांना व मातुश्रीना वंदन करून त्यांनीं सांगितलें कीं हे ४०० रु. घ्या व आज शिरापुरीचा नैवेद्य करा. येवढे जर पुरले नाहींत तर आणखी देतों. पंढरीनगरींत शिरापुरीचें अन्नदान शेंकडों लोकांना त्या दिवशीं देण्यांत आलें व ह्या अन्नदानाचें श्रेय श्री. सी. ए. गणात्रा, हेमकुंज, गुंडोवाडी, राजकोट, सौराष्ट्र यांना आहे. यांची अजून महाराजांना पत्रें येतात. ह्या सर्व हकीकतीवरून परमेश्वर भक्तांचा पाठीराखा कसा असतो याची खात्री पटते.

बाळ प्रभाकराला खांद्यावर घेऊन खरूज नाहींशी करणारा, आईच्या सेवेंत

**उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा**

मग्न असणाऱ्या महाराजांना अडथळा येऊं नये म्हणून तोंड फिरविणारा नाग, कण्या आमटीच्या प्रसादानें व्याधीला पळविणारा, परमात्मा कोणाच्या मनांत आदरभाव, भक्तिभाव, कृतज्ञपणा, नम्रता उत्पन्न करणार नाहीं! व तदनुषंगानेंच ज्यांच्याकरितां परमात्म्यानें येवढे कष्ट घेतले ते श्रीगुरूनाथ महाराजही आपणां सर्वांना खास वंद्यच वाटतील. एकदां मातुःश्रींच्या पायाला रोग झाला व तो पाय तोडावा लागेल असें डॉक्टरांचें म्हणणें पडलें; पण श्रीगुरूनाथांनीं स्वतः रोज आईचा पाय धुवून काढावा व त्यांतून कृमी जंतू पू वगैरे अशुद्ध जें कांहीं निघेल तें तीर्थ म्हणून रोज प्राशन करावें. या मातृसेवेला फळ मिळणार नाहीं असें कसें होईल! आईचा पाय बरा झाला.

## मातृवियोग

सन १९५२ च्या सुमारास महाराजांचें ७ वें गायत्री पुरश्चरण चालू होतें. मातुःश्री म्हणत बाळ, तुझ्या वडिलांचा देह ज्या जागीं पडला, त्याच जागेवर माझें मरण आहे बरं का! माझी हाडें गाणगापुरचीं आहेत म्हणून मी मेल्यावर माझी रक्षा गाणगापुरांत चक्रतीर्थांतच टाक. प्रयाणाच्या आदल्या दिवशीं मला सोडून कुठें जाऊं नकोस. तूं दत्ताचा प्रसाद आहेस, झोळीचा प्रसाद तुजजवळ नेहमीं आहेच. माझा पुरा आशिर्वाद तुझ्या पाठीशीं राहील. दत्ता, तुलाच याची काळजी. अतीथि सेवा कर, विनम्रता ठेव, कोणालाही रिक्त हस्तानें पाठवूं नकोस, कसं करावं हा विचारच नको. हीच तुझ्या आईची देणगी. बाबा, बुडास धरीत जावें. फांद्यास धरूं नये. मी निरंतर तुझ्या पाठीशीं आहें. ' रात्रौ ९ वाजता जगास धन्य करणारी माऊली दत्त रूपांत विलीन झाली. सर्व देह जळाला परंतु हाताचा पंजा जळेना. लोक संमतीनें त्या तळहाताला पुन्हां अग्निडाग दिला तरी पूर्ववतच राहिला. ज्या हातांत श्री दत्तप्रभूनीं प्रसाद दिला तो कसा जळेल! त्या तळ हाताच्या अस्थीवर हैद्राबादेंत समाधी बांधण्यांत आली. आईच्या प्रेमाखातर शाणबती श्राद्ध आरंभापासून वर्षश्राद्धापर्यंत सुरूं केलें. स्वतः पुत्रानेंच स्वयंपाक करावयाचा असतो. रोज ८ चटण्या. ५ पक्वान्नें व ५ भाज्या कराव्याच लागतात. असें सतत १२ महिने. हें सर्व ऐकल्यावर धन्य तो सुपुत्र असेच उद्गार कोणाच्याही मुखांतून बाहेर पडतील.

---

देवत्व मिळविणें, देवत्व जगणें ही साधी गोष्ट नाहीं. अंगीं अफाट शौर्य, धैर्य व अपरंपार उत्साह असल्याशिवाय कोणींहि दैवी जीवनाकडे जाऊं शकत नाहीं.

—योगी अरविंद

# संतांच्या सहवासांत

संत म्हणजे प्रति भगवंताचे अंश; नव्हे त्याच्याच चालत्या बोलत्या प्रतिमा. त्यांचा उपकारक व प्रेरक सहवास कोणाला हवा हवासा वाटणार नाहीं?

## मरणाचें भय

एकदां एकनाथाजवळ एक गृहस्थ गेले आणि म्हणाले, 'महाराज! आपलें जीवन किती साधें, किती निष्पाप; आमचें असें कां बरं नाहीं! तुम्हीं कधीं रागावत नाहीं; कोणाशीं भांडत नाहीं व तंटाही करीत नाहीं. किती शांत, पवित्र व प्रेमळ अहांत तुम्हीं!'

नाथ म्हणाले, 'माझी गोष्ट राहूं द्या क्षणभर बाजूला! तुझ्याबद्दल मला एक गोष्ट समजली आहे. सांगूं कां? आजपासून सात दिवसांनीं तुझें मरण आहे!'

नाथांनीं सांगितलेली गोष्ट. ती खोटी कशी मानावयाची? सात दिवसांनीं मरण! अरे बाप तूं! फक्त १६८ च तास बाकी! अरेरे! आतां पुढें कसें करायचें!

तो मनुष्य घाईघाईनें घरीं गेला कांहीं सुचेना त्याला! निखानिखीच्या गोष्टी बोलूं लागला; करूं लागला. तो आजारी झाला व अंथरुणावर पडून राहूं लागला.

अशा स्थितींत सहा दिवस कसेबसे गेले. सातव्या दिवशीं नाथ त्याच्याकडे गेले. त्यांना पहातांच त्या गृहस्थानें नमस्कार केला.

नाथांनीं विचारलें, 'कसं काय? ठीक आहे ना!'

कसलं ठीक आणि कसलं काय? जातों आतां!' तो म्हणाला.

'या सहा दिवसांत किती पाप केलं?'

'पापाचा विचार करायला वेळच झाला नाहीं. डोळ्यासमोर एकसारखें मरण होतें!' तो आसन्नमरण गृहस्थ म्हणाला.

यावर नाथ म्हणाले, 'आमचें जीवन निष्पाप कां असतें, यांचें उत्तर आतां तुला मिळालें ना?'

मरणाचा बागोबा सदैव समोर उभा असतां पाप करण्याची बुद्धि कोणाला होईल! पाप करण्यासाठीं निश्चिंतता लागत असते. मरणाचें नेहमीं स्मरण ठेवणें, पुढच्या क्षणाला मला या जगाचा निरोप घ्यावा लागणार आहे, या गोष्टीची

स्मृति जागी असल्यावर पाप हातून कसें घडेल? पापापासून मुक्त होण्याचा तोच एक उपाय आहे.

× × ×

## चोरी अंगाशीं आली !

देहू गावांत एक सावकार रहात होता. त्याच्याजवळ संपदा पुष्कळ होती; त्यामुळें तो नेहमीं काळजींत असे. दरोडेखोर येतील डल्ला मारतील ही त्याला सदा-सर्वकाळ चिंता !

तुकोबा रात्रभर कुठें तरी बसून टाळ कुट्टून भजनाचें पीठ पाडीत असतो. त्याला वेठीला धरला तर त्याचेंही काम होईल व आपलेंही होईल असा विचार करून एक दिवस तुकारामाला गांठून तो सावकार म्हणाला, 'अहो बुवा! तुम्हीं सबंध रात्र जागे राहून भजन करीत असतां; मग आज रात्रींपासून माझ्या घरासभोंवतीं फिरून भजन करा ना. त्यामुळें मला सुखानें झोंप तरी येईल!'

'ठीक आहे; आज्ञा शिरसावंद्य!' बुवा म्हणाले.

त्याप्रमाणें रात्र होतांच हातीं तंबोरा घेऊन तुकारामबुवा सावकाराच्या घरीं आले. व त्याच्या घरासभोंवार फिरून हरिनामाचा गजर करूं लागले! अशा स्थितींत २।४ दिवस निघून गेले; आणि एके दिवशीं २।३ चोर दरोडा घालण्याच्या हेतूनें तेथें आले; परंतु पहातात तों काय; बुवा भजन करीत रात्र जागवीत आहेत! मोठाच पेचप्रसंग!

त्यांस पाहून तुकोबा म्हणाले, 'काय हो, एवढ्या रात्रीं कशाला येण्याची तसदीं घेतली?'

'तसं कांहीं नाहीं. या घराचा मालक चांगला गबर आहे. घरांत प्रवेश करून कांहीं मिळालं तर पहायचं आहे! जरा मेहरबानी करून येथें भिंतीला टेकून उभे रहाल कां?'

बुवा सांगितल्याप्रमाणें टेकून उभे राहिले आणि चोरांनीं त्यांच्या खांद्यावर चढून खिडकीवाटे घरांत प्रवेश केला.

सहज हातीं लागला तेवढा मौल्यवान् ऐवज घेऊन चोर गेले त्याचप्रमाणें ते खिडकीवाटे बाहेर आले व 'आतां खुशाल चालूं द्या बुवा तुमचं भजन!' असें म्हणत त्यांनीं तेथून पोबारा केला.

सकाळीं उठतांच सावकारास सर्व हकिगत समजून आली. तो तुकारामास त्वेषानें म्हणाला, 'माझा सारा ऐवज आतां मी तुमच्यापासून भरून घेणार! सोड-णार नाहीं तुम्हांला!'

बुवा विचारांत पडले; परंतु क्षणभरच. त्यांनीं पांडुरंगाचा धांवा सुरू केला. भक्ताची आर्त हांक पांडुरंगाच्या कानीं गेली.

तिकडे चोर त्या सावकाराच्या घरांतून बाहेर पडले; परंतु कांहीं केल्या त्यांना घरची वाट सांपडेना. थोडें चालून जावें आणि पहावें तों पुन्हां पुन्हां सावकाराचेंच घर दृष्टीसमोर! निरुपाय झाला त्यांचा! मार्ग

सांपडेना. उपाय सुचेना. शेवटीं त्यांना तुकोबांची आठवण झाली. भगवंताचें भजन करणाऱ्या त्या संताच्या खांद्यावर पाय देऊन आम्हीं गृहप्रवेश केला; केवढी चूक घडली हातून असें त्यांना वाटूं लागलें.

ते चोर आपण होऊन सावकाराच्या घरीं गेले व त्याचें सारें जडजवाहीर त्याच्या स्वाधीन करून व क्षमा मागून चालते झाले!

× × ×

## भक्ताचिया काजासाठीं

भगवद्भक्त नरसी मेहत्यास कोण ओळखत नाहीं? महात्मा गांधी यांच्या प्रार्थनेंत नेहमीं येणारें 'वैष्णव जन तो तेणें कहिये पीड पराई जाणे रे' या सुंदर गीताचे जन्मदाते या नात्यानें त्यांचें नाव जगविख्यात होऊन राहिलें आहे.

नरसी मेहत्यास एक कन्या व एक पुत्र होता. कन्या विवाहीत होऊन तिला ऋतुदर्शन झालें तेव्हां फळशोभनाकरितां व्याह्याकडून नरसीला आमंत्रण आलें. त्याप्रमाणें नरसीनें कन्येच्या घरीं जाण्याची तयारी केली. त्याच्यासारख्या विरागी हरिभक्ताची तयारी ती काय असायची? आपल्या हातांतील नेहमींचा टाळ व तंबोरी धारण करून नरसी मेहता घराबाहेर पडला. कन्येच्या आहेराची तिच्या आईला काळजी! बाहेर पडण्यापूर्वी तिनें भीत भीत विचारलें,

'अहो! व्याह्याकडे जात आहांत खरे; परंतु आहेरादाखल कांहीं घेतलंय का बरोबर?'

'कोणालाहि अहेर करण्यास हरिनामाशिवाय आमच्यापाशीं दुसरें काय आहे?' नरसीनें उत्तर दिलें.

तें विचित्र उत्तर ऐकून नरसीची बायको बिचारी खिन्न झाली. नरसीनें तिच्या त्या खिन्नतेकडे लक्ष पुरविलें नाहीं. त्याचें हरिनामाचें गुणगुणणें चालू होतें.

नरसी मुलीच्या सासरीं जाऊन पोहोंचला. तेथें जवळपासचीं व दूरदूरचीं सोयरीधायरीं जमा झालीं होतीं. माठा अवर्णनीय थाटमाट चाललेला होता. गळ्यांत तुळसीची माळ व हातांत टाळ असें तें नरसीचें ध्यान म्हणजे त्या जमावांत तें थट्टेचा विषय होऊन राहिलें होतें. त्याची थट्टा चालू असतां कोणी कोणी आणि विशेषतः स्त्रिया त्याच्या कन्येला टोंचून बोलण्याची हौस भागवून घेत होत्या!

आपल्या दरिद्री पित्याला जो तो हिणवीत आहे हें पाहून त्या मुलीला पराकाष्ठेचें दुःख झालें; पण काय करणार बिचारी! ती असहाय्य अबला होती.

तेथील एकंदर वातावरणाची नरसीला बरोबर कल्पना झाली. तो बेफिकीर होता. त्याचा सारा भरिभार भगवंतावर! त्या थट्टा मस्करींत गुंतलेल्या स्त्री पुरुषांस उद्देशून नरसी म्हणाला, 'मी येथें सर्व तयारीनिशीं आलों आहे. तुमच्यापैकीं कोणाला काय अहेर पाहिजे त्याची एक

यादी तयार करा व ती मला द्या. कृपा करून मागाहून रुसणें फुगणें नको!'

काय हा वेड्यासारखें बोलत आहे, हीच सर्वांची कल्पना; परंतु त्यांतील स्वतःस हुषार समजणारा एक गृहस्थ हातीं कागद—पेन्सील घेऊन पुढें सरसावला. व्याही, जांवई, सगेसोयरे वगैरे प्रत्येकास विचारून त्यानीं जें जें मागितलें तें तें त्यांच्या नावें लिहून एक भली मोठी यादी त्यानें लिहून तयार केली आणि हें सारें नरसीच्या चेष्टेखातर! ती यादी नरसीच्या हातीं मिस्कीलपणें देण्यांत आली. नरसीनें तिच्यावरून नजर फिरविली व लेखकास विचारलें, 'तुम्हीं आपलें नाव व काय हवें तें नमूद केलें आहे ना?

'मला तुम्हीं काय देणार?' तो लेखक मिस्कीलपणें म्हणाला, 'आग्रह आहेच तर लिहितों. मला एक मोठा काळा फत्तर पाहिजे!'

'मग लिहा ना तसें!' नरसीनें सांगितलें.

झालें; यादी तयार झाली. इकडे नरसीची चेष्टा चालली होती तर तिकडे वाजंत्री वाजत होतीं. जेवणाखाण्याचा थाट चालू होता. नरसी मेहता हातीं तंबुरी व टाळ घेऊन एकीकडे देवाला आळवीत होता. त्यानें वैकुंठपती विष्णूची एकनिष्ठेनें आराधना चालविली होती. भक्ताचा पाठीराखा पांडुरंग नरसीसाठीं धांवत येत होता.

थोड्याच वेळानें पाठीवर नानाप्रकारच्या कापडांचा गठ्ठा व काखोटीला जडजवाहिराची व अलंकारांची पेटी, अशा थाटांत एक ब्राम्हण हुश्श करून दरवाजासमोर उभा राहिला. त्यानें सर्वांसमोर कापडचोपडाचा गठ्ठा उलगडला व ज्याच्या त्याच्या मागणीप्रमाणें कपडालत्ता, लुगडीं वाटण्यांत आलीं; तसेंच ज्यानीं अलंकार मागितलें होते त्यांच्या स्वाधीन अलंकार व जवाहिर करण्यांत आलें. प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें मिळालें. तो मिस्कील यादी लेखक तेवढा शिल्लक राहिला होता. त्याच्यासाठीं त्या ब्राह्मणानें वजनदार काळा फत्तर आणिला होता तो त्याच्या डोक्यावर ठेऊन व सर्वांची संभावना करून व निरोप घेऊन तो ब्राह्मण निघून गेला. जशी इच्छा तसें फळ!

× × ×

## लहान भावाला आधीं उठूं दे!

एकदां धुळ्याला एका दिवाणखान्यांत सभा भरली होती. संत विनोबाजी प्रश्नांना उत्तरें देत होते. एका वकिलानें विचारलें, 'अमूक केवळ ब्राह्मणेतर आहे म्हणून का त्याला मत द्यावें? कांहीं योग्यायोग्यता नको का बघायला!'

विनोबाजी म्हणाले, 'तुमच्या म्हणण्याचा आशय मी समजलों. त्यावर महाभारतांतील एक लहानशी कथा सांगतों. पांडव वनवासांत होते. धर्माला तहान लागली. पाणी आणायला सांगितलें. अर्जुन धांवत गेला. एका सरोवराच्या काठीं आला. तेथें एक यक्ष होता. तो

अर्जुनास म्हणाला, 'अगोदर माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे व मग पाणी ने.'

अर्जुनानें तें ऐकलें नाहीं. तो उत्तर न देतां पाणी नेऊं लागला व जागच्याजागीं मरून पडला. नंतर भीम आला. त्याचें तसेंच झालें. नकूळ आला त्याचीही तीच गत. शेवटीं सहदेव आला आणि तोही मरून पडला!

शेवटीं स्वतः आले धर्मराज. त्यांनीं यक्षाला प्रश्न विचारायला सांगितलें. यक्षानें प्रश्न विचारले व धर्मराजानीं त्यांचीं समर्पक उत्तरें दिलीं.

यक्ष प्रसन्न होऊन म्हणाला, 'आतां वर माग.'

धर्म म्हणाला, 'सर्वांत लहान सहदेव आहे; त्याला अगोदर उठूं दे.'

यक्ष म्हणाला, 'भीम, अर्जुन हे तुझे सख्खे भाऊ व पराक्रमी भाऊ! त्यांना प्राणदान मागण्याऐवजीं त्या सहदेवाला उठायला काय लावतोस?'

धर्म म्हणाला, 'जो सर्वांहून लहान असेल तोच आधीं उठूं दे.'

यक्ष प्रसन्न झाला व त्यानें सर्वांनाच उठविलें.

आपणही असेंच म्हणूंया कीं, जो सर्वांत मागासलेला आहे तो आधीं पुढें येऊं दे. जे मागें आहेत, जे पडलेले आहेत, ते अगोदर उठूं दे. तुम्ही ब्राम्हणांनी आज पर्यंत पुढाकार मिरविलात आतां त्यांना पुढें येऊं दे. तुम्ही त्यांना मदत करा. स्वतःजवळचें ज्ञान, माहिती त्यांना द्या. त्यांना कारभार करूं द्या? त्यांना नको कां समाधान? ते नको कां पुढें यायला?

असें बोलतां बोलतां विनोबाजींच्या मुखांतून पुढील अभंगचरण बाहेर पडला —'देह आणि देहसंबंधीं निंदावीं। आणिक वंदावीं श्वानसूकरें.' हा माझा, हा माझा नातलग, हा माझ्या जातीचा ही भावना बाळगूं नये. आपल्या जवळच्या लोकांचे दोष पहावे व जे दूरचे वाटतात त्यांचे गुण पहावे. अशी दृष्टि ठेवाल तरच या महान् देशाचे प्रश्न सुटतील.'

———

श्री साईनाथ प्रसन्न

स्थापना ] खास लोकाश्रयाखालील [ १९२५

# हरि महादेव वैद्य (रत्नागिरीकर)

सोनें, चांदी, मोती व जवाहिर

यांची लोकप्रिय पेढी

**न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई**

टे. नं. ६०३५१ GRAM : JEWELKING

# देव आणि धर्म

## आधुनिक तत्त्वचिंतकाची विचार-धारा

### सत्य म्हणजेच परमेश्वर

जगाच्या आरंभापासून शहाणीं त्याचप्रमाणें अडाणी माणसेंही असें गृहीत धरून चाललीं आहेत कीं, आम्ही बोलतों, चालतों, खातों, पितों अर्थात् आमचें अस्तित्व आहे हें जितकें खरें आहे तितकेंच देवाचेंही अस्तित्व आहे हें खरें आहे. जर देव नाहीं तर आम्हींही नाहीं.

अशा रीतीनें मानवजात देवाच्या अस्तित्वावर श्रद्धा ठेवीत आलेली आहे. सूर्य प्रकाश देत आहे म्हणजे सूर्य आहे हें जितकें सत्य आहे, तितकेंच देवाचें अस्तित्वही खरें आहे.

या जिवंत श्रद्धेमुळें जीवनाचीं असंख्य कोडीं सोडविलीं गेलीं आहेत. आमच्या दुःखाचा त्यामुळें आम्हांला परिहार करून घेतां आला आहे. त्यामुळें हें जीवन आम्हांला सुसह्य वाटतें. मृत्यूशीं गांठ पडेपर्यंत तो विश्वासच आम्हांला समाधान देत असतो आणि हा विश्वास आमच्याठायीं असल्यामुळें त्या सत्याचा शोध करणें, त्याच्या पाठीशीं लागणें ही एक महत्वाची तशीच मौजेची बाब होऊन राहिली आहे.

सत्याचा शोध म्हणजेच ईश्वराचा शोध. कारण सत्य म्हणजेच ईश्वर. ईश्वर या जगांत आहे. कारण सत्य आहे, हेंही सत्य आहे! अशी आमची श्रद्धा असल्यामुळें आम्हीं त्याच्या शोधार्थ निघतों. हा शोध करण्याचे मार्ग विविध आहेत. आपण हुषारीनें त्या मार्गांचा अवलंब करून शोधार्थ निघालें पाहिजे. त्यांत यशस्वी ठरलेले असेही मार्ग आहेत. त्यांचाच आपण अवलंब केला पाहिजे.

एकनिष्ठेनें या शोधार्थ जो बाहेर पडला त्याला अपयश आलें असा पुरावा सांपडत नाहीं. निरीश्वरवादी असतात ते आपली परमेश्वरावर श्रद्धा नाहीं, असा टेंभा मिरवितात; परंतु सत्याला ते मानतात; सत्यावर श्रद्धा ठेवतात आणि सत्य म्हणजे परमेश्वर हें मान्य करण्याची मात्र त्यांची तयारी नसते.

परमेश्वराचीं नांवें असंख्य व अपरिमित आहेत. त्या सर्वांत त्याला सत्य या नांवानेंही ओळखण्यांत येतें. या जगांत वावरतांना आपणांस कांहीं नीतिनियम पाळावे लागतात. त्यांचें पालन करणें म्हणजेच

देवावर श्रद्धा ठेवणें, देव आहे असें मानणें.

हिमालयावर स्वारी करावयाची तर कांहीं नियमांचें बंधन घालून घ्यावें लागतें, तरच यश मिळण्याची आशा असते. त्या नियमांपैकीं किंवा बंधनांपैकीं कांहीं पाळणें शक्य झालें नाहीं तरी ती स्वारी अशक्य होऊं शकत नाहीं. अधिक उत्साहानें यशासाठीं झटावें लागतें. ईश्वराचा शोध लावण्यासाठीं बाहेर पडावयाचें हें त्याहीपेक्षां किती तरी पटीनें महत्त्वाचें आहे. आमच्या आत्यंतिक श्रद्धेवर त्या शोधाचें यशापयश अवलंबून राहील.

—महात्मा गांधी

# वेदान्त व भारतीय संस्कृति

साऱ्या भारतीय संस्कृतीचा उगम आपणांस वेदांतापासून झालेला आढळून येईल. वेदांताची शिकवण परंपरेनें चालत आलेली व ती भारतीयवासीयांच्या रक्तांत मुरलेली आहे. जें कांहीं शौर्य, धैर्य, थोरपणा, त्याग आपल्या इतिहासांत व लोकजीवनांत वेळोवेळीं दिसून येतो, त्याचा उगम आमच्या वेदान्त तत्त्वज्ञानांतून झालेला आहे. कारण वेदान्त तत्त्वज्ञान हें जिवंत व चैतन्यपूर्ण तत्त्वज्ञान आहे. आमच्या लोकांची मनोभूमिका त्या तत्वज्ञानानें तयार केलेली आहे. भारतांतील लोकांना ग्रंथांचा अभ्यास करून ती मिळवावी लागत नाहीं तर ती परंपरागत आहे. भारताच्या व वाटल्यास आशियाच्या म्हणा, हवेंत, व वातावरणांत तें तत्वज्ञान तरंगत आहे. परकीयांनीं मात्र तें उच्च तत्वज्ञान ग्रंथाभ्यासापासून हस्तगत करावें लागतें. त्याचा अभ्यास करीत असतां ते आश्चर्यानें मुग्ध होतात; कारण त्यांच्या संस्कृतींत त्या तत्वज्ञानाचा समावेश झालेला नाहीं. भारताचें हेंच तर वैशिष्ट्य आहे.

महात्मा गांधीजींच्या थोरपणाचा व सामर्थ्याचा उगम कुठून झाला याचा शोध लावणाऱ्यास वेदान्ताकडे वळावें लागेल. पाश्चात्य सुधारणेचा व नवीन ध्येयवादाचा या देशांतील लोकांवर कितीहि पगडा बसलेला असो; त्यांना परंपरेनें जो अध्यात्माचा वारसा मिळत आहे त्यामुळें ते स्वत्वापासून सहसा ढळणार नाहींत.

या भारतीय तत्वज्ञानाची मोठी मौज आहे. गरीब असो, श्रीमंत असो; शेतकरी असो वा कामकरी असो; सुशिक्षीत असो किंवा अशिक्षीत असो; त्या सर्वांचें जीवन या परंपरागत भारतीय तत्वज्ञानाच्या सुगंधानं दरवळून गेलेलें आहे.

कांहीं व्यवसाय अप्राणाणिक स्वरूपाचे व लांछनास्पद असतात; परंतु ते चालविणाऱ्यांनींहि मनाच्या समाधानाखातर वेदान्ताच्या आधारें स्वतःच्या वागणुकीचे कांहीं नैतिक नियम ठरविलेले असतात. आणि तदनुसार वागणें हें त्यांना आपलें कर्तव्य वाटतें. हें विचित्र वाटेल; परंतु वेदान्ताचा पगडा आपल्या लोकांवर किती प्रमाणांत बसलेला आहे हें त्यापासून स्पष्ट होईल.

**— सी. राजगोपालाचारी**

## ' तो मी आहें '

यज्ञमय जीवन करून पुन्हां तें सारें ईश्वरार्पण करावयाचें असें गीतेचें सांगणें आहे. जीवन सेवामय असल्यावर आणखी ईश्वरार्पणता कशाला ! परंतु सर्व जीवन सेवामय होणें ही गोष्ट आपण पटकन् बोललों तर होणें कठीण आहे. अनेक जन्मांतीं हें थोडें फार साधेल. शिवाय सर्व कर्मं सेवामय, अक्षरशः सेवामय, झालीं तरी तीं ' पूजामय ' झालींच असें नाहीं. म्हणून 'ओम् तत् सत् ' या मंत्रानें सारें कर्म ईश्वरार्पण करावें.

सेवा—कर्म संपूर्णपणें सेवामय व्हावें. परार्थात स्वार्थ येऊनच जातो. केवळ परार्थ संभवतच नाहीं. लेशमात्रही माझा स्वार्थ ज्यांत नाहीं असें करतांना येणार नाहीं. म्हणून दिवसेंदिवस अधिक निष्काम, अधिक निःस्वार्थ सेवा हातून व्हावी असें इच्छीत जावें. सेवा उत्तरोत्तर अधिक शुद्ध व्हावी अशी इच्छा असेल तर क्रियाजात ईश्वरार्पण करा. ज्ञानदेव म्हणतात, ' नामामृत गोडी । वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकला-' नामामृतांतील गोडी व जीवनकला अलग नाहींत. नामाचा आंतरिक घोष व बाह्य जीवनकला—दोहोंचा मेळ आहे. योगी, वैष्णव एकच आहेत. परमेश्वरास क्रिया अर्पण केल्यानें स्वार्थ, परार्थ व परमार्थ एकरूप होतील. प्रथम मी तुम्हीं निरनिराळे आहोंत ते एक करायचे. 'तुम्हीं' व ' मी ' मिळून आम्हीं झालों. आतां ' आम्हीं ' आणि ' तो ' यांना एक करायचें. प्रथम माझा या सृष्टीशीं मेळ घालावयाचा व मग परमात्म्याशीं घालावयाचा. हेंच ' ओम तत् सत् ' या मंत्रानें सुचविलें आहे.

परमात्म्याचीं अनंत नावें आहेत. त्याच्या नावांचें व्यासांनीं विष्णु सहस्त्र नाम केलें. जें जें नाव मनांत मानावें त्या अर्थानें या सृष्टींत पहावें आणि तदनुरूप जीवन रचावें. परमेश्वराचें नाव मनांत भावावयाचें, तें सृष्टींत पहावयाचें व आपण त्याप्रमाणें व्हावयाचें, याला मी त्रिपदा गायत्री म्हणतों. उदाहरणार्थ परमेश्वराचें ' दयामय ' हें नांव घेतलें, तो रहीम आहे असें मानलें, तो दयाळू देव आतां

या सृष्टींत डोळे उघडे ठेवून पहावयाचा. परमेश्वरानें प्रत्येक लेकराला त्याच्या सेवेसाठी माता दिली आहे; त्याला जगण्यासाठीं हवा दिली आहे. अशा रीतीनें त्या दयामयाची सृष्टींतील दयेची योजना पहावयाची व आपलें जीवनही दयामय करावयाचें. भगवद्गीतेच्या काळीं परमेश्वराचें जें प्रसिद्ध नांव तें म्हणजे 'ओम् तत् सत् ' हें होय.

**— संत विनोबा**

## हिंदुधर्म व परंपरेचा पगडा

एखादा मनुष्य मोठा नातमान् असू शकेल. जे जे सद्गुण आहेत त्यांचें पालन करण्यासाठीं तो काटेकोरपणें वागत असेल; परंतु या जगाचें नियंत्रण ज्या ईश्वरी शक्तीमुळें होत आहे तिच्यावर जर त्याची श्रद्धा नसेल व तें समजून घेण्याची आकांक्षा जर त्याच्याठायीं नसेल तर त्याला धार्मिक प्रवृत्तीचा माणूस म्हणतां येणार नाहीं. आपल्या सभोवारचे सारे व्यवहार कसे व कोणाच्या आधारावर चालू आहेत हें समजून घेण्याची इच्छा झाली पाहिजे. मनुष्य बुद्धिमान् असला म्हणजे ती इच्छा त्याला होतेच असें नाहीं. हें साध्य होण्यासाठीं आत्यंतिक धर्मनिष्ठेची जरुरी आहे. त्या मार्गानें प्रयत्न चालू राहिले पाहिजेत. ईश्वराचें रूप पहाण्याची इच्छा बलवत्तर होत गेली पाहिजे. तो एक महान् उद्योग आहे. त्यासाठीं आपलें अंतःकरण सोज्वल व निर्मळ झालें पाहिजे. तें सत्य जाणून घेण्यासाठीं विद्वत्ता असून भागत नाहीं; तर अंतःकरण बालकाप्रमाणें निर्मळ, निर्लेप व निष्पाप बनलें पाहिजे. मन निर्मळ बनवावयाचें तर नीतिनियमांच्या पालनाची जरूरी आहे. नव्हे ती महत्वाची बाजू आहे. त्यामुळें आपण देवासन्निध जाऊं

प्रख्यात मिल्सचें सर्व प्रकारचें कापड
सर्वोत्कृष्ट डिझाईन्स माफक
भावांत खरेदी करा

**पी. मधुकर** (क्लॉथ मर्चंटस)

बोरकर वाडी, रानडे रोड, दादर, मुंबई २८

शकतों. त्या मार्गावरून वाट चाल करूं लागतों. आणि जेव्हां त्या ध्येयाप्रत तुम्हीं पोहोंचतां तेव्हां तुमचें अंतःकरण दिव्य प्रकाशानें ओतप्रोत भरून जातें. सारें जीवन त्या प्रकाशानें उजाळलें जातें. तुमच्या रोजच्या जीवनांत फरक दिसूं लागतो व तुमचा उत्साह द्विगुणीत होतो.

हिंदुधर्म प्रगतीशील व महान् ऐतिहासिक आहे. त्याची प्रगती अखंड चालूच आहे. एखादी ठेव ठेपलेली असते तिच्या रक्षकांनीं त्या ठेवीचा सांभाळ करावयाचा तसा या धर्मांचा प्रकार नाहीं. हातांत पेटती मशाल घेऊन त्या धर्मांचे अभिमानी सतत प्रगतीपथावर आहेत. हिंदुधर्मांतील लंगडी बाजूही सांगण्यासारखी आहे. त्या बाजूनें या उज्वल धर्माला काळोखी लागलेली आहे. जे परंपरेचे गुलाम आहेत तेच या धर्मांच्या प्रगतीचा मार्ग रोखून धरीत आहेत. ते पुढें पाऊल टाकूं देत नाहींत. सत्याचा व परंपरेचा झगडा चालू आहे. आपण सत्याचा पाठीराखेपणा केला पाहिजे. त्यामुळेंच आमचा मार्ग सरळ व निष्कंटक होईल.

'मी परंपरेला बांधलेला आहें.' असें परमेश्वर म्हणत नाहीं. मग तो काय सांगतो? तो सांगतो कीं, 'मी सत्य आहें.' आणि त्याच दृष्टीनें त्याच्याकडे पहावयाचें. सत्य हें सर्वांहून श्रेष्ठ आहे. कोणताहि समाज असो, तो चालीरीतींनीं व वहिवाटींनीं बांधलेला असतो; कांहीं काळ त्यांची जरूरी असते. परंतु सदासर्वकाळ मात्र नसते. त्याच चाली आणि त्याच रीतीभाती सर्वकाळ कशा बरें चालू शकतील? कालांतरानें त्या प्रगती आड येऊं लागतात. अशावेळीं आड येणारे चालीरीतींचे अडथळे कठोरपणानें दूर सारण्यांत आले पाहिजेत.

—डॉ. राधाकृष्णन्



प्रेमानें ध्यास घेऊनि, यजीं मज नमीं मज
प्रिय तूं मिळसी मातें, प्रतिज्ञा जाण सत्य ही
सगळे धर्म सोडूनि, एका शरण ये मज
जाळीन मी सर्व पापें, तुझीं शोक करूं नको

—गीताई

# श्रीअनंत व्रताख्यान

## श्रीगुरुचरित्रावरून संकलीत

पांडव वनवासांत असतांना कौरवांनीं कपट करून नानाप्रकारें त्यांना त्रास दिला. त्यांचें सत्व हरण करण्यासाठीं दुर्वास ऋषींना त्यांच्याकडे पाठविलें. परंतु श्रीहरीनें वेळींच तेथें जाऊन त्यांचें रक्षण केलें. वनवासांत त्यांनीं फार कष्ट सोसिले. भक्तवत्सल नारायणानें त्यांचे कष्ट ओळखले व वनांत ज्या ठिकाणीं त्यांचा मुक्काम होता, तेथें एके दिवशीं तो आला. श्रीकृष्ण आलेला पाहतांच पांडवांनीं व द्रौपदीनें त्याला लोटांगण घातलें. अर्घ्यपाद्य देऊन गंधाक्षता लावून त्यांनीं देवाची भक्तिपूर्वक पूजा केली.

### अपरिमित कष्ट कां ?

नंतर सर्वांनीं नमस्कार करून विनंति केली. 'देवा, तुझ्यासारखें छत्र आम्हांवर असतांना अपरमित कष्ट कां होतात ? कोणत्या प्रकारें आमचें चित्त स्वस्थ होऊन आम्हांला राज्यप्राप्ति होईल ? असा कांहीं उपाय हृषीकेशी आम्हांला सांगा.'

ही विनंति ऐकून श्रीकृष्णाचे मनांत दया उत्पन्न झाली. तो म्हणाला, 'पंडुसुतांनो, तुम्हांला एक व्रत सांगतों. त्यानें तात्काल परमेश्वर प्रसन्न होऊन राज्यप्राप्ति होईल. व्रतांमध्यें 'अनंत' नांवाचें उत्तम व्रत प्रख्यात आहे. तें तुम्हीं करावें म्हणजे तुम्हास राज्यप्राप्ति होईल. आतां अनंत कुणाला म्हणावें तें तुम्हांस सांगतों. माझा सर्व ठिकाणीं वास आहे. मलाच 'अनंत' असें नांव आहे. युधिष्ठिरा, मनांत संशय धरूं नको. अनंत म्हणजे खरोखर मीच आहें. माझी विधिपूर्वक पूजा करा. हें व्रत तुम्हाला चांगलें आहे.'

हें व्रत कसें करावें, पूजा कशी करावी. दान कोणतें द्यावें हें विस्तारपूर्वक सांगण्याविषयीं धर्मराजानें श्रीकृष्णांस विनंती केली.

श्रीकृष्ण म्हणाला, 'तूं आतां मला विचारलेंस तरी सांगतों ऐक. भाद्रपद महिन्यांतील शुक्लपक्षांतील चतुर्दशी दिवशीं अनंताची आराधना करावी म्हणजे तूं त्वरित राज्य पावशील. पूर्वीं हें व्रत कोणी केलें तें सांगतों ऐक.'

पूर्वीं कृतयुगामध्यें आसितपुरा नांवाच्या गांवांत सुमंतु नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याची पत्नी औदार्या व पतिव्रता होती. तिला सुशिला नांवाची एक कन्या झाली. पुढें दैववशें करून तिची आई मृत्यु पावली. गृहव्यवस्था योग्य रितीनें चालण्याकरितां

नंतर सुमंतु ब्राह्मणानें दुसरें लग्न केलें. दुसऱ्या बायकोचें नांव 'कर्कशी' होतें. नांवाप्रमाणेंच ती कर्कशा असून दुःशील आचरणाची होती. ती नेहमीं पतीबरोबर व सुशिले बरोबर भांडत असे.

## सुशीलेची गोष्ट

कांहीं दिवसांनीं सुशिलेचा विवाह काडिण्य ऋषीबरोबर झाला. हें नव दांपत्य कांहीं दिवस सुमंतु ब्राह्मणाकडे राहिलें. दररोज घरांत होणारीं भांडणें पाहून ऋषीनें दुसऱ्या ठिकाणीं आश्रम करण्याचें ठरविलें व आपल्या सासऱ्याची परवानगी मागितली. सुमंतुनें मोठ्या आनंदानें संमति दिली. हें दांपत्य ज्या दिवशीं दुसऱ्या ठिकाणीं जावयास निघालें त्या दिवशीं सावत्र आईनें मुलीला जेवणसुद्धां घातलें नाहीं; इतकेंच नव्हें तर दरवाजा घट्ट लावून घर बंद करून घेतलें. शेवटीं स्वयंपाकघरांत थोडा गव्हांचा कोंडा सांपडला तो सुमंतु ब्राह्मणानें कन्येला व जामाताला देऊन त्या दोघांना मोठ्या दुःखित अंतःकरणानें निरोप दिला.

माध्यान्ह काळीं एका नदी किनारीं कौंडिण्य अनुष्ठानास उतरला. पतींचें अनुष्ठान चालू असतांना सुशिलेनें नदीवर पुष्कळ स्त्रियांचा जनसमुदाय जमल्याचें पाहिलें. सर्व स्त्रियांनीं लाल वस्त्रें परिधान केलीं असून त्या पृथक पृथक कलशाची पूजा करीत होत्या. हें पाहून त्या कांहीं तरी व्रत करीत असाव्यात असें सुशिलेला वाटलें. त्यांच्याजवळ जाऊन त्या कसलें व्रत करीत होत्या असें सुशिलेनें त्यांना विचारलें.

त्या स्त्रिया सुशिलेला म्हणाल्या, 'आम्हीं अनंत व्रत करीत आहोंत. अनंताची पूजा केल्यास तात्काळ सर्व विघ्नें नाहींशीं होतात. पुढें हें व्रत कसें करावें तें सुशिलेस सांगितलें.

## व्रत कसें करावें

भाद्रपद शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं हें अनंत व्रत करावें. तांबडें लाल सूत्र घेऊन त्याला चौदा गांठीं मारून अनंत करावा. आणि तो नदीवर नेऊन नदींत शुचीनें स्नान करावें. दिव्यांबर नेसून हळदीकुंकूम लावून 'गंगा-यमुना' म्हणून दोन नवीन कलश आणावे. त्यांत पाणी भरून रत्नसहित पंच पल्लव घालून षोडशोपचारें पूजा करावी. गंगायमुनेला आरती ओवाळावी. दोन्हीं कलशावर नवीन वस्त्रें ठेवावीं. त्या कलशापुढें शंख पद्म काढून रंगमालिका घालाव्या. षोडशोपचारें करून दर्भाचे शेष पूजावे. 'शेषशाई' म्हणून श्री विष्णूचें ध्यान करावें. ॐ नमो भगवतें मंत्रानें षोडशोपचारें दर्भग्रंथी आणि नवीन दोरा आणून तेथें त्याचें ध्यान करावें. अनंत गुणरत्नाय मंत्रानें नवे दोरे कलशाजवळ ठेवून पूजा करावी. पुरुषसूक्त म्हणून अतोदेवा मंत्रानें षोडशोपचारें पूजा करून 'संसार गव्हरेति' मंत्रानें उजव्या हातांत दोरा बांधावा. नमस्ते वासुदेव मंत्रानें जीर्ण दोरा विसर्जावा, तसेंच विष्णुर्भगवान् मंत्र म्हणून गोधूम घृत वाण द्यावें. स-गुड सप्रलवाण द्यावें, अपूपादि पायसान

करून विड्यासहित दक्षिणा देऊन अर्धे ब्राह्मणाला देऊन अर्धे आपण भोजन करावें. याप्रमाणें चवदा कलश देऊन उद्यापन करावें. चतुर्विध पुरुषार्थांसह कामना संपूर्ण होतील.

## ऐश्वर्य आलें

सुशिलेनें त्या स्त्रीयांबरोबर अनंताची पूजा केली. तिच्याकडे गोधूमाचा कोंडा होता. तो तिनें अर्धा आणून वाण देऊन सर्व स्त्रियांचा निरोप घेतला. सर्वांना नमस्कार करून ती आपल्या रथाजवळ आली.

इतक्यांत अनुष्ठान संपवून ऋषी आपल्या पत्नीपाशीं आला. तीं दोघें रथावर बसून पुढें निघालीं. वाटेंत अमरावतीसारखें एक नगर त्याना लागलें. त्या नगराचे लोक त्याना सामोरे आले व स्वामीमहाराज चला असें म्हणाले. तुम्ही या नगरीचे अधिपति तपोनिधी आहांत : श्रीमदनंताचे प्रसादें करून त्यांनीं ऐश्वर्य सुख भोगिलें.

एकेदिवशीं तीं दोघे आनंदांत बसलीं असतां आपल्या पत्नीच्या हातांत अनंताचा दोरा बांधला असल्याचें पाहतांच कौंडिण्यानें सुशिलेस विचारलें. 'तुझ्या हातांत हें तूं काय बांधिलें आहेस? मला वश करून घेण्यासाठीं हा तांबडा दोरा तूं बांधला आहेस काय?' सुशिलेनें नवऱ्यास सांगितलें कीं तो अनंताचा दोरा आहे. तिनें अनंतव्रत केल्यामुळेंच त्याना हें ऐश्वर्य प्राप्त झालें होतें, असेंही सांगितलें.

हें ऐकून कौंडिण्याला फार राग आला. त्यानें तो दोरा हिसकावून घेऊन अग्निकुंडांत टाकला. आणि म्हणाला 'कसला आला आहे श्रीमदनंत? मी पुष्कळ दिवस तप केलें म्हणूनच आम्हांला हें वैभव मिळालें. तूं माझ्यावर वशीकरण करून दोरा बांधला आहेस.' सुशिला अग्निकुंडाकडे धावत गेली व तिनें तो दोरा दुधांत भिजविला.

या दोषामुळें श्री अनंताचा कौंडिण्याकर रोष झाला. तत्क्षणीं त्याचें अष्टैश्वर्य गेलें व तो दरिद्री झाला. ऋषीचा गर्वपरिहार झाला व त्याला त्याच्या कृत्याचा पश्चात्ताप वाटूं लागला. त्यानें मनांत नेम केला. जेव्हां मला लक्ष्मीनाथ भेटेल, श्रीमदनंताच्या दर्शनाचें सुख जेव्हां मला मिळेल, तेव्हांच मी अन्नोदक घेईन; तोंपर्यंत घेणार नाहीं.

## ऋषीचा पश्चात्ताप

असा पक्का निर्धार करून आपल्या भार्येसहित कौंडिण्य मुनि अरण्यांत जाण्यासाठीं निघाला. 'हा अनंता!' असें म्हणून तो भटकत होता. वाटेंत फळापुष्पांनीं भरलेला एक वृक्ष त्यानें पाहिला. परंतु कोणीही त्या झाडाचीं फुलें खात नव्हतें. पुढें त्याला गवतांतून फिरत असलेली एक गाय दिसली. परंतु तिच्या तोंडीं गवत येत नव्हतें. पुढें त्याच्या दृष्टीस एक भला मोठा बैल पडला. हा गोस्वामी सुद्धां गवतास स्पर्श करीत नव्हता. नंतर

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा

त्यानें दोन सरोवरें पाहिलीं. त्या दोन्हीं सरोवरांचें पाणी एकत्र मिळालें होतें. त्या पाण्यांत कमल पुष्पें होतीं तरी सुद्धां हंसाधि पक्षी तें पाणी पीत नव्हते. पुढें त्याला हत्ती व गाढव भेटलें. या सर्वांना ऋषीनें अनंत पाहिला आहे काय असें विचारलें. प्रत्येकानें नकारार्थी उत्तर दिलें. कौंडिण्य अगदीं दमून गेला. अनंता, अनंता म्हणत तो जमीनिवर निचेष्ट पडला.

इतक्यांत एक वृद्ध वेषधारी ब्राह्मण त्याच्याजवळ आला व त्यानें ऋषीस सावध केलें. ऋषीनें श्रीमदनंत कोठें आहे म्हणून विचारलें. ब्राह्मण म्हणाला, मी तुला दाखवितों. नंतर ब्राह्मणानें त्याला एका नगरांत नेऊन रत्नखचित सिंहासनावर बसविलें. तो ब्राह्मण श्रीमदनंत होता. कौंडिण्यास तें रूप पाहून आनंद झाला व वैकुंठनायकांची त्यानें भक्तिपूर्वक स्तुती केली. ह्या स्तवनानें श्रीमदनंत प्रसन्न झाले व कौंडिण्याला वर दिला.

वनांमध्यें जे विचित्र प्राणी भेटले त्याबद्दल ऋषीनें देवास विचारलें. कृपानिधी नारायण विस्तारपूर्वक सांगूं लागले, 'कौंडिण्या, तूं जो वृक्ष पाहिलास तो एक वेदनिपुण ब्राह्मण होता. उन्मत्तपणानें व गर्वामुळें तो वृक्ष झाला. ती गाय पूर्वी निष्फला भूमी असून एका ब्राह्मणाला दिली होती. बैल महा धनिक ब्राह्मण होता, परंतु त्यानें कधींच दानधर्म केला नाहीं. दोन सरोवरें ह्या दोघी बहिणी असून त्यानीं आपापसांत दान वाटून घेतलें होतें. खर तुझा क्रोध व कुंजर तोच तुझा उन्मत्तपणा. ब्राह्मण तो मी. आतां तुझें मन शुद्ध झालें. तूं जें जें पाहिलेंस त्या सर्वांना मुक्ति दिली आहे. तूं ऐश्वर्य भोगून स्वर्गी जाशील.' असा वर मिळाल्यावर कौंडिण्यानें पुष्कळ दिवस राज्य केलें व शेवटीं तो स्वर्गभुवनीं गेला.

अशी कथा श्रीकृष्णानीं धर्माला सांगितली. नंतर धर्मानें हें अनंतव्रत मोठ्या भक्तीनें केलें व त्याला ऐश्वर्य प्राप्ति झाली.

———

ARSA PRODUCTS

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स

# समृद्ध जीवनाचा वाटाड्या

## सुखासमाधानाचा महामंत्र

दुसऱ्याची कोणतीही वस्तु असो; संपदा असो, बायको असो, किंवा इतर कोणतीही वस्तु असो, तिचा लोभ आपण करूं नये. स्वावलंबनानें, स्वकष्टानें जें कांहीं दुसऱ्यास उपसर्ग न देतां मिळवितां येईल, तें मिळवावें व त्यांत समाधान मानून रहावें. अपहार करण्याची बुद्धि अत्यंत खोटी आहे. तसेंच दुसऱ्याच्या मर्मी घावें केव्हांही घालूं नये. दुसऱ्याचें मन दुखविणें, त्याला शब्दबाणानें जखमी करणें यासारखें दुसरें पाप नाहीं. ज्यानें जन्म दिला व ही सृष्टि निर्माण केली त्याचें कृतज्ञतापूर्वक अहोरात्र स्मरण करावें. म्हणजे मग पहा तुमची जीवनयात्रा कशी सुखदायी व सफल होते ती !

हेंच आमच्या ऋषिमुनींनीं तुमच्या आमच्या सुखासमाधानासाठीं हजारों वर्षांपूर्वी सांगून ठेविलें आहे. तो सुखासमाधानाचा महामंत्र आपल्या मनावर कोरून ठेवा :—

कस्यचित्किमपि नो हरणीयम्
मर्मवाक्यमपि नोच्चरणीयम् ।।
श्रीपतेः पदयुगं स्मरणीयम् ।
लीलया भवजलं तरणीयम् ।।

'कोणाच्या कोणत्याही गोष्टीचा अपहार करूं नका. दुसऱ्यांचीं मनें दुखविलीं जातील असे शब्द उच्चारूं नका. नेहमीं भगवंताच्या चरणकमलांचें स्मरण करा. म्हणजे हा जीवनसागर तुम्हीं सहज तरून जाल.'

० ० ०

## प्रथम स्वतःची सुधारणा करा

दुसऱ्यांनीं आपला मान ठेवावा व आपल्याशीं सभ्यतेनें वागावें असें तुम्हांला वाटतें ना? मग तशीच स्वतःची वागणूक ठेवा. मग सन्मान आणि सभ्यता तुमच्या मागें धांवत येतील.

दुसऱ्यांवर ताबा मिळवावा व दुसऱ्यांवर हुकमत चालवावी असें वाटतें ना तुम्हांला? तें हें वाटणें ठीक आहे; परंतु प्रथम स्वतःवर ताबा तर मिळवा आणि मग इतरांच्या वाट्यास जा.

दुसऱ्यांशीं कांटेकोरपणानें वागण्यापूर्वी किंवा दुसऱ्यांवर कठोर टीका करण्यापूर्वी प्रथम स्वतःच्या बाबतींत कांटेकोरपणें व कठोरपणें वागण्यास शिका.

भीति म्हणजे गुलामगिरी; उद्योगशीलता म्हणजे स्वातंत्र्य व धडाडी म्हणजे विजय. हीं तीन समीकरणें त्रिकालाबाधित आहेत. तीं तिन्हीं आपल्या

मनावर कोरून ठेवा व तीं आचरणांत आणण्यासाठीं अखंड झटा.

० ० ०

## मतें पटविण्याचा मार्ग

तुम्हांला आपलीं मतें दुसऱ्यांस पटवायचीं आहेत ना? मग तीं अट्टाहासपूर्वक व तात्रातावानें पुढें मांडल्यानें तुमचा हेतु साध्य होणार नाहीं. त्याऐवजीं 'मी पुढें मांडीत असलेलीं मतें किंवा विचार कदाचित् चूकहीं असूं शकतील आणि तें असल्याचें आढळून आल्यास माझ्या विचारांत मी जरूर दुरुस्ती करीन. परंतु मला असें कां वाटतें हें मी आपणास सांगूं इच्छितों.' अशा प्रकारच्या निरहंकारी व नम्र भाषेचा तुमच्या विरोधकावर इष्ट तो परिणाम घडून आल्याशिवाय रहाणार नाहीं.

'माझे विचार कदाचित् चुकीचेही असूं शकतील' अशी प्रस्तावना केल्यानें आपण आपली बाजू अर्धी अधिक बळकट करीत असतों; परंतु हें फार थोड्यांना साधतें. तुम्हीं तुमच्याबद्दल दुसऱ्याच्या मनांत द्वेषाची वा सुडाची भावना उत्पन्न न करतां विश्वासाची आदराची व प्रेमची भावना जागृत करण्यासाठीं झटलें पाहिजे; परंतु असल्या लहानसहान गोष्टींची मातब्बरी आपणांस सहसा वाटत नाहीं; आणि अशा लहानसहान गोष्टींनींच जीवन सुंदर व समृद्ध होत असतें हें आपण जाणत नाहीं.

० ० ०

## बाजू लंगडी करूं नका

एखाद्याचे विचार किंवा मतें तुम्हांला चुकीचीं वाटलीं तर एकदम उतावळेपणानें त्याच्यावर तुटून पडूं नका. जरा सबुरीनें घ्या. तुमचे विचार पुढें मांडण्याची वेळ येईलच. त्या संधीचा शांतपणें फायदा घ्या. अधीर न होतां सावकाशीनें आपलीं मतें पुढें मांडा; आणि तीं अशा स्वरूपांत पुढें मांडा कीं त्या तुमच्या मांडणी कौशल्याबद्दल कोणीहि तुमचें कौतुक करावें. दुसऱ्याचीं मतें खोडून काढण्याचे अनेक मार्ग आहेत. दुसऱ्यावर एकदम तुटून पडणें, आपलेच विचार बरोबर आहेत असा अट्टाहास करणें व तुमचें म्हणणें निखालस खोटें व माझेंच बरोबर आहे असें ठासून सांगणें, हा मार्ग चुकीचा व तुमची बाजू लंगडी करणारा आहे.

० ० ०

## जगाचा न्याय!

'जशास तसें' हा चालू जगाचा न्याय आहे. तुम्हीं जें पेराल तेंच उगवेल. प्रेमाची, आदरभावाची व सहानुभूतीची पेरणी केल्यास तुमच्या हातीं प्रेमादर व सहानुभूति येईल. अनादर, द्वेष व तुसडेपणा प्रगट केल्यास तुमच्या वांट्यास तेंच पीक दिढी दुप्पटीनें येईल याची खात्री बाळगा. मान द्यावा आणि मान घ्यावा, हा या जगाचा सरळ न्याय आहे. तुम्हीं दुसऱ्यांशीं जितक्या मानसन्मानानें वागाल, त्याहीपेक्षां अधिक मानसन्मानानें व अदबीनें दुसरे लोक

तुमच्याशीं वागतील, याची मनाशीं खूणगांठ बांधून ठेवा. इस हात दे, इस हात ले! असा या जगाचा रोखठोकीचा न्याय आहे. हा न्यायाचा कांटा बरोबर संभाळा म्हणजे तुमच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी सहसा येणार नाहीं!

० ० ०

## प्रयत्न म्हणजेच परमेश्वर!

अहो! तुम्हीं हें सर्व सांगत आहांत तें सगळें खरें असेल; परंतु तें आचरणांत आणतां येईल तेव्हां ना? केवळ वाचनानें किंवा श्रवणानें कांहीं साध्य होत नाहीं. आपण प्रयत्नशील बनलें पाहिजे. त्यासाठीं सतत यत्न करीत राहिलें पाहिजे. यत्नांनीं साध्य होत नाहीं, अशी जगांत कोणती बरें गोष्ट आहे? आतां जें वाचलें तें रोजच्या जीवनांत, आचरणांत आणण्याचा प्रयत्न तर करून पहा. आणि मग पहा काय चमत्कार घडून येतो तें!

माहीत आहे का तुम्हांला? अहो! प्रयत्न हाच परमेश्वर आहे. या यत्नदेवाला प्रसन्न करून घ्या. त्याच्या कृपेला पात्र व्हा म्हणजे दुबळे असतील ते सबल होतील व आज लहान असतील ते उद्यां मोठे होतील; आणि करंट्यांचे कर्तबगार होतील. या यत्नदेवाची तुमच्यावर कृपा झाली म्हणजे तुम्हीं भाग्यहीन असलां तर भाग्यवंत व्हाल, फार काय? तुम्हीं जरी दगड असलां तरी तुमच्यांत देवकळा येईल. व तुम्हीं प्रती परमेश्वर व्हाल! म्हणूनच म्हटलें आहे कीं, 'यत्न तो देव जाणावा.' जेथें यत्न आहे तेथें देव आहे.

समर्थ रामदासांनीं टाहो फोडून सांगितलें आहे कीं, 'भाग्यासी काय उणें रे! यत्नावांचूनी राहिलें ॥' यासाठीं, यत्नाची कांस धरा! सतत ध्येयसिद्धीसाठीं यत्न व उद्योग करीत रहा!

० ० ०

## दुसऱ्याचे आशीर्वाद मिळवा

स्वार्थ सोडणें व इतरांच्या उपयोगी पडणें याचा अर्थ संतांप्रमाणें आपलें सर्वस्व देऊन टाकून निष्कांचन बनणें नव्हे. व्यवहारांत स्वतःबद्दल फाजील कांटेकोर न रहातां किंवा क्षुल्लक स्वार्थासाठीं इतरांचें नुकसान न करतां दुराग्रह बाजूला ठेवून इतरांस शक्य तेवढी संधी देणें हें आपणास मनांत आणलें तर जमण्यासारखें आहे.

एखाद्या दिवशीं सकाळपासून दुसऱ्यांशीं मिळतें घेण्याच्या किंवा दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याच्या या प्रयोगाला सुरुवात करा. मुलांवर न रागावतां त्यांना त्यांच्या चुका सहज रीतीनें समजावून देण्याचा प्रयत्न करा. वाचायला आणलेलें शेजाऱ्याचें साहित्य आभारपूर्वक परत करा. सौभाग्यवतीच्या पाककौशल्याची मुत्सद्दीपणानें तारीफ करा. कचेरींत सहकाऱ्यांस स्वतःचें काम सांभाळून मदत करा. कुटुंबियांची आस्थेवाईकपणें चौकशी करून व देवाचें नामस्मरण करून अंथरुणाला पाठ लावा. पहा, किती बरें वाटतें व समाधानपूर्वक तुमचा डोळा लागतो तें! त्या मनःस्थितींत कांहीं ना कांहीं गोड अनुभव तुम्हांला आल्याशिवाय रहाणार नाहीं.

या जगांत पैशानें काय वाटेल तें मिळूं शकतें. परंतु दुसऱ्याच्या अंतःकरणाचा गोड दुवा मात्र केवळ पैशानें तुम्हीं मिळवूं शकणार नाहीं. तो मिळवायला तुम्हीं तुमचें अंतःकरण उदार व मोठें केलें पाहिजे. पैशांची देवघेव ही अल्पकाल टिकणारी व एकालाच फायदेशीर होणारी आहे; परंतु अंतःकरणाची, प्रेमभावाची व खुल्या दिल्याची देवाणघेवाण ही उभयपक्षीं फायद्याची व चिरंतनकाळ आनंद देणारी असते.

० ० ०

## ज्ञानसंवर्धन व आचरण

सुप्रसिद्ध तत्वज्ञ व भारताचे उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् हे मागें एकदां मुंबईत आले असतां मोगवीरा मंडळाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगीं भाषण करतांना प्रत्येक मनुष्यानें आजच्या काळांत ज्ञान-संवर्धनाकडे लक्ष पुरविणें किती जरूर आहे हें विशद करतांना म्हणाले होते कीं, आम्हीं यांत्रिक आणि तांत्रिक ज्ञान कितीही संपादन केलें, तरी आमच्या ठायीं सद्वर्तनाचा व नीतिमत्तेचा अभाव असल्यास आमचा सर्वनाश ठरलेला आहे. मनुष्य पापभीरू असला पाहिजे. तो श्रद्धावान् असला पाहिजे. पापपुण्याची त्याला चाड असली पाहिजे. परंतु त्यासाठीं लहानपणापासून चांगल्या संवयी जडल्या पाहिजेत. चांगले ग्रंथ वाचण्याची व जें वाचलें किंवा ऐकिलें असेल त्यावर विचार करून तें पचनीं पाडण्याची व तें आचरणांत आणण्यासाठीं झटण्याची संवय जडली पाहिजे. केवळ लिहितां वाचतां येणें म्हणजे शहाणे होणें नव्हे. ग्रंथांच्या वाचनापासून होणारा आनंद आम्हांला जास्तींत जास्त लुटतां आला पाहिजे. आमच्या दैनंदिन जीवनांत त्यामुळें प्रकाश पडत गेला पाहिजे. असें नाहीं झालें तर आम्हीं तामसी व राक्षसी वृत्तीचे होऊं.


० ० ०


## फार कमी बोलणें चांगलें ?

पुष्कळ लोकांना आपल्याकडे आलेल्या माणसाबरोबर एकसारखें बोलत रहाण्याची व स्वतःची बढेजाव आणि असली नसलेली कर्तबगारी सांगत बसण्याची दुष्ट खोड असते. त्याऐवजीं स्वतः कमींत कमी बोलून दुसऱ्यास बोलके करायचें व त्यापासून शक्य तेवढा लाभ उठविण्याचें धोरण हें नेहमींच फायद्याचें असतें.

एकाद्या थोर माणसाकडे तुमचें कांहीं काम आहे. त्याला भेटण्यापूर्वी त्याच्यासंबंधीं शक्य तेवढी माहिती मिळवावी व बोलतां बोलतां 'किती विपरीत परिस्थितींतून आपण वर आलां!' अशा प्रकारच्या एखाद्या वाक्यानें त्याची कळी खुलवावी, फुलवावी! हा मनुष्य स्वभाव आहे. तो येथून तेथून जवळ जवळ सारखाच. मनुष्य स्तुतिप्रिय आहे. आपल्या गतकालीन किंवा सद्यःकालीन कर्तबगारीचे गोडवे गायिलेले कोणाला आवडणार नाहींत? आणि मग पहा! तो माणूस आस्ते आस्ते कसा रंगांत येतो व त्या प्रसन्नतेच्या भरांत तुमच्याबद्दल त्याच्या मनांत कशी सहानुभूति निर्माण होते ती पहा! आपण मधूर व मीतभाषी बनलें पाहिजे. जिभेला नेहमीं लगाम घालायला शिकलें पाहिजे.

———





तारेचा पत्ता : ' ABHAY ' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनींयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं
चालविलेलें एकमेव ठिकाण

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांस खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहाः—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. ( आंध्र प्रदेश )**







★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आ णि म्ह णू न च
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. अं. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.